# महासागर

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ७७३५

पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मावती, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | सोमवार, ३० जून २०२५ | वर्ष: १ | अंक:३३ | पाने-८ | किमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


## वाहतूकदारांचा १ जुलैपासून आंदोलन

**मुंबई, दि. २९ प्रतिनिधी**

राज्य सरकारने सर्व वाहनांवरील कर वाढवण्याबाबत प्रस्ताव दाखल केलेला आहे. एक जुलैपासून याची अध्यादेश काढून सर्व राज्यात अंमलबजावणी करण्याचा सरकारचा विचार आहे. या ई चलन आणि अनेक अन्यायकारक कायद्याविरोधात मंगळवार दिनांक १ जुलैपासून वाहतूकदारांनी बेमुदत चक्का जाम आंदोलन पुकारले आहे. वाहतूकदार बचाव कृती समिती महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र राज्य वाहन चालक मालक व प्रतिनिधी संघाने याबाबतची माहिती दिली आहे. रस्ता सुरक्षा, कर, इन्शुरन्स, नवीन नियम याबाबत कोणतीही अजून सूचना काढण्याच्या बाबतीत आधी राज्यातील अफा देशातील वाहतूकदार संघटना यांना विश्वासात घेऊन अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे, परंतु सध्या सरकार कोणतेही वरील विषय चर्चा न करता सरकारी प्रशासनाला अंमलबजावणी करण्याचे निर्देश देत आहे , अशी मागणी महाराष्ट्र राज्य वाहन मालक चालक व प्रतिनिधी महासंघानी केली आहे.

अग्रलेख

**खरीखरी**

## आधी मराठीचा पाया मग हिंदीची माया

आपल्या महाराष्ट्रात सध्या हिंदी भाषेबद्दल ज्या प्रकारच्या लोकभावना प्रदर्शित होत आहेत. त्यातील राजकारण बाजूला ठेवून त्या गोष्टीचा विचार केला पाहिजे. सत्ताधारी म्हणतात इलेक्शन आले म्हणून विरोधक या विषयावर विनाकारण गाजावाजा करत आहेत. एक वेळेला त्यांचे म्हणणे आपण मान्य करू. आतापर्यंत भारताला स्वातंत्र्य मिळाल्या पासूनच्या शिक्षण पद्धतीचा विचार केला. तर गेल्या दहा-पंधरा वर्षात शिक्षणातही वर्गीकरण झालेले आहे. पूर्वी श्रीमंतांच्या शाळा वेगळ्या आणि गरिबांच्या शाळा वेगळ्या असा प्रकार अजिबात नव्हता. एकाच वर्गात गावातील सर्वाधिक श्रीमंतांची मुले आणि त्या तुलनेत गरीब आणि मध्यमवर्गीयांची मुले एकत्रच शिकत असत. तेव्हा सरकारी शाळा खरोखरच चांगल्या होत्या. विद्यार्थ्यांना शिक्षक तळमळीने शिकवत असत. त्याचप्रमाणे विद्यार्थीही 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा, गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरुवे नमः' या उक्तीप्रमाणे गुरुजनांचा मनापासून आदर करीत असत. त्या काळातही काही प्रमाणात काही गुरुजी आदरास पात्र नसत. पण तरीही बहुसंख्य शिक्षक कमी पगार असूनही विद्यार्थ्यांचे ज्ञानवर्धन करण्यात धन्यता मानत असत. आता प्रश्न उरला तो भाषेचा. सुरुवातीच्या काळात मुलांना वयाच्या दहा-अकरा वर्षापर्यंत मातृभाषेचे शिक्षण दिले पाहिजे, असा दंडक होता. त्या काळात महाराष्ट्रात बहुसंख्य शाळांमध्ये प्राथमिक शिक्षण मराठीतच दिले जायचे. राज्यातील काही महानगरे सोडली किंवा मोठी शहरे सोडली. तर इंग्रजी किंवा इतर भाषांच्या शाळा फारच कमी होत्या. काही शाळांमध्ये विशिष्ट समाजाकरता उर्दूचे शिक्षण दिले जात होते. प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतच झाले पाहिजे. कारण त्या काळात पाच-सहा वर्षांच्या बालकांना इतर भाषा शिकवणे, म्हणजे त्यांच्यावर भाषिक बलात्कार करण्यासारखेच आहे. आपण ज्या भाषेत घरी किंवा आपापसांत बोलतो. ती भाषा बालकांच्या डोक्यात फिट्ट बसली पाहिजे. कारण ती भाषा शिकावी लागत नाही. जन्मापासून ती भाषा बालक आत्मसात करत असते. आपल्या महाराष्ट्रात पाचवीपासून मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषा शिकवण्यात येत असत. त्यातील हिंदी भाषा विद्यार्थी शिकण्याचा प्रयत्न करीत असत. महाराष्ट्रात हिंदी भाषेला कधीच विरोध नव्हता. उलट वर्धा येथे राष्ट्रभाषा प्रचार समिती नावाचे अत्यंत व्यापक प्रसार असणारे शिक्षण विद्यापीठ अस्तित्वात होते. केवळ महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशातील हिंदी भाषिक राज्यातून यासाठी परीक्षा घेतली जाई. शाळांमधूनही राष्ट्रभाषा प्रचार समितीतर्फे हिंदीच्या परीक्षा होत असत. प्रारंभिक ते कोविद, रत्न, आणि साहित्यरत्न यासारख्या परीक्षांना विद्यार्थी भरभरून प्रतिसाद देत असत. महाराष्ट्रात महाराष्ट्र राज्य राष्ट्रभाषा सभा, पुणे यांच्याद्वारेही परीक्षा घेण्यात येत असत. सध्या बाजारीकरणाच्या या युगात शिक्षणाचा बाजार सुरू झालेला आहे. पहिलीपासून मुले इंग्रजाळलेली होत आहेत. शिक्षणातही आता श्रीमंतांच्या शाळा वेगळ्या आणि मध्यमवर्गीयांच्या व गरिबांच्या शाळा वेगळ्या असा प्रकार सुरू झालेला आहे. या सर्व शिक्षण प्रणालीच्या गोंधळात सरकारी, महानगरपालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषद यांच्या शाळा दिवसेंदिवस कमी होत आहेत. त्यातील विद्यार्थी संख्या रोडावत आहे. जगरहाटी प्रमाणे यापैकीही अनेक शाळांमध्ये आता इंग्रजीचा शिरकाव झालेला दिसतो. अशा वातावरणात बालकांना सुरुवातीच्या काळात मातृभाषेतूनच शिक्षण दिले जावे परंतु असे आता होत नाही. जे मातृभाषेत शिकतात. ते वेगळ्याच वर्गातले लोक आहेत असे समजले जाते. वयाच्या दहा ते बारा वर्षांपर्यंत मातृभाषेत शिक्षण न झाल्यामुळे घरची भाषा मराठी, शाळेची भाषा इंग्रजी आणि शिक्षणाची भाषा श्रीमंतीवर अवलंबून राहिलेली आहे. आज खाजगी शाळेतील शिक्षणाची फी एकूनच मध्यमवर्गियांच्या डोळ्यात पाणी येते. अशा परिस्थितीत पहिलीच्या वर्गापासून मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषा लादण्याचा प्रयत्न केला. तर किती भयानक परिस्थिती निर्माण होईल. याचा विचार कोणी तरी करणार आहे की नाही. सरकार आणि विरोधक या नाजूक बाबीचे विनाकारण राजकारण करून कारणपरत्वे आपली राजकीय पोळी भाजण्याचा अकारण किंवा सकारण प्रयत्न करताहेत, असे म्हटल्यास ते वावगे ठरू नये. तुम्ही लिहून ठेवा, पुढील काही वर्षात आपल्या महाराष्ट्रात शुद्ध मराठी बोलणारा आणि लिहिणारा वर्ग अत्यल्प असेल. या सर्व बाबींचा शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केला. तर लहान विद्यार्थ्यांवर बहुभाषा शिकण्याचा मोठाच अन्याय होईल. आजच विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवाच्या मानाने प्रचंड वजनाचे शाळेचे दप्तर सोबत न्यावे लागते. त्या दप्तरात आणखी किलोभर वजनाची भाषा वाढल्यावर विद्यार्थ्यांचे भाषिक वजन किती वाढेल. हे मात्र कुणालाच ठाऊक नाही. भारतातील अनेक राज्यात त्रिभाषा फॉर्म्युला लागू नाही. त्यात दक्षिणेतील राज्ये तर आघाडीवरच आहेत. मुंबई राज्यातून निघालेल्या गुजरात मध्येही प्राथमिक वर्गात तीन भाषा शिकवल्या जात नाहीत. हिंदी भाषिक प्रदेशात तर दुसरी कोणतीही भाषा शिकवली जात नाही. म्हणून शिक्षणाच्या पायाभूत काळात विद्यार्थ्यांच्या डोक्यात भाषेची मिसळ करण्याएवजी, विद्यार्थ्यांनी सुरुवातीला मातृभाषा शिकून मगच इतर भाषेत मिसळून जावे. असे केले तर राज्यात आंदोलनाची वेळ येणार नाही. महाराष्ट्र सर्वभाषा समभाव मानणारा प्रांत आहे. महाराष्ट्राचा हा उदारपणा पुढेही कायम राहावा. अशा विचारानेच आम्ही आमच्या खरीखरी मधून हा खराखरा सल्ला देण्याचा मार्ग अवलंबलेला आहे. त्यासाठी आधी मराठीचा पाया, मग हिंदीची माया असे सूत्र ठेवले पाहिजे. सर्व संबंधितांनी याचा विचार करण्यास हरकत नाही.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


## रात्री इंग्रजी पितात आणि निवडणुकीच्या वेळी यांचे मराठीप्रेम जागृत होते- परिणय फुके

**गोंदिया, दि. २९ प्रतिनिघी**

हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरून दोन्ही ठाकरे बंधूंनी विरोध सुरू केला असून ५ तारखेला मोर्चा देखील काढण्यात येणार आहे. यावर भाजपचे नेते परिणय फुके यांनी ठाकरे बंधुंना टोला लगावला आहे. म मराठीचा की महानगरपालिकेचा असा सवाल त्यांनी विचारला. तसेच ते दिवसभर इंग्रजीत बोलतात, रात्री इंग्रजी पितात आणि निवडणुकीच्या वेळी दिशाभूल करण्याकरता यांचे मराठीप्रेम जागृत होतं अशी टीकाही परिणय फुकेंनी केली. भाजपचे नेते परिणय फुके यांनी ठाकरेंवर टीका केली. दोन्ही ठाकरे बंधुंची मुलं कोणत्या माध्यमातून शिकले आहेत असा प्रश्न परिणय फुके यांनी केला. दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येणार का अशा चर्चा सर्वत्र सुरू असताना यावर परिणय फुके यांनी प्रतिक्रिया दिली. दोन्ही भाऊ एकत्र येऊन काही होत नाही, दोन्ही भावजया एकत्र यायला पाहिजेत. तर काहीतरी होऊ शकेल असा टोला त्यांनी लगावला.

# सरकारकडून दोन्ही जीआर रद्द

## डॉ. नरेंद्र जाधवांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या अहवालानंतर निर्णय घेणार- मुख्यमंत्री

**मुंबई, दि. २९ प्रतिनिधी**

**विधिमंडळ अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित चहापानावर विरोधकांनी नेहमीप्रमाणे बहिष्कार टाकला, मात्र या बहिष्काराचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या खास शैलीत खरपूस समाचार घेतला. दरम्यान, त्रिभाषा सूत्राबद्दल सरकारने जारी केलेले दोन्ही जीआर रद्द केले असून डॉ. नरेंद्र जाधवांच्या अध्यक्षतेखाली एक नवीन समितीच्या स्थापनेची घोषणा केली. या समितीचा अहवाल आल्यानंतर त्रिभाषी सूत्राबद्दल निर्णय घेण्यात येईल असे मुख्यमंत्री फडणवसांनी जाहीर केले.**

विरोधकांनी दिलेल्या भल्यामोठ्या पत्रात तब्बल २४ व्याकरणाच्या चुका काढत, 'बॉम्बे स्कॉटिशमध्ये शिकल्यावर असंच होतं,' असा थेट टोला त्यांनी उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना लगावला. त्याचवेळी, 'झोपलेल्याला उठवता येतं, पण सोंग घेतलेल्याला नाही,' अशा शब्दांत त्यांनी विरोधकांच्या एकूण भूमिकेवरच जोरदार निशाणा साधला. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री बोलत होते. त्यांनी सुरुवातीलाच विरोधकांच्या बहिष्कारावर टीका केली.

मुख्यमंत्री म्हणाले, 'आम्ही विरोधकांना चहापानासाठी आमंत्रित केले होते, पण त्यांनी नेहमीप्रमाणे बहिष्कार टाकला. त्यासाठी त्यांनी एक भलंमोठं पत्र दिले आहे. हे पत्र मोठे असले तरी त्यातील मजकूर अत्यंत तोकडा आहे. विशेष म्हणजे, जे मराठी भाषेच्या मुद्द्यावरून गळे काढत आहेत, त्यांच्याच या पत्रात व्याकरणाच्या तब्बल २४ चुका आहेत. अनेकांनी सह्याही व्यवस्थित केलेल्या नाहीत. आता बॉम्बे स्कॉटिशसारख्या शाळेत



शिकल्यावर मराठीचे असंच होणार,' असा चिमटा त्यांनी उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांचे नाव न घेता काढला.

हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरून विरोधक करत असलेल्या आरोपांना उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले, 'राज्यात आम्ही मराठी भाषा अनिवार्य केली आहे आणि हिंदीला केवळ पर्यायी भाषेचा दर्जा दिला आहे. असे असतानाही विरोधक चुकीची माहिती पसरवली जात आहे. विशेष म्हणजे, २०२० साली तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीच याबाबत एक समिती गठीत केली होती. त्यामुळे आता त्यांनीच यावर बोलणे म्हणजे सोंग घेण्यासारखे आहे. आम्ही झोपलेल्याला जागे करू शकतो, पण ज्यांनी झोपेचे सोंग घेतले आहे, त्यांना जागे करू शकत नाही,' असा टोला लगावला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षातील नेत्यांवरही वैयक्तिक टीका केली.

### वडेट्टीवारांना टोला

'विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार स्थगितीबाबत बोलत होते. त्यांना अजूनही राज्यात उबाठा सरकारच आहे असे वाटत असावे,' असा टोला त्यांनी लगावला.

## विरोधकांच्या पत्रात व्याकरणाच्या २४ चुका; मुख्यमंत्र्यांचे विरोधकांना चिमटे

### आव्हाडांनी दिली कबुली

'जितेंद्र आव्हाड यांनी बोफोर्ससारखा घोटाळा चालल्याचा आरोप केला. यातून त्यांनी एकप्रकारे बोफोर्स घोटाळा झाला होता, हेच कबूल केले आहे,' असे म्हणत त्यांनी आव्हाडांना कोंडीत पकडले.

### सही करण्यावरूनही चिमटे

मुख्यमंत्र्यांनी विरोधी पक्षांच्या पत्रावरील सह्यांवरूनही टिप्पणी केली. 'आजच्या पत्रावर भास्कर जाधव यांची सही नव्हती. उबाठा गटाचे ५, काँग्रेसचे ३ आणि शरद पवार गटाच्या केवळ २ नेत्यांच्याच सह्या होत्या,' असे सांगत त्यांनी विरोधकांमधील समन्वयाच्या अभावावर बोट ठेवले.

### शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकार गंभीर

राजकीय टीकेसोबतच मुख्यमंत्र्यांनी राज्यातील परिस्थितीचीही माहिती दिली. 'राज्यभरात सर्वत्र चांगला पाऊस पडत आहे. शेतकऱ्यांना पेरणीसाठी बियाणे आणि खते वेळेवर उपलब्ध व्हावीत, यासाठी संपूर्ण शासकीय यंत्रणा कामाला लागली आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले. एकंदरीत, विरोधकांमध्ये कल्पकता आणि लोकाभिमुखतेचा अभाव असल्याची टीका करत मुख्यमंत्र्यांनी अधिवेशनात सरकार सर्व प्रश्नांना उत्तरे देण्यास तयार असल्याचे सांगितले.

## भाजप अफवांची फॅक्टरी - उद्धव ठाकरे

**मुंबई, दि. २९ प्रतिनिधी**

पहिलीपासून हिंदी भाषा लागू करण्याचा निर्णय राज्य सरकारने मागे घेतल्यानंतर उद्धव ठाकरेंनी त्यावर प्रतिक्रिया दिली. मराठी माणसाच्या शक्तीसमोर या सरकारची सक्ती हरली असे मत उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केलं. ५ जुलैला आम्ही विरोधाचा मोर्चा काढणार होतो. पण आता ५ जुलै रोजी काय करायचं, मोर्चा काढायचा की सभा घ्यायची याबद्दल सर्वांशी चर्चा करणार असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. भाजपकडून खोटी माहिती पसरवली जात आहे, भाजप म्हणजे अफवांची फॅक्टरी असल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केली. ते म्हणाले की, "राष्ट्रीय शिक्षण धोरण आल्यानंतर आम्ही माशेलकरांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्याचा अहवाल आल्यानंतर त्यावर एक अभ्यासगट नेमला. पण त्या अभ्यासगटाची एकही बैठक झाली नाही. मात्र नंतर सरकार पडले. त्यामुळे भाजपकडून खोटे पसरवले जात आहे."



एखादे संकट आल्यानंतर मराठी माणूस जागा होतो. पण आता आपण जागे झालोय, एकत्र आलोय. आता मराठी माणूस एकत्र येऊ नये म्हणून हिंदीचा जीआर मागे घेतला गेला. पण आता मराठी माणसाची ही एकजूट कायम राहावी असं उद्धव ठाकरे म्हणाले.

हिंदीच्या विरोधात आम्ही ५ जुलैला मोर्चा काढणार होतो. पण तो मोर्चा आता रद्द झाला तरी त्या दिवशी विजयी मोर्चा काढायचा की आणखी काही कार्यक्रम करायचा यावर चर्चा करू. या संदर्भात ज्यांनी ज्यांनी सहभाग घेतला त्यांच्यांशी चर्चा करणार असल्याचं उद्धव ठाकरे म्हणाले.

यापूर्वी दुपारी मुंबई मराठी पत्रकार संघ कार्यालय परिसरात उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत शासन निर्णयाची प्रतिकात्मक होळी करण्यात आली. या आंदोलनात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह अन्य विरोधी पक्षही सहभागी झाल्याचे दिसून आले. तसेच काही मराठी कलाकारही या आंदोलनात सहभागी झाले.

## विरोधकांचा चहापानावर बहिष्कार

**मुंबई, दि. २९ प्रतिनिधी**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला उद्या सोमवारपासून सुरुवात होणार आहे. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीमधील नेत्यांची बैठक विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांच्या शासकीय बंगल्यावर पार पडली. यानंतर महाविकास आघाडीने पत्रकार परिषद घेऊन सरकारच्या चहापानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतल्याची माहिती दिली. सरकारच्या चहापानासाठी जाणं म्हणजे पाप आहे. कारण हे महायुती नाही तर महाझुटी सरकार आहे, असा हल्लाबोल ठाकरेंच्या युवासेनेचे प्रमुख आदित्य ठाकरे यांनी केला.

आदित्य ठाकरे म्हणाले की, उद्यापासून अधिवेशन सुरू होत आहे. त्याच्या पूर्व संध्येला चहापानाचा कार्यक्रम होत असतो. तसे पाहिले तर आम्ही विचार करत होतो की, सरकारच्या चहापानासाठी जाणं म्हणजे पाप आहे. कारण हे महायुती नाही तर महाझुटी सरकार आहे. एक भाजप पक्ष आणि दोन गद्दार गँग हे आपण पाहत आहोत. ज्या पद्धतीने हे सरकार चालवण्याचा प्रयत्न करत आहेत, तीन



दिशेला तीन तोंडं आहेत. एकमेकांमध्ये भांडण सुरू आहे. मग ती बंगल्यांवरून असतील, गाड्यांवरून आहेत, कुठल्या जिल्ह्याचे कोण 'मालक'मंत्री होणार कोण पालकमंत्री होणार? इतकेच नव्हे तर मुख्यमंत्र्यांसमोर जाहीरपणे हे पण सांगतात की, माझा फंड यांनी चोरला, त्यांनी चोरला अशी परिस्थिती आहे. कदाचित त्यांच्यामध्ये देखील अजून समन्वयाची गरज आहे.

त्यामुळे आम्ही निर्णय घेतला आहे की, चहापानाच्या कार्यक्रमात किमान ते एकमेकांची तोंड तरी बघतील. डाग अच्छे है, अशी भाजपचे नवीन टॅगलाईन जरी झाली तरी भ्रष्टाचाराचे डाग घेऊन अनेक लोक जे मंत्रिमंडळात बसले आहेत किंवा ते चहापानाला जातील, मुख्यमंत्र्यांना त्यांना पाहून आठवण येईल की यांच्यावरच मी आरोप केले होते. कोणाला जेलमध्ये टाकणार होते? कोणावर काय आरोप केले होते? कोणाच्या मागे ईडी लावली होती आणि हेच सगळे पाहत असताना भाजपच्या भ्रष्टाचारी सरकारमध्ये एक घोटाळा समोर येत आहे. २५ लाख विद्यार्थ्यांमधून अकरावी प्रवेशाची पहिली यादी जाहीर केली. आम्ही आंदोलनाची हाक दिली होती, त्यानंतर घाबरून ती यादी जाहीर केली असेल. रात्री कळाल्यानंतर अनेक पालकांनी आम्हाला फोन केले. पहिली यादी जाहीर झाली, त्या पहिल्या यादीत देखील अनेक मोठे गोंधळ झाले आहेत. या यादीमध्ये कुठलं कॉलेज कोणाला देण्यासाठी दादा भुसे यांनी भ्रष्टाचार केला आहे का? हा एक मोठा प्रश्न उपस्थित होत आहे. कारण हेच ते दादा भुसे आहेत ज्यांनी पहिलीच्या विद्यार्थ्यांवर हिंदी विषय लादण्याची सक्ती केली आहे, असा हल्लाबोल त्यांनी यावेळी केला

## याला उशिरा आलेले शहाणपण म्हणता येणार नाही - राज ठाकरे

**मुंबई, दि. २९ प्रतिनिधी**

त्रिभाषा सूत्रावरून राज्यात पेटलेले राजकीय रान शांत करण्यासाठी अखेर महायुती सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. हिंदी सक्तीच्या आरोपांना तोंड देत असलेल्या सरकारने, वादग्रस्त ठरलेले दोन्ही शासन निर्णय (जीआर) रद्द करत असल्याची घोषणा केली. दरम्यान, या निर्णयाबद्दल मनसे अध्यत्र राज ठाकरे यांनी एक्सवर पोस्ट करत सरकारला सुनावले आहे.

आपल्या पोस्टमध्ये राज म्हणतात की, इयत्ता पहिलीपासून तीन भाषा शिकवण्याच्या नावाखाली हिंदी भाषा लादण्याचा निर्णय एकदाचा मागे घेतला. सरकारने या संबंधातील २ जीआर रद्द केले. याला उशिरा आलेलं शहाणपण म्हणता येणार नाही, कारण ही सक्ती फक्त आणि फक्त मराठी जनतेच्या रेट्यामुळे मागे घेतली गेली. हिंदी भाषेसाठी सरकार इतका अट्टाहास का करत होतं आणि



यासाठी सरकारवर नक्की कुठून दबाव होता, हे मात्र अजून गूढच आहे. पण महाराष्ट्रात विद्यार्थ्यांनी हिंदी शिकावीच म्हणून तीन भाषा लादण्याचा जो प्रयत्न होता तो एकदाचा हाणून पाडला गेला आणि यासाठी महाराष्ट्रातील तमाम जनतेचं अभिनंदन. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने एप्रिल २०२५ पासून या विषयावर आवाज उठवला होता आणि तेंव्हापासून हा मुद्दा तापायला लागला. त्यानंतर एक एक राजकीय पक्ष आवाज उठवायला लागले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पक्षविरहित मोर्चा काढायच्या ठरवल्यावर अनेक राजकीय पक्षांनी, संघटनांनी त्यात सहभागी होण्याची तयारी दाखवली. हा मोर्चा जर झाला असता तर इतका विशाल झाला असता की संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळाची आठवण व्हावी. कदाचित या एकजुटीचा धसका सरकारने घेतला असेल, पण हरकत नाही ही भीती असली पाहिजे. अजून एक गोष्ट, सरकारने पुन्हा एकदा नवीन समिती नेमली आहे. मी स्वच्छ शब्दांत सांगतोय समितीचा अहवाल येऊ दे किंवा नको येऊ दे परंतू हे असले प्रकार परत खपवून घेतले जाणार नाहीत म्हणजे नाहीत ! ही गोष्ट सरकारने कायमची त्यांच्या मनात कोरून ठेवावी, असे राज ठाकरे यांनी सरकारला सुनावले आहे.

## अश्वांचे दुसरे रिंगण पार पडले



**इंदापूर, दि. २९ प्रतिनिधी**

पुण्याच्या इंदापूर मधील रयत शिक्षण संस्थेच्या सौ कस्तराबाई श्रीपती कदम विद्यालयाच्या प्रांगणात आज संत तुकोबांच्या पालखी सोहळयातील मानाच्या अश्वाचं दुसरं गोल रिंगण पार पडलं. यात वारकऱ्यांसोबत देहू पासून पंढरीपर्यंत कर्तव्य बजावणारे पोलीस देखील धावले. रिंगण सोहळा पार पडल्यानंतर वारकरी महिलांसह पोलिसांनी ही फुगडी खेळून आनंद उत्सव साजरा केला. देहू पासून प्रस्थान झाल्यापासून मजल दरमजल करत लाखो वारकरी पंढरीच्या दिशेने मार्गस्थ होतात. ऊन वारा पाऊस झेलत वारकऱ्यांसमवेत पोलीस देखील रात्रंदिवस मैदानात असतात. त्यामुळे कुठेतरी कामाचा शीण आलेला असतोच. हाच शीण झटकून टाकण्यासाठी पालखी सोहळयाच्या वतीने आज इंदापूर मधील रिंगण सोहळयात पोलीस कर्मचाऱ्यांनाही धावण्याचे आवाहन करण्यात आलं. यात पोलीस कर्मचाऱ्यांनी हिरीरीने सहभाग घेतला.

## सात दिवस आधीच विठ्ठलाच्या दर्शन रांगेत ५० हजार भाविक

**पंढरपूर, दि. २९ प्रतिनिधी**

पुण्यातून निघालेली पंढरपूर वारी सध्या फलटण परिसरात विसावली आहे. राज्याच्या विविध भागातून वारी घेऊन वारकरी मार्गस्थ झाले आहेत. हे वारकरी येण्यापूर्वीच पंढरपुरात वैष्णवजन गोळा झालेले आहेत. आषाढी एकादशीला अजून ७ दिवस बाकी असताना विठ्ठलाच्या दर्शनासाठी चार-चार किमीच्या रांगा लागल्या आहेत.


आषाढी एकादशीच्या सोहळ्याला अजून ७ दिवसाचा अवधी आहे. अशातच पंढरपुरात विठ्ठलाच्या पदस्पर्श दर्शन रांगेत ५० हजार भाविक उभे आहेत. विठ्ठदर्शनासाठी सध्या १० तासांचा कालावधी लागत आहे. तरीही भाविकांची विठ्ठलदर्शनाची ओढ दिसून येत आहे. प्रत्येकाला विठ्ठलाचे दर्शन घेण्याची इच्छा आहे. यातूनच दर्शन रांग ४ किमी लांब पर्यंत जाऊन पोहोचलेली आहे. देशभरातून विठ्ठल भक्त मार्गस्थ झाले आहेत. यंदा विक्रमी वैष्णवजन पंढरीत दाखल होण्याची शक्यता आहे. सोलापूर, पंढरपूर प्रशासन याच्या तयारीत गुंतले आहे. वारकऱ्यांना वाटेत गावकरी जेवण, चहापान, राहण्याची व्यवस्था करत आहेत. पावसाने थोडी उसंत दिल्याने वारकऱ्यांना थोडा दिलासा मिळाला आहे.

## आता आरपारची लढाई; २९ ऑगस्टला मुंबई गाठायची

### जरांगे पाटलांचा सरकारला इशारा

**जालना, दि. २९ प्रतिनिधी**

आता आपल्याला रणभूमीत उतरुन लढायचे, मैदान गाजवायचे अन् विजय खेचून आणायचा आहे. २७ ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटी सोडायची आणि २९ ऑगस्टला मुंबई गाठायची. आता मागे हटायचे नाही. विजय मिळवायचा, त्याशिवाय मुंबईतून वापस फिरायचे नाही. आता ही लढाई आरपारची आणि अंतिम असेल, असा इशारा मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील अंतरवाली सराटी येथे झालेल्या राज्यव्यापी बैठकीत दिला. या बैठकीदरम्यान 'एक मराठा लाख मराठा', 'लढंगे जितेंगे हम सब जरांगे', 'कोण आला रे कोण आला, मराठ्यांचा वाघ आला' अशा घोषणाही देण्यात आल्या.



आपल्याला प्रत्येक वेळेस नाव ठेवले जायचे. एवढ्या प्रचंड संख्येने तुम्ही जमला, तुमच्यासमोर नतमस्तक होतो. जातीसाठी किती ताकतीने लढावे, हे सर्व देशाला तुम्ही दाखवून दिले. मराठा समाजाची दोन वर्षापासून संघर्षाची लढाई चालू असून, आता आता मराठ्यांनी जिंकायचे म्हणजे जिंकायचे, असा निर्धारही जरांगे पाटलांनी यावेळी केला.

राजकीय लोक त्यांच्या पक्षासाठी, निवडणुकीसाठी रात्र-दिवस मरमर करतात, मात्र तुमच्यासाठी, तुमच्या लेकरासाठी व तुमच्या जातीसाठी कोणीच मरमर करत नाहीत. कोणत्याही पक्षाचा मराठा असू द्या, त्यांनी आपल्या लेकराच्या अंगावर गुलाल टाकण्यासाठी सज्ज राहा. आता फक्त आठ नऊ टक्केच मराठा आरक्षणामध्ये जायचे राहिला आहेत, हे सरकारलाही माहित आहे, असेही त्यांनी यावेळी म्हटले.

## पुरीच्या जगन्नाथ रथयात्रेतही चेंगराचेंगरी

### 3 जणांचा मृत्यू, 30 जखमी

**पुरी, दि. २९ वृत्तसंस्था**

कुंभमेळा, तिरुपती आणि गोव्यात मंदिराच्या दारात झालेली चेंगराचेंगरीचा विसर पडत नाही तोपर्यंत आणखी एक घटना घडली आहे. आता ओडिशातील पुरी येथे जगन्नाथ रथयात्रेदरम्यान एक मोठा अपघात झाला. रविवारी पहाटे ४ वाजता गुंडीचा मंदिरासमोर भगवान जगन्नाथाच्या नंदीघोष रथाजवळ गर्दीत चेंगराचेंगरी झाली. यादरम्यान ३ भाविकांचा मृत्यू झाला. ३० जण जखमी झाल्याचे वृत्त आहे. अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांची नावे बसंती साहू (३६), प्रेम कांती



महंती (७८) आणि प्रभात दास अशी आहेत. मृतदेह पुरी मेडिकल कॉलेजमध्ये ठेवण्यात आले आहेत.

रथ पाहण्यासाठी मोठी गर्दी जमली असताना हा अपघात झाला. यादरम्यान चेंगराचेंगरी झाली आणि लोक पडल्याने चिरडले गेले. ज्या ठिकाणी चेंगराचेंगरी झाली त्या ठिकाणी पुरेसे पोलिस किंवा सुरक्षा दल तैनात नव्हते असे सांगितले जात आहे. भगवान बलभद्र आणि सुभद्रा यांचे रथ आधीच श्रद्धाबली (अंतिम बिंदू) येथे पोहोचले होते. नंतर, भगवान जगन्नाथाचा रथ गुंडीचा मंदिरात त्यांच्या मावशीच्या घरी पोहोचला.

शुक्रवारी देवी सुभद्राच्या रथाभोवती गर्दी वाढल्याने ६२५ भाविकांची प्रकृती खालावली. प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, ७० जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी ९ जणांची प्रकृती चिंताजनक आहे.

# शेतकऱ्याला प्रतिष्ठा कधी/कशी मिळणार?

'स्ने महाराष्ट्रात १ जुलै हा दिवस महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि हरित क्रांतीचे जनक, वसंतराव नाईक यांच्या जन्मदिनाचे स्मरण कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी, राज्यातील शेतकऱ्यांच्या कार्याचा गौरव केला जातो आणि कृषी क्षेत्रातील समस्यांवर चर्चा केली जाते. कृषी दिन शेतकऱ्यांच्या कष्टाचा आणि योगदानाचा सन्मान करण्याचा दिवस आहे.सन्मान तर राहिला बाजूला, पदोपदी अपमान, उपेक्षा सहन करावी लागते आहे.

या दिवशी कृषी क्षेत्रातील समस्या आणि संधींवर चर्चा करून विकासाच्या योजनांवर भर दिला जातो. पण आज शेतकऱ्यांची परिस्थिती बघितली तर जवळपास साठ ते सत्तर टक्के शेतकरी हा अल्प अत्यल्प भूधारक आणि कोरडवाहू शेती करणारा आहे. चांगला पाऊस झाला पिक चांगली आलीत, तरीपण उत्पादनखर्च वजा जाता घर खर्च भागवण्या करिता त्याला कर्जाशिवाय पर्याय नसतो. त्यामुळे शेतकरी सतत आणि सतत कष्ट करीत असतो. आणि त्याशिवाय त्याला काही पर्याय नसतो. कुठल्याही प्रकारची चैन नाही, आनंद नाही , समाजात प्रतिष्ठा नाही. ना त्याच्या शेतीला प्रतिष्ठा ना त्याला प्रतिष्ठा. त्यामुळेच आता बहुतांशी नवीन पिढी शेती करण्यापासून परावृत्त होत आहेत. असा हा आपला बळीराजा सतत कुठल्या ना कुठल्या विवंचनेत असतो. चेहऱ्यावर आनंद नाही,. का कुठली अपेक्षा नाही. परिस्थितीने अतिशय शांत होऊन गेलेला आणि चेहऱ्यावर कष्टाच्या खुणा जाणवतात.

शेतकरी हा सुद्धा समाजाचा भाग आहे त्याला पण काही करावेसे वाटते पण परिस्थिती ने गांजल्या मुळे तो काही करू शकत नाही. फक्त आपल्यासमोर जी परिस्थिती आहे ती उघड्या डोळ्याने तो पाहत असतो आणि आतल्या आत धुमसत असतो. कुटुंबात मुल, मुली असतात. त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न असतो. काही शिक्षित असतात काही उच्च शिक्षण घेतले असतात. त्यांना काही वेगळे करावेसे वाटते. नोकरीच्या शोधात असतात. पण नोकरी मिळत नाही म्हणून तेही हतबल असतात. समोरच्या परिस्थितीशी ते एकरूप होऊ शकत नाही. आपल्या शेतीची अवस्था पाहून वडिलधाऱ्या मंडळीचे काय हाल होत आहेत ते बघत असतात, आणि आपल्याला याच्या व्यतिरिक्त काही करता येईल का याचाही ते शोध घेत असतात परंतु. त्यांना तसे काही साध्य होत नसते. आता शेतीत काम करण्याची त्यांची इच्छाही नसते. आणि क्षमताही राहीली नसते. त्यांना शहरी आकर्षण वाटत असते. शेतात कष्ट करण्यापेक्षा शहरात जाऊन काहीतरी थोडाफार छोटा मोठा का होईना काहीतरी व्यवसाय करावा किंवा नोकरी पहावी याकडे कल झालेला आहे. थोडक्यात, आता शेतीत काम करणे कष्ट करणे हे त्यांना कमीपणाचे लक्षण वाटते आहे. आणि म्हणूनच वडीलधारी मंडळी शेतीला चिकटून असली तरी पण त्यांना कुटुंबातील मुलांची साथ मिळेल ही शक्यता नाही.

शहरातील रहाणीमान त्यांना आकर्षित करून घेत आहे. अशा अल्प अत्यल्प तसेच कोरडवाहू शेती करणाऱ्या कुटुंबात मुला मुलीच्या लग्नाचे प्रश्न गंभीर होत आहेत. शेतीला आणि शेतकऱ्याला प्रतिष्ठा नसल्याने निव्वळ शेती असणाऱ्या घरात कोणीही आपल्या मुली द्यायला तयार होतं नाही. तर शेतीच्या उत्पन्नातून संसार, घर खर्च,शिक्षणाचा खर्च ही निघत नसल्याने मुलीच्या लग्नात देण्याघेण्याचा हुंडा विवाहाचा खर्च झेपत नसल्याचा प्रश्न उपस्थित होतो . मुलीचे लग्न ही रखडल्यामुळे अनेक कुटुंबात तरुण मुला मुलींनी आपले जीवन संपवले आहे. शेतकरी कुटुंबातील मुला-मुलींच्या लग्नाचे विषय खूपच गंभीर झाले आहेत. त्यातच कर्जाचा बोजा थकलेले कर्ज आणि कर्ज वसुली चा रेटा यामुळे शेतकरी अधिकच विचित्र परिस्थितीत सापडतो.

शेतकऱ्यांविषयी अनेक वादग्रस्त आणि शेतकऱ्यांचा अवमान करणारी विधाने




केली जातात. शेतकरी कर्जमाफीची रक्कम साखरपुडा,लग्नासाठी खर्च करतो. त्यातील एक रुपया तरी शेतीला लावतो का ?असे वक्तव्य कृषी मंत्र्यांनी केले होते. आता भिकारी ही एक रुपया घेत नाही आम्ही एक रुपयात पिक विमा घेतो असेही वक्तव्य केले होते. आता भिकारी आणि शेतकरी हे वक्तव्य काय आहे? काहीतरी असंबद्ध प्रकारचे वक्तव्य आहे. अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची कृषी मंत्री कोकाटे यांनी पाहणी केली. त्यानंतर पत्रकारांशी बोलत असतानाच त्यांनी हे वक्तव्य केले. मंत्री, कापणी झालेल्या पिकांचे पंचनामे करून काय होणार? ढेकळांचे पंचनामे करायचे का? जे नियमात बसेल त्याप्रमाणे करा पण किमान शेतकऱ्यांना डिवचवू नका आणि अपमान कारक बोलू नका.त्याच्याविषयी सवेदनशीलता



**दायित्व**
**दिलीप देशपांडे**
**जामनेर, जिल्हा जळगाव**
**८९९९५६६९१७**

असू द्या. शेतकऱ्यांशी बोलताना त्रासिक पणे बोलू नका. या आधी सुध्दा एका राजकीय नेत्याने "कितीही दिले तरी रडतात साले" असे शेतकऱ्यांनचा अवमान करणारे वक्तव्य केले होते. कोणी आपल्या खिशातून काढून देत नाही. अशातच पुन्हा एकदा बबनराव लोणीकर यांनी वादग्रस्त विधान केल्याने चर्चेत आले आहेत. यावेळी लोणीकरांची सरकारवर टीका करणाऱ्या तरुणांवर निशाणा साधताना जीभ घसरली आहे. तुझ्या अंगावरचे कपडे आणि पायातली चप्पल सुद्धा सरकार मुळेच तर तुझ्या घरात आईबहीणीला, बायकोला १५०० रुपये आम्हीच देतो. तुझ्या बापाला पेरणीसाठी सहा हजार रुपये मोदींनी दिल्याचं बबनराव लोणीकर म्हणाले. या विधानावरून विरोधक त्यांच्यावर टीका करत आहेत. जालना जिल्ह्यातील आपल्या परतूर येथील सोलर योजनेच्या शुभारंभ प्रसंगी केलेल्या भाषणात बोलताना लोणीकरांनी वादग्रस्त विधान केले आहे. पक्ष कुठलाही असो परंतु त्यांनी शेतकऱ्या विषयी विधान करताना अतिशय जबाबदारीने करायला हवे. नाहीतर फक्त निवडणुका आल्या की त्याच्याविषयी कळवळा दाखवायचा,पाया पडायचे, आणि नंतर मात्र त्याला जितके अपमानित करता येईल तितके करायचे ही पद्धत झाली. आधी म्हणायचे शेतकऱ्याचा सातबारा होणार कोरा.. कोरा.. कोरा त्यानंतर मात्र 31 मार्च अखेर पर्यंत शेतकऱ्यांनी कर्ज भरण्याचा सल्ला उप मुख्यमंत्री अजित पवार देतात. आता कर्जमाफी नाही, ज्यांनी कोणी आश्वासन दिले त्यांना विचारा असे विधान केले जाते.परत दुसरे उपमुख्यमंत्री म्हणतात जाहीर केल्या प्रमाणे कर्जमाफी होणारच. परत मुख्यमंत्री म्हणतात योग्य वेळी कर्जमाफी दिली जाईल. कोणाला द्यायची ठरवले जाईल. असे. आता योग्य वेळ कोणती आणि ती कधी येईल असा प्रश्न विचारला जात आहे.

गतवर्षी अतिवृष्टीने झालेले पिकांची नुकसान भरपाई किंवा त्यांना मदत अद्यापही मिळाली नाही. पिक विम्याचे पैसे ही मिळालेले नाही. नियमित कर्ज भरणाऱ्यांना पंचवीस हजार किंवा पन्नास हजार देणार असे जाहीर केले होते. त्याबाबतीत काही निर्णय होत नाही फक्त आशेवर झुलवले जाते. मी स्वतः जवळपास सोळा वर्ष विशेष वसुली अधिकारी पदावर कामकाज केले आहे आणि त्यामुळे मी शेतकऱ्याचे असे अनेक प्रश्न आणि समस्या जवळून बघितल्या आहेत आणि त्याचा अभ्यास केला आहे. कर्ज बुडवण्याची शेतकऱ्याची मुळातच इच्छा नसते परंतु त्याला पिकत नाही आणि पिकले तर भाव मिळत नाही अशी कोंडी निर्माण करणारी अवस्था असते.

सध्या शहरी आणि ग्रामीण अशी एक दरी निर्माण झाली आहे अर्थातच ग्रामीण भागात शेतकरी आणि मजूर वर्ग तर शहरी भागात मध्यमवर्ग उच्च मध्यम वर्ग नोकरदार धनिक व्यापारी अशी विगत वारी झाली आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या गरजा त्यामानाने खूपच कमी आहेत. बऱ्यापैकी माल व्हावा व त्याला भाव मिळावा आणि पुढच्या हंगामा पर्यंत आपले दिवस सुखाचे जावे हीच अपेक्षा असते. मर्यादित गरजा असतात. परंतु शहरीभागात हाय फाय राहणीमान असते, शेतकऱ्याच्या समस्यांशी त्यांना काही देणेघेणे नसते, फक्त त्याने पिकवावे आणि आपण खावे हीच भूमिका असते . दरवर्षी पगारवाढ, वेतनआयोग, दर वर्षा दोन वर्षांनी पर्यटनाची सवलत, सगळे व्यवस्थित असते. त्यांच्या एका शर्ट पॅन्ट,बुट, ची किंमती एवढी शेतकऱ्याला हेक्टरी मदत मिळत असते. आपण आपले कुटुंब इतर गोष्टींशी त्यांना काही देणे घेणे नसते. वर्तमानपत्रात शेतकरी आत्महत्या करत असल्याच्या बातम्या ऐकतात आणि वरपांगी हळहळ दाखवतात.

शेतकऱ्याला मात्र ना पगारवाढ,ना वेतन आयोग,ना पर्यटन सवलत. त्याचे सर्व जीवन शेतीसाठी समर्पित असते.आणि त्याच्या समर्पण भावामुळे हे सर्व व्यवस्थित सुरू आहे. सरकार कुठल्याही पक्षाचे असेल,उगीच त्यांचा वेळोवेळी अपमान करून अपमानास्पद वागणूक देवू भनका.आणि त्याला लाचार समजू नका. दर पाचवर्षांनी नवनवीन आश्वासन देउन तुम्हीच त्यांच्या दारात जातात.त्याची पुर्तता करा. आपण जनतेने सेवक आहोत याचा विसर पडू देवू नका. तो जगाचा पोशिंदा आहे. त्याचे मालक होवू नका. तोच मायबाप आहे. त्याला शेती व्यवसायाला, प्रतिष्ठा मिळवून द्या.आपल्याला हे वैभव,पद, प्रतिष्ठा तोच मिळवून देतो नां? त्याला विसरु नका. त्याचे आशीर्वाद घ्या. तळतळाट घेऊ नका. शेतकरी टिकेल तर शेत पिकेल. तूर्तास एवढेच.

dilipdeshpande24@gmail.com

## महत्त्वाचे

### मविप्रच्या केबीटी अभियांत्रिकीत आता पीचडी रिसर्च सेंटर

नाशिक । मविप्र समाज संचलित गंगापूर रोडवरील कर्मवीर अ‍ॅड. बाबुराव गणपतराव ठाकरे (केबीटी) अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये यांत्रिकी व संगणक शाखेच्या संशोधन केंद्रास (पीएचडी) तसेच सिव्हिल अभियांत्रिकी शाखेतील स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग आणि ई अ‍ॅण्ड टीसी अभियांत्रिकी शाखेतील व्हिएलएसआय अ‍ॅण्ड एम्बेडेड सिस्टम्स या पदव्यूत्तर पदवी (एम.टेक) या दोन्ही अभ्यासक्रमांच्या प्रत्येकी १२ जागांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण (एआयसीटीई-नवी दिल्ली) संस्थेकडून मान्यता मिळाली आहे. तसेच, पदवी अभ्यासक्रमासाठी ऑटोमेशन अ‍ॅण्ड रोबोटिक्स इंजिनिअरिंग ही नवीन विद्याशाखादेखील सुरु झाल्याची माहिती केबीटी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. देवणे यांनी दिली. सिव्हिल इंजिनिअरिंगच्या ६० वरून १२०, ई अ‍ॅण्ड टीसी इंजिनिअरिंगच्या ६० वरून १२० व आय टी इंजिनिअरिंगच्या १२० वरून १८० इतकी वाढीव विद्यार्थीसंख्या आता महाविद्यालयात उपलब्ध झाल्याचेही प्राचार्य डॉ. देवणे यांनी सांगितले. महाविद्यालयाला प्राप्त झालेल्या नवीन संशोधन केंद्र, नवीन विद्याशाखा, वाढीव तुकडी वाढ, पदवीत्तर विद्याशाखा व महाविद्यालयाच्या एकंदरीत उत्तुंग यशोदायी प्रगतीसाठी मविप्रचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे, उपसभापती डी. बी. मोगल, चिटणीस दिलीप दळवी, तसेच सर्व तालुका व सेवक संचालक, शिक्षणाधिकारी डॉ. डी. डी. लोखंडे यांनी कौतुक केले.

### मराठा हायस्कूलमध्ये महाकवी कालिदास दिन

नाशिक । मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या मराठा हायस्कूलमध्ये महाकवी कालिदास दिन उत्साहात साजरा करण्यात




आला. याप्रसंगी व्यासपीठावर मुख्याध्यापक पुरुषोत्तम थोरात, उपमुख्याध्यापक तथा मविप्र सेवक संचालक चंद्रजीत शिंदे, पर्यवेक्षक रामनाथ गडाख, देविदास भारती व नंदा जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने करण्यात आली. महाकवी कालिदास यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. संगीत शिक्षक दिनकर दांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली गीतमंचाने सुंदर गीत सादर केले. गौरी खुटे हिने मनोगत व्यक्त केले. ज्येष्ठ संस्कृत शिक्षक रमेश सोनवणे यांनी अतिशय सखोल शब्दात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक थोरात यांनी अध्यक्षीय मनोगतात महाकवी कालिदास यांचा जीवनपट मांडत त्यांच्या कार्याची महती विषद केली. तेजस बोधले याने सूत्रसंचालन केले व आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी ज्येष्ठ संस्कृत शिक्षक रमेश सोनवणे, सुनील गाडे, दत्तात्रय खरे, गुंजाळ यांनी परिश्रम घेतले. कला शिक्षिका विशाखा वाघ व चित्रलेखा नाठे यांनी सुंदर असे फलक लेखन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक बंधू भगिनी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# डोंगरगाव जिल्हा परिषद शाळेत वृक्षारोपण

## हरित सेना सदस्यांकडून शाळेच्या विविध उपक्रमांचे कौतुक

**डोंगरगाव** । येथील जिल्हा परिषद शाळेत पर्यावरणा सप्ताह निमित्त शाळेच्या परिसरात विविध प्रकारच्या देशी प्रजातींच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.हरित सेनेने गेल्या दोन वर्षांपासून पंचक्रोशीत जवळपास साडे सातशे झाड लावले असुन दर शनिवारी एक तास देऊन ते त्या झाडांची नियमीत काळजी घेत असतात. त्यांचे हेच पर्यावरणाप्रती असलेले प्रेम, सातत्य पुर्ण अविरत सुरू असलेले कार्य विद्यार्थांना कळावे, तसे संस्कार विद्यार्थांवर व्हावे, या उदात्त उद्देशाने शाळेचे मुख्याध्यापक दिलीप कोथमिरे यांनी हरित सेनेला डोंगरगाव जिल्हा परिषद शाळेत येण्याचे आवाहन केले होते.




अल्पावधीतच चळवळ स्वरूप धारण केलेल्या हरितसेनेच्या सदस्यांनी डोंगरगाव येथे उपस्थित राहुन मुलांचे आणि त्यांना सुशिक्षित करण्यासाठी झटणा-या उपक्रमशील शिक्षकांचे कौतुक केले. या भेटीचे स्मरण रहावे म्हणुन शाळेच्या परिसरात देशी प्रजातीच्या झाडांचे मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी बोलताना खरेदी-विक्री संघाचे चेअरमन, हरित सेना सदस्य शंतनू पाटील यांनी मुलांशी हितगुज साधले. 'एक झाड माणसाला आयुष्यात काय काय देते? तसेच आपल्या जीवनात सुखाच्या राशी उभ्या करायच्या असतील तर पर्यावरणाचे रक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे.' हे सोप्या भाषेत मुलांना समजावून सांगितले. वनाधिकारी नवनाथ गांगोडे साहेब यांनी 'एक पेड मा के नाम' या शासन उपक्रमाची माहिती मुलांना दिली. त्यांनी आपल्या मनोगतात पर्यावरणाचे रक्षण केले, तरच भविष्यात माणसाचे अस्तित्व शिल्लक राहील. निसर्गाकडून ओरबडून घेण्यापेक्षा त्याच्यावर प्रेम केले तर तो निसर्ग माणसाला फक्त देतच राहतो, म्हणून आपण झाडे लावली पाहिजेत असे आवाहन करून त्यासाठी वनविभागाच्या वतीने सर्व सहकार्य करण्याची तसेच शासकीय योजनेतून मुलांची निसर्गसहल म्हणजे भटकंती आयोजित करण्याची त्यांनी घोषणा केली. प्रसिद्ध इतिहास अभ्यासक संजय बिरार यांनी मुलांना निसर्गाचे महत्त्व सांगितले आणि एक व्यक्ती ने जरी ठरवल तरी तो कसा बदल करू शकतो हे महावितरणाचे वरिष्ठ अधिकारी हरित सेना सदस्य दिनेश जोशी त्यांच्या एकट्याच्या प्रयत्नाने, वनाधिकारी गणगोडे यांच्या सहकार्याने नाशिक जिल्ह्यातील सर्व महावितरणाच्या कार्यालयात कसे वृक्षारोपण संपन्न झाले याचे उदाहरण दिले. तसेच पुन्हा एकदा शाळेला भेटण्यासाठी येईल हा शब्द त्यांनी दिला. शाळेत सुरू असणारी विद्यार्थी बचत बँक, विज्ञान प्रयोगशाळा, प्लास्टिक मुक्त शाळा, स्टार स्टुडन्ट, पुस्तकावर बोलू काही, माझी गोष्ट, आम्ही अधिकारी होणारच, आमचे भांडारगृह व सांकेतिक भाषेतून कल्पना विकास, उपस्थिती ध्वज या व अशा विविध अभिनव कल्पना शाळेत सुरू असल्याबद्दल मान्यवर पाहुण्यांनी सर्व शिक्षकांचे कौतुक केले. हरित सेनेने वृक्षारोपणाचा आणि त्यांच्या संगोपनाचा जो विडा उचलला आहे, त्यात जे सातत्य आहे त्यानिमित्त हरित सेनेच्या सदस्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन आणि सर्व कार्यक्रमाचे व्यवस्थापन समिक्षा आव्हाड, ईश्वरी नागरे, शर्वरी आव्हाड या चिमुकल्या विद्यर्थांनी अतिशय उत्कृष्ठ आणि सराईतपणे कले.

यावेळी वनाधिकारी नवनाथ गांगोडे, वनाधिकारी सहाय्यक कल्पना पाईकराव, डोंगरगाव जिल्हा परिषद शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील आव्हाड, उपाध्यक्ष नारायण नागरे, मुख्याध्यापक दिलीप कोथमिरे, हरित सेनेचे शंतनू नानासाहेब पाटील, राजेंद्र दत्तात्रय होळकर, संजय त्रंबकराव बिरार, ऋषिकेश भास्कर जोशी, चंद्रशेखर नामदेव शिंदे, पियुष राजेंद्र भन्साळी, सुहास गणपत कोल्हे, अजय ज्ञानेदेव घनावत, शिक्षक रमेश जाधव, रेवती शिंदे, योगेश जगदाळे, सुनील मोरे मनीषा डेरले, हर्षा पाटील, संजना खैरनार, मयुरी आहेर आणि पालक उपस्थित होते.

# जय बाबाजी परिवाराच्या गुरुपौर्णिमा सोहळ्याचे वेरूळला ध्वजारोहण

**नाशिक** । अध्यात्मिक उन्नती ते राष्ट्र कल्याण अशी वाटचाल करणाऱ्या जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने निष्काम कर्मयोगी जगदगुरु जनार्दन स्वामी महाराजांच्या परंपरेनुसार पुण्यभूमी श्रीक्षेत्र वेरुळ येथे ३ ते १० जुलै दरम्यान वार्षिक गुरुपौर्णिमा महोत्सवाचे व विद्यार्थी संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.या सोहळ्याचे ध्वजारोहण अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी मौनगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत "जय बाबाजी" अशा प्रचंड जयघोषात वेरुळ आश्रमात संपन्न झाले.

कठोर तपस्वी निष्काम कर्मयोगी शिवयोगी जगदगुरु जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज यांच्या परंपरेनुसार उत्तराधिकारी अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने व प्रमुख उपस्थितीत भक्त परिवाराचे राजधानी आश्रम असलेल्या वेरुळ येथे ३ ते १० जुलै दरम्यान वार्षिक गुरुपौर्णिमा महोत्सव संपन्न होणार आहे.या सोहळ्या दरम्यान विद्यार्थी उपनयन संस्कार,विशेष व्याख्यान,हस्त लिखित नामजप,विद्यार्थी संस्कार शिबिर,रोज पहाटे ब्रह्म मुहूर्तावर पहाटे ५ वाजता नित्य नियम विधी, ध्यान,प्राणायाम,सत्संग,महाआरती ,रोज चार वेळा विधी पाठ यांसह भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या भव्य दिव्य सोहळ्याचे ध्वजारोहण वेरुळ येथील आश्रमात मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. जगदगुरु





शांतिगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

प्रारंभी पालखी मिरवणूक आणि त्यानंतर आयोजित प्रमुख कार्यक्रमप्रसंगी पालखी पूजन, पाद्य पूजन,संत,अतिथी, ब्राह्मण पूजन यावेळी संपन्न झाले. कार्यक्रमास आश्रमीय संत व राज्यभरातून आलेले भक्त परिवाराचे प्रमुख पदाधिकारी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमांचे सूत्रसंचालन विवेकानंद महाराज, ब्र.रामानंद महाराज यांनी केले.

**गुरुपौर्णिमा उत्सव रूपरेषा**

जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत वेरुळ आश्रम येथे १० जुलै रोजी संपन्न होणाऱ्या गुरू पौर्णिमा सोहळ्या प्रसंगी पहाटे ४ वाजता जगदगुरु बाबाजींच्या श्री मूर्तीचे अभिषेक पूजन संपन्न होईल. यानंतर पहाटे ४.४५ वाजता नित्य नियम विधी,आरती,सत्संग,भागवत वाचन संपन्न होईल.यानंतर सकाळी ७ ते ८ श्रमदान संपन्न होईल,सकाळी ८.३० ते १०.३० पालखी मिरवणूक,सकाळी १०.३० ते १२ जगदगुरु पाद्य पूजन,दुपारी १२ ते १ मुख्य सत्संग,जगदगुरु शांतीगिरीजी महाराज यांचे विशेष मार्गदर्शन संपन्न होईल.

# गोखले एज्युकेशन सोसायटीतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**नाशिक** । पालकांनो मुलांना समजून घ्या, त्यांना साथ द्या आपल्या मुलांचा अभिमान बाळगा, कोणतेही यश सहजासहजी मिळत नाही, जीवनात आशावादी व सकारात्मक रहा, असे प्रतिपादन नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अशिमा मित्तल यांनी केले.





नाशिक येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या वतीने गुरुदक्षिणा सभागृहातील टी. ए. कुलकर्णी हॉलमध्ये गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभाच्या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख अतिथी या नात्याने त्या बोलत होत्या. याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून गोखले एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. आर. पी. देशपांडे, डॉ. एस. व्ही. संत, सुप्रसिद्ध सीए डॉ. विनायक गोविलकर उपस्थित गोते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोखले एज्युकेशन सोसायटीच्या सचिव व खजिनदार, मानव संसाधन संचालिका डॉ. दीप्ती देशपांडे उपस्थित होत्या. यावेळी कार्यक्रमाचे स्वागतपर मनोगत व प्रास्ताविक तसेच मान्यवरांचा परिचय संस्थेचे विभागीय सचिव डॉ. राम कुलकर्णी यांनी केले. गोखले एज्युकेशनच्या विविध शाळा व कनिष्ठ महाविद्यालत प्रथम आलेला एचएलए कनिष्ठ महाविद्यालय ओझर येथील विद्यार्थी रोहित चव्हाण ह्याला ९५ टक्के तर बोर्डी येथील चित्रे गुरुजी हायस्कूलमधील दहावीची विद्यार्थीनी युक्ती खरोडे हीला ९६.४० टक्के गुण प्राप्त झाले. त्यांना प्रमुख प्राहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे विशेष अतिथी डॉ. गोविलकर ह्यांनी देखील ह्या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना त्यांनी बुध्दी बरोबर मनाचाही विकास करा असे सांगितले. संस्थेच्या चेअरमन व कार्यक्रमाच्या विशेष अतिथी डॉ. संत यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी गोखले एज्युकेशन सोसायटीच्या विविध शाळा व महाविद्यालयातील १० वी व १२ वी तील गुणवंतांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी सत्कारार्थी विद्यार्थ्यांच्या वतीने रोहित चव्हाण व काव्या पाटील यांनी मनोगते व्यक्त केली. अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. दीप्ती देशपांडे यांनी सांगितले की, गोखले एज्युकेशन संस्था नेहमीच विद्यार्थ्यांना प्रेरणा देते व त्यांच्या पाठीशी उभी राहते. ह्या प्रसंगी त्यांनी स्वर्गीय सर डॉ.मो. स. गोसावींच्या स्मृतींना उजळा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. स्नेहा रत्नपारखी यांनी केले. तर आभार प्रा. प्रणव रत्नपारखी ह्यांनी मानले.

कार्यक्रमास आस्थापना संचालक शैलेश गोसावी, प्रकल्प संचालक डॉ. प्रदीप देशपांडे तसेच विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, विभागप्रमुख, देणगीदार, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, सत्कारार्थी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुधीर उमराळकर



नाशिक । सरकारने गोरगरिब, कष्टकरी आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत कॅन्सर रुग्णांच्या मोफत उपचारासाठी उभे केलेले संदर्भ सेवा रुग्णालय हे आज 'रुग्णालय' नसून भेसूर दलालखाना' बनल्याचे धक्कादायक वास्तव उघडकीस आले आहे. शासनाच्या पैशाने उभ्या राहिलेल्या रेडिओथेरपी यंत्रणेला जाणीवपूर्वक 'व्हेंटिलेटर'वर टाकून, त्या ठिकाणी येणाऱ्या हजारो रुग्णांना अक्षरशः मरणाच्या दारात ढकलणाऱ्या डॉक्टरांचा 'मर्डर बिझनेस' आता नग्न रूपात समोर येऊ लागला आहे. शासनाने 'लिनॅक'नावाची अत्याधुनिक रेडिओथेरपी यंत्रणा ४० कोटींच्या खर्चाने येथे उपलब्ध करून दिली आहे. परंतु येथील भ्रष्ट यंत्रणा 'तांत्रिक कारणांचे', 'कागदी घोडे नाचवत' आणि 'तज्ज्ञ उपलब्ध नाहीत' या बोथट कारणांच्या मागे लपत गेले कित्येक महिने रेडिओथेरपी यंत्रणा बंद ठेवण्यात आल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे. ही यंत्रणा बंद ठेवण्यामागे कॅन्सर तज्ज्ञ व इतर डॉक्टरांचा विशेष 'इंटरेस्ट' असल्याची चर्चा

## संदर्भ रुग्णालयातील धक्कादायक वास्तव

# कॅन्सरच्या नावावर लाखोंची लूट!

रुग्ण व नातेवाईकांमध्ये सुरू आहे. बंद असलेली यंत्रणा रुग्णालयातच सुरू असलेल्या 'कमिशनच्या काळ्या बाजाराचा परिणाम आहे, हे आता उघड झालं आहे.

**कॅन्सर रुग्णांचा जीव पणाला, खासगी हॉस्पिटल्ससाठी 'संपूर्ण रस्ते' खुले!**

रेडिओथेरपी न मिळाल्यामुळे कॅन्सर रुग्णांचे आयुष्य धोक्यात येते, हे माहित असूनही, संदर्भ रुग्णालयातील काही तज्ज्ञ डॉक्टर ठरवून मशीन बंद ठेवत असल्याचा आरोप केला जात आहे. मशीन बंद असल्याचे खोटे कारण देऊन हेच रुग्ण खासगी पंचतारांकित हॉस्पिटलमध्ये पाठवले जात असल्याचे वास्तव समोर आले आहे. यातूनच करोडोंच्या 'मासिक वाटपाचा' उगम होत आहे ! गोरगरिब रुग्णांना भिती दाखवून, त्यांच्यावर मानसिक दडपण टाकून, "तुम्हाला इथे उपचार शक्य नाहीत वेळ वाया घालवू नका,आमचे ओळखीचे हॉस्पिटल आहे..." असं सांगत, रुग्णालयातल्या काही 'तज्ज्ञ' आणि 'भोंदू स्टाफ'कडून अक्षरशः 'मरणाचा सौदा' सुरू असल्याचे दिसून येत आहे.

## • ४० कोटींचं मशीन बंद; पण डॉक्टरांचं ATM सुरू
## • संदर्भ सेवा रुग्णालयात चालतोय मरणाचा बाजार!

मशीन बंद, पण कमाई ऑन!' अशी काहीशी संदर्भ सेवा रुग्णालयातील परिस्थिती असून महिना ५० लाखांची कमाई केली जात असल्याचे बोलले जाते. दर महिन्याला किमान ५० ते ६० कॅन्सर रुग्ण या 'रिफर स्कीम'मध्ये अडकवले जातात. एका रुग्णामागे ८० हजार ते दीड लाख रुपये आकारले जातात, ज्यातून दरमहा जवळपास ५० लाखांची रक्कम काढली जाते. हे पैसे तज्ज्ञ डॉक्टर, टेक्निशियन आणि स्टाफ यांच्या खात्यात जमा होत असल्याची चर्चा आहे.ही कमाई रुग्णांच्या आजारातून नव्हे, तर त्यांच्या अडचणी, असहायता आणि मृत्यूच्या भयातून केली जात आहे. यापेक्षा मोठा गुन्हा, तज्ज्ञ डॉक्टरांची पाताळात गेलेली नीती आणि निर्लज्ज वर्तन नाशिकच्या वैद्यकीय इतिहासात याआधी कधी न बघितल्याने या बाबत संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. या सगळ्या घोटाळ्यावर अद्याप एकही शासकीय यंत्रणा हाललेली नाही.आरोग्य विभागाने देखील याबाबत धृतराष्ट्राची भूमिका घेतली आहे. आर्थिक गुन्हे शाखेने देखील पुढे येऊन कधीही कारवाई केली नाही तर लोकायुक्तांनी देखील कधीही लक्ष घातलं नाही. यामुळेच ही यंत्रणा निर्ढावल्याचे दिसून येत आहे. यामागे मोठे रॅकेट कार्यरत असल्याचा संशय व्यक्त केला जात असू हा काळा पैसा वरपर्यंत पोहोचवणारी वाटपाची स्वतंत्र यंत्रणा बिनधास्त सुरू असल्याची जोरदार चर्चा होत आहे.संदर्भ सेवा रुग्णालयाचा रेडिओथेरपी विभाग म्हणजे शासनाच्या पैशातून उभं राहिलेलं, पण खासगी हॉस्पिटल्सच्या भल्यासाठी चालणारं दलाली केंद्र असल्याचा संशय आता निर्माण झाला आहे. इथे जीव वाचवले जात नाहीत, तर पैसे कमावले जातात अशा संतप्त प्रतिक्रिया आता रुग्णांच्या नातेवाईकांमध्ये उमटत आहेत. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधित डॉक्टरांच्या बँक खात्यांची तपासणी करण्याची मागणी केली जात आहे. या सगळ्या प्रकाराचा तातडीने उच्चस्तरीय तपास होणे आवश्यक आहे. रेडिओथेरपीचे मशीन बंद का आहे? किती रुग्ण खासगी हॉस्पिटलमध्ये रेफर झाले? किती बिल आकारण्यात आले? आणि यामागच्या तज्ज्ञांचा किती वाटा खात्यात जमा झाला? यावर आता खऱ्या अर्थाने 'उपचार' होणे गरजेचे असल्याचे बोलले जाते त्यामुळे आता "इथे रुग्ण वाचत नाहीत, तर मेल्यानंतरही त्यांच्यावरचे बिल डॉक्टरांच्या पाकिटात पोहोचतं!" अशी काहीशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा वैद्यकीय गुन्हेगारीवर तातडीने नियंत्रण आणण्याची गरज आहे. जनतेचा विश्वास, शासनाचा पैसा आणि रुग्णांचा जीव या तिन्ही गोष्टींचा असा खेळ मांडणाऱ्या वैद्यकीय माफियांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

> **या प्रकरणी आरोग्य उपसंचालक डॉ. कपिल आहेर यांची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी कुठलाही प्रतिसाद दिला नाही.**

## ➤ महत्त्वाचे

### वर्ल्ड ऑलम्पिक डे जल्लोशात साजरा

**नाशिक** । महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने २३ जून जागतिक ऑलिंपिक डे म्हणून साजरा केला जातो. प्रत्येक राज्यात जिल्ह्यात रॅली काढून स्पर्धा घेऊन क्रीडाचे विशेष कार्यक्रम साजरे होतात. नाशिक मध्ये




गोल्फ क्लब ग्राउंडवर ऑलम्पिक डे साजरा करण्यात आला. त्यात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. तसेच रॅली काढण्यात आली. यावेळी नाशिक जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे समन्वयक राजेंद्र निंबाळते, जॉगर्स क्लबचे अध्यक्ष दीपक भोसले, शाहू खैरे, अशोक सावंत, दीपक भदाणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सदर कार्यक्रमात शिव छत्रपती अवार्ड विजेती ऋतिका गायकवाड, तन्वी देवरे (चव्हाण), सत्यजित बच्छाव, ईश्वरी सावकार, सागर बोडके, विजय पाटील, अनिल उगले, ओवी निकम, वेदांत भंडारी, साईना बोटे, अमोलिक शौर्य, मोहम्मद शेख, मानसी डगळे, अनुजा व अनुज उगले आदींचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पावसामुळे 200 ते 300 मुलांची रॅली कॅन्सल करण्यात आली. परंतु जॉगर्स व तरण तलाव सभासद तसेच वर्ल्ड स्पोर्ट्स शिक्षण सांस्कृतिक संस्था ट्रायथलॉन असोसिएशन, स्विमिंग असोसिएशन, वर्कर स्पोर्ट्स, सायकल असोसिएशन इत्यादी संस्थेचे पदाधिकारी हजर होते. यात सुनील गायकवाड, अशोक तांबे, रवींद्र सिंधीकर, भाऊसाहेब पाटील, विजय देशमुख,दिलीप हिंगमिरे, नंदू देसाई, हेमंत पाटील, राजेंद्र भावसार, कृष्णा नागरे, एन गाडगीळ, नंदू केशलानी, हेंमत पाटील, गोविंद काळे, रवी बेडसे, नाना आठवले, सौ व श्री अशोक वनरा, रतन सांगळे, सुनील कंसारा, संजय सनेर तसेच नाशिक क्रीडा अधिकारी कार्यालयातील संपूर्ण स्टाफ, संदीप ढाकणे, इतर शाळातील कोच, पदाधिकारी हजर होते. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता निनाद निंबाळते, श्रीराम सांगळे, नितीन निकुंभ, अनिकेत बदादे, आशिष निंबाळते अनिकेत वाघमारे, दर्शन बांते, तनुज शिरसाट, सनी बडगुजर आदींनी परिश्रम घेतले.

## खर्डे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नूतन इमारतीला डॉ. नूतन आहेर यांची भेट



**देवळा** । जि.प.च्या माजी सदस्या व खर्डे प्राथमीक आरोग्य केंद्र रुग्ण कल्याण समिती च्या सदस्या डॉ. नूतन आहेर,सुनील आहेर खाजगी कृषी मार्केटचे अध्यक्ष सुनिल (गोटूआबा) आहेर यांनी खर्डे येथील आरोग्य केंद्रास भेट देऊन येथे नव्याने होत असलेल्या प्रशस्त अशा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या बांधकामाची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

सदर आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम पूर्णत्वास आले असून लवकरच लोकार्पण करण्यात येणार आहे. सर्व सोयींनी युक्त असे खर्डे आरोग्य केंद्र रुग्णांसाठी वरदान ठरले असून, उपस्थित ग्रामस्थांनी माजी.जि.प. सदस्या डॉ.नूतन आहेर यांनी केलेल्या प्रयत्न व पाठपुरावा यामुळेच हे शक्य झाल्याचे मत व्यक्त करून त्यांचे आभार मानले. या आरोग्य केंद्राच्या अंतर्गत शेरी, वार्शी, हनुमंतपाडा, मुलुखवाडी, खर्डा, कनकापूर, वडाळे,वाजगाव आदी गावांचा समावेश आहे. यावेळी पी.के. आप्पा आहेर पतसंस्थेचे व्हा.चेअरमन किशोर खरोटे, वैद्यकीय अधिकारी डॉ जितेंद्र पवार, डॉ. खैरनार ,आरोग्य सेविका श्रीमती सानप, भाऊसाहेब देवरे, प्रहारचे उपजिल्हाध्यक्ष कृष्णा जाधव, सुभाष मोरे, समाधान देवरे, निंबा निकम, मोहन देवरे, भाऊसाहेब मोरे, विजय जगताप, नामदेव पवार, समाधान जाधव,चंद्रकांत पवार, सोनू शिंदे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## हिंदी भाषा सक्ती विरोधात उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे आंदोलन



**मनमाड** । रद्द करा.. रद्द करा.. हिंदी सक्ती रद्द करा... अशा घोषणाबाजी देत शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्यावतीने शासन निर्णयाची प्रत जाळून आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

भारतात सार्वत्रिक बोलल्या जाणाऱ्या भाषांपैकी मराठी भाषा आहे. त्यामुळे मराठी भाषेला अभिजात मराठी भाषेचा दर्जा देखील मिळाला आहे. २७ फेब्रुवारी हा जागतिक मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जात असतांना दुसरीकडे शालेय शिक्षणामध्ये हिंदी भाषेची सक्ती केली जात आहे. शासनाच्या निर्णयानुसार पहिलीपासून सर्व मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये तृतीय भाषा म्हणून हिंदी भाषा - केली आहे. या निर्णयाविरोधात राज्यात सर्वस्तरातून निषेध व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष शहर शाखेतर्फे उपरोक्त आंदोलन करण्यात आले असून महाराष्ट्र शासनाने हा निर्णय तात्काळ रद्द करावा, हिंदी भाषेची सक्ती रद्द करण्यात यावी, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. या आंदोलनात ग्रामीण जिल्हाप्रमुख प्रवीण नाईक, जिल्हा समन्वयक सुनील पाटील, महिला आघाडीच्या मुक्ताताई नलावडे, तालुकाप्रमुख संतोष गुप्ता, शहराध्यक्ष माधव शेलार, विनय आहेर, मायकल फर्नांडिस, अशोक पद्मर, खालीद शेख, शैलेश सोनवणे, पप्पू सूर्यवंशी, रवींद्र अमराळे, पप्पू शिनगारे, नाना सोळशे, भीमादादा गवळी, प्रकाश चावरीया, किशोर कदम आदी पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## विलास शिंदे अखेर एकनाथांच्या गोटात दाखल

### राजधानी मुंबईत शक्तिप्रदर्शनाने शिवसेनेत प्रवेश

**नाशिक** । शिवसेनेच्या ठाकरे गटातून अर्धचंद्र मिळालेल्या विलास शिंदे यांनी अखेर शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश केला. ठाणे येथे झालेल्या कार्यक्रमात पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विलास शिंदे यांच्या हाती भगवा दिला.

उबाठा पक्षातून पदावरून दूर केल्याने नाराज झालेले विलास शिंदे यांचे तळ्यात मळ्यात सुरू होते. अखेर त्यांनी त्या शिवसेनेतून या शिवसेनेत जाण्याचा निर्णय घेतला. रविवारी (दि. २९) एक हजारापेक्षाही अधिक वाहनांचा ताफा घेऊन ते हजारो समर्थक कार्यकर्त्यांसह प्रचंड शक्तिप्रदर्शन करीत ठाण्याला रवाना झाले. विलास शिंदे यांच्यासमवेत आठ माजी नगरसेवक, चार माजी जिल्हा परिषद सदस्य, सहा माजी पंचायत समिती सदस्य, तीसपेक्षा अधिक सरपंच आणि शेकडा पदाधिकारी आणिकार्यकर्त्यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला.



ठाणे येथील कियारा बँकवेट हॉल येथे हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, भाऊसाहेब चौधरी, नरेश म्हस्के, माजी खासदार हेमंत गोडसे, विजय करंजकर, चंद्रकांत लवटे, प्रवीण तिदमे, भाऊलाल तांबडे, विक्रम नागरे, योगेश शेवरे, अनिल ढिकले, आदींसह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

### शिवसेनेतून शिवसेनेत...

पक्ष प्रवेशानंतर बोलताना विलास शिंदे म्हणाले की, कार्याचे मूल्यमापन होत नसल्याची खंत नेहमीच जाणवत होती. पक्षप्रमुख तथा वरिष्ठ नेत्यांकडे कानपिचक्या करणाऱ्या मंडळींनी कधीच आपल्या कार्याची माहिती दिली नाही. खरी माहिती दिली तर आपली किंमत कमी होईल, असा या मंडळींना धाक वाटत असावा, असे खरपूस तोंडसुखही त्यांनी यावेळी घेतले. म्हणून त्या शिवसेनेतून खऱ्या अर्थाने बाळासाहेबांच्या विचाराने चालणाऱ्या शिवसेनेत गेल्याचे उबाठामधून नारळ मिळालेले विलास शिंदे सांगितले. प्रामाणिक काम करूननही नेहमीच डावलले गेल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले. स्वाभिमान दुखावल्याने माझ्यासारख्या अनेक निष्ठावंत शिवसैनिकांनी ती शिवसेना सोडून ही शिवसेना स्वीकारली, असेही ते म्हणाले.

# आणीबाणीचा धडा...

तत्कालीन पंतप्रधान व काँग्रेस पक्षाच्या सर्वोच्च नेत्या इंदिरा गांधींनी देशावर लादलेल्या आणीबाणीला यंदा पन्नास वर्षे पूर्ण झाली. दि. २५ जून १९७५ च्या मध्यरात्रीपासून देशात आणीबाणी जारी झाली आणि एकवीस महिने देशावर केंद्र सरकारची दहशत होती. या काळात निवडणूका रद्द झाल्या, व्यक्तिस्वातंत्र्य व विचार स्वातंत्र्यावर घाला घालण्यात आला, वृत्तपत्रांना सेन्सॉरचा गळफास लावण्यात आला आणि देशभरातील विरोधी पक्षांचे हजारो नेते व प्रमुख कार्यकर्ते तुरुंगात डांबण्यात आले. आणीबाणीचे एकवीस महिने हा देशाच्या इतिहासात काळा चॅप्टर होता. जनभावना व जनप्रक्षोभ लक्षात घेऊन काँग्रेस पक्षाला आणीबाणीबद्दल नंतर जाहीरपणे माफी मागावी लागली. गेली अकरा वर्षे केंद्रात व देशातील वीस राज्यांत सत्तेवर असलेल्या भारतीय जनता पक्षाने आणीबाणीच्या पन्नास वर्षे पूर्ण झाली म्हणून २५ जून हा संविधान हत्या दिवस म्हणून देशभर साजरा केला.

१९७१ च्या लोकसभा निवडणुकीत इंदिरा गांधी व काँग्रेस पक्षाला चांगले यश मिळाले होते. मात्र केंद्रात सत्ता मिळाल्यानंतर केंद्र सरकार वेगवेगळ्या कारणांमुळे संकटात सापडले. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धाने देशावर खर्चाचा बोजा खूप वाढला. १९७३ मध्ये जगभरातील इंधन टंचाईचा फटका भारताला मोठा बसला. महागाई खूप वाढली. भ्रष्टाचारही शिगेला पोहोचला आणि अर्थव्यवस्थेवरही परिणाम झाला. त्याचवेळी म्हणजे १९७४ मध्ये गुजरातमध्ये काँग्रेसचे मुख्यमंत्री चिमणभाई पटेल यांच्या भ्रष्ट कारभाराच्या विरोधात विद्यार्थ्यांच्या नवनिर्माण आंदोलन तीव्र केले. गुजरातमध्ये नवनिर्माण आंदोलनाचा भडका उडाल्याने चिमणभाई सरकाराला राजीनामा देणे भाग पडले. त्यातून बिहारमध्ये विद्यार्थी आंदोलनाला स्फूर्ती मिळाली. बिहारमध्ये समाजवादी व उजव्या विचारसरणीच्या संघटनांनी एकत्र येऊन तेथील काँग्रेस सरकारच्या विरोधात छात्र संघर्ष समिती स्थापन केली. भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाचे नेतृत्व लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्याकडे आले व आंदोलनाला आणखी धार चढली. जयप्रकाश नारायण हे गांधीवादी व चले जाव चळवळीत आघाडीवर होते. दि. ५ जून रोजी पाटणा येथे गांधी मैदानावर झालेल्या विराट जनसभेत त्यांनी संपूर्ण क्रांतीचा नारा दिला. छात्र संघर्ष समितीच्या आंदोलनाने संपूर्ण बिहारमधील जनजीवन ठप्प झाले होते. त्याच वर्षी, मे १९७४ मध्ये कामगार नेते जॉर्ज फर्नांडिस यांनी देशभर रेल्वे कर्मचारी संप पुकारून रेल्वेचा चक्का जाम केला. १९७४ व १९७५ मध्ये सर्व देशात असंतोष, अस्वस्थता व केंद्र सरकारविरोधात संताप प्रकट होऊ लागला. सारा देश जयप्रकाश नारायण यांच्याकडे मोठ्या आशेने बघू लागला. दि. १२ जून १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांना दोषी ठरवले व १९७१ मध्ये त्यांनी लढवलेल्या निवडणुकीत भ्रष्टाचार व सत्तेचा दुरुपयोग केल्याचा ठपका ठेवला. तसेच त्यांना सहा वर्षांकरिता निवडणूक लढवण्यास बंदी घालण्याचाही आदेश दिला. मात्र या निकालाविरोधात त्यांना सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यास मुभा देण्यात आली. न्यायालयाने त्यांना पंतप्रधानपदावर राहण्यास मुभा दिली पण संसदीय कामकाजात भाग घेता येणार नाही, असे बजावले. या निकालाने सर्व देशभर इंदिरा गांधींच्या विरोधात वातावरण तप्त झाले.

दि. २५ जून १९७५ रोजी दिल्लीतील ऐतिहासिक रामलीला मैदानावर विरोधी पक्षांची विराट सभा झाली. देशातील दिग्गजांनी सरकार विरोधी भाषणे करून इंदिराजींच्या सत्तेला हादरे दिले. या सभेला अलोट व अफाट गर्दी जमली होती. याच सभेत इंदिरा हटावचा निर्धार विरोधी नेत्यांनी बोलून दाखवला. दिल्लीचे पूर्वाश्रमीचे जनसंघाचे स्थानिक नेते मदनलाल खुराणा यांनी या सभेचे आयोजन करण्यात पुढाकार घेतला होता. काँग्रेस (ओल्ड)चे शांती देसाई, विद्यार्थी परिषदेचे अरुण जेटली, आदी युवा नेते हजर होते. मदनलाल खुराणा यांनी तर खचाखच गर्दीने भरलेल्या सभेत जेव्हा, हम सें जो टकराये गा, अशी घोषणा दिली तेव्हा प्रतिसाद म्हणून उपस्थित असलेल्या हजारोंनी, चूर चूर हो जाएगा असा एक सुरात बुलंद आवाज दिला. प्रकाश सिंह बादल यांनी पंजाबीतून भाषण करून इंदिरा गांधींना आता राजीनामा द्यावा अशी थेट मागणी केली. लालकृष्ण अडवाणी, आचार्य कृपलानी, राज नारायण, विजयालक्ष्मी पंडित, चरणसिंग, चंद्रशेखर अशा ताकदवान नेत्यांनी सभा गाजवली. अटलबिहारी वाजपेयी यांचे नाव पुकारताच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. रामलीला मैदानावरील अभूतपूर्व गर्दी पाहून १ सफदरजंग रोडवर राहणारे अस्वस्थ झाले असतील असे ते म्हणाले. वाजपेयी म्हणाले - सभेची अफाट गर्दी पाहूनच सरकारने जनतेचा विश्वास गमावला आहे, हे त्यांना (इंदिरा गांधींना) कळून चुकले आहे... वाजपेयींचे भाषण संपल्यावर गर्दीतून देश को बचाना है, इंदिरा को हटाना है, अशा बुलंद घोषणा दिल्या गेल्या. याच सभेत जयप्रकाश नारायण यांचे ८५ मिनिटे भाषण झाले. इंदिरा गांधींनी राजीनामा दिलाच पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट बजावले. सिंहासन खाली करो, की देश की जनता आती है... असा इशारा याच सभेत देण्यात आला. सैन्य दलाने, पोलिसांनी आणि सरकारी कर्मचाऱ्यांनी सरकारचे बेकायदेशीर व नियमबाह्य आदेश पाळू नयेत असे आवाहन याच सभेत जयप्रकाश नारायण यांनी केले. देशात लोकशाही वाचविण्यासाठी जेलमध्ये जाण्याची तयारी आहे का, असे त्यांनी लोकांना विचारताच हजारोंच्या जनसमुदायाने हात उंचावून प्रतिसाद दिला... जयप्रकाशजींच्या भाषणानंतर काही तासातच मध्यरात्रीनंतर देशात आणीबाणी जारी झाली आणि विरोधी नेत्यांची देशभर धरपकड सुरू झाली.

राष्ट्रनामा



सुकृत खांडेकर
९५९४२२४०००
sukritforyou@gmail.com

दि. २५ जून १९७५ ते २१ मार्च १९७७ या आणीबाणीच्या काळात सर्व घटनात्मक व प्रशासकीय अधिकार केंद्र सरकारकडे एकवटलेले होते. देशातील राज्य सरकारे बरखास्त झाली नाहीत पण सर्व राज्यांवर केंद्र सरकारचे कठोर नियंत्रण होते. विरोधी पक्षांचे प्रमुख नेते व १ लाख १२ हजारांहून अधिक कार्यकर्ते यांना आणीबाणीच्या काळात जेलमध्ये डांबण्यात आले होते. मिसा (अंतर्गत सुरक्षा कायदा), डिफेन्स ऑफ इंडिया रूल (डीआयएसआयआर), कॉन्झर्व्हेशन ऑफ फॉरेन एक्स्चेंज अँड प्रिव्हेन्शन ऑफ स्मगलिंग ॲक्टिव्हिटीज ॲक्ट (कॉफेपोसा) अशा कायद्यांचा वापर करून विरोधी पक्षांच्या नेत्यांना जेरबंद करण्यात आले. बहुसंख्य विरोधी नेते व कार्यकर्ते यांना मिसाखाली जेलमध्ये टाकण्यात आले होते. आणीबाणीत स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकारावरच गदा आली होती. रामनाथ गोयंका यांच्या मालकीच्या इंडियन एक्स्प्रेसने आणीबाणीला उघड विरोध दर्शविण्याची हिम्मत केली होती. आणीबाणी लादली गेल्यावर या वृत्तपत्राने निषेध म्हणून अग्रलेखाची जागा कोरी सोडली होती. आमची भूमिका मांडायला सरकारने बंदी घातली आहे, हाच संदेश इंडियन एक्स्प्रेसने देशाला दिला. वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य काढून सेन्सॉरशिप लादली जाणार असेल, तर इंडियन एक्स्प्रेस केवळ पत्र राहील, वृत्तपत्र नाही... अशी खंत रामनाथ गोयंका यांनी व्यक्त केली होती.

आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींचे पुत्र संजय गांधी यांनी पाच कलमी कार्यक्रम जाहीर केला. कुटुंब नियोजन व झोपडपट्टी निर्मूलन याचा त्यात समावेश होता. एप्रिल १९७६ मध्ये दिल्लीतील तुर्कमान गेट येथे बुलडोझर चालवून झोपडपट्टी हटविण्याचा प्रयत्न झाला तेव्हा झालेला विरोध मोडून काढण्यासाठी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात अनेकांचा मृत्यू झाला. सरकारी कर्मचाऱ्यांची कुटुंब नियोजनाचा धडक कार्यक्रम राबवला गेला. विशेषत: उत्तरेतील हिंदी भाषिक राज्यात पुरुषांना नसबंदी करण्याची सक्ती करण्यात येत होती. नसबंदी प्रमाणपत्र नसेल, तर ट्रक चालकांना वाहन चालविण्याचा परवाना मिळणार नाही असेही अनेक ठिकाणी घडले. नसबंदीला होणारा विरोध मोडून काढण्यासाठी उत्तर प्रदेशमधील मुजफ्फरनगर येथे गोळीबार झाला. त्यातही बरेच लोक मरण पावले. १९७६ मध्ये लोकसभा निवडणूक होणे अपेक्षित होते, पण आणीबाणीच्या काळात लोकसभेची मुदत एक वर्षाने वाढविण्यात आली.

देशात काँग्रेसला अनुकूल वातावरण आहे, असा समज झाल्याने इंदिराजींनी १९७७ मध्ये मार्च महिन्यात आणीबाणी उठवली. प्रत्यक्षात लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे पानिपत झाले व विरोधी पक्षांची मोट बांधलेल्या जनता पार्टीचे केंद्रात सरकार स्थापन झाले. काँग्रेस (ओल्ड), समाजवादी, भारतीय लोकदल व जनसंघ, या पक्षांनी एकत्र येऊन स्थापन झालेल्या जनता पार्टीचे सरकार आले व मोरारजी देसाई हे पहिले बिगर काँग्रेसचे पंतप्रधान झाले. जनता पार्टी सरकारने आणीबाणीची न्यायालयीन चौकशी नेमली. आणीबाणीने काँग्रेसची मोठी घसरण झाली. स्वातंत्र्यानंतर देशावर काँग्रेसची असलेली मक्तेदारी आणीबाणीने संपवली. प्रमुख विरोधी पक्ष एकत्र आले तर काँग्रेसचा पराभव होतो हे सिद्ध झाले. इंदिरा इज इंडिया म्हणणाऱ्यांना आणीबाणीने चपराक दिली. पन्नास वर्षानंतरही काँग्रेसला संविधानाची हत्या केल्याचे फटकारे सहन करावे लागत आहेत.

आणीबाणीनंतरचा जनता पार्टीचा प्रयोग फसला. जनसंघी व समाजवाद्यांचे फार काळ एकत्र राहणे जमले नाही. पूर्वाश्रमीच्या जनसंघीवासीयांनी वाजपेयी - अडवाणींच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीची स्थापना केली. दुसरीकडे जनता पार्टीची अनेक शकले झाली. आणीबाणीत जेलमध्ये राहिलेले चंद्रशेखर, जॉर्ज फर्नांडिस, प्रमोद महाजन, वेंकय्या नायडू, लालू प्रसाद यादव, मुलायमसिंह यादव, शरद यादव, नितीश कुमार, अरुण जेटली, राम विलास पासवान, अनंतकुमार, जयपाल रेड्डी असे त्यावेळचे अनेक युवा नेते राष्ट्रपातळीवर पोहोचले. देशात निर्माण होत असलेल्या अराजकाला रोखण्यासाठी इंदिरा गांधींनी आणीबाणी आणली, असा युक्तिवाद काँग्रेस आजही करीत आहे. गेल्या अकरा वर्षांपासून देशात अघोषित आणीबाणी आहे असे राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे, जयराम रमेश आदी काँग्रेस नेते रोज मोदी सरकारवर आरोप करीत आहेत.

# जी ७ परिषदेचे मर्यादित यश

जी सेवन म्हणजे ग्रुप ऑफ सेव्हन. सात प्रमुख औद्योगिक विकसीत राष्ट्रांचा गट. या गटात फ्रान्स, संयुक्त अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, जपान, इटली, व कॅनडा आणि सदस्य नसलेला युरोपियन युनियन (युरोप मधील २७ देशांचा समुह)हे आहेत. या सात राष्ट्रांचा अनौपचारिक रित्या चर्चा करण्याचा हा मंच आहे.

स्थापना

१९७० मध्ये आलेले ऊर्जा संकट, त्यानंतर आलेला विनिमय दरातील चढ उतार, जागतीक मंदी, अविकसित देशांच्या समस्या, या सर्व समस्यांवर विचारविनिमय व उपाययोजना म्हणून १९७३ साली फ्रान्स, संयुक्त अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, जपान व इटली या सहा राष्ट्रांच्या या गटाची स्थापना करण्यात आली. व जी ६ या नावाने तो ओळखला जाऊ लागला. १९७६ मध्ये कॅनडाला सदस्यत्व दिल्याने जी ७ झाले. पुढील वर्षी रशियाचा समावेश झाला म्हणून जी८ झाले. २०१४ मध्ये क्रिमीयावर केलेल्या आक्रमणामुळे रशियाचे सदस्यत्व स्थगित करण्यात आले व रशिया शिवाय सात राष्ट्रांची बैठक घेण्याचे ठरले. त्यामुळे ग्रुप पुन्हा जी ७ झाला. १९९९ मध्ये जी ट्वेंटी या गटाची स्थापना झाली. त्यात विस राष्ट्रांचा समावेश असल्यामुळे जी ७ चे महत्व थोडे कमी झाले त्यामुळे काही संस्था अथवा राष्ट्रांना परिषदेत आमंत्रित करण्याचे ठरले.

उद्दिष्ट

सदस्य राष्ट्रांच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक बाबतीत स्थैर्य, तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्या साठी उपाययोजना, लोकशाही तत्वाचे पालन व मानवा अधिकारा ची जपणूक, जागतीक शांतता ,सदस्या राष्ट्रा मधील परस्पर सहकार्य समन्वय वाढवणे, गरीब व विकसनशील राष्ट्रांच्या प्रगतीचा विचार,सदस्य राष्ट्रांच्या विकासासाठी मदत करणे, आरोग्य समस्या, शिक्षण, तंत्रज्ञान, विकास आदी विषयावर चर्चा करून प्रगतीच्या दृष्टिकोनातून उपाययोजना करणे,आदी उद्दिष्टे आहेत.

कार्यपद्धती

या परिषदेचे स्वतःचे कायम स्वरूपाचे सचिवालय कोठेही नाही. अध्यक्ष पद दरवर्षी फिरते असून त्याचा क्रम फ्रान्स, संयुक्त राष्ट्र, इंग्लंड, जर्मनी, जपान, इटली, कॅनडा असा आहे, ज्याच्याकडे अध्यक्ष पदाची जबाबदारी असते, तोच आयोजन करतो. परिषदेचे आयोजन दर वर्षातून एकदा केले जाते. निर्णय एकमताने घेतल्या जातो, बहुमताने नाही. घेतलेले निर्णय कायदेशीररित्या बंधनकारक नसले तरी जगाच्या राजकारणात आर्थिक ,सामाजिक व राजकीय क्षेत्रात प्रभाव पाडतात.

कॅनडातील ५१ वी परिषद

जी सेवन ची २०२५ मधील ५१ वी परिषद कॅनडाच्या अल्बर्टा राज्यातील कनानास्किस मध्ये संपन्न झाली. यासाठी सहभागी राष्ट्रांच्या तसेच आमंत्रित राष्ट्रांच्या प्रमुखासह नाटो चे प्रमुख मार्क रूट्टे उपस्थित होते. यात जागतीक शांतता, जागतिक सुरक्षा, मजबूत अर्थव्यवस्था, डिजिटल पद्धतीतील बदल, आदी वर विषयावर चर्चा झाली. या चर्चेत जी सात राष्ट्रा शिवाय, आमंत्रित म्हणून ऑस्ट्रेलिया, मेक्सिको, ब्राझील, दक्षिण आफ्रिका, युक्रेन, भारत, आदींनी भाग घेतला २०१८ पासून भारत सतत या परिषदेत आमंत्रित म्हणून हजर राहत आहे.

परिषदेतील भारताची स्पष्ट भूमिका

दहशतवाद हा जागतिक धोका असून त्या विरोधात सर्वांनी एकत्र येऊन कारवाई करणे आवश्यक आहे. दहशतवादी कारवाया करणारा देश व त्याला त्याचे समर्थन करणारा देश या दोन्ही देशांना त्याची किंमत मोजावी लागेल. असे मोदीने स्पष्ट सांगितले. तसेच जागतिक शांती व समृद्धीसाठी आपल्या विचार व धोरणात स्पष्टता असावी एका बाजूला दहशतवादाविरुद्ध बंदी घालणे व दुसऱ्या बाजूला दहशतवादाला उघडपणे समर्थन करणे अशी धोरणे बंद व्हायला हवीत.

आर्थिक दृष्ट्या अल्पविकसित असलेल्या देशांचा म्हणजे ग्लोबल साऊथ देशांचा (यात दक्षिण अमेरिका व कॅरेबियन तसेच अनेक आफ्रीकन व आशियाई देशांच्या समावेश आहे) आवाज जागतिक व्यासपीठावर पोहोचविणे ही भारत आपली जबाबदारी समजतो. तसेच यांच्या चिंता व गरजा यावर लक्ष देण्याचे त्यांनी आवाहन केले. गेल्या काही वर्षापासून बिघडलेले भारत व कॅनडांचे संबंध व व्यापार सुरळीत करण्यावर भर देण्याचे दोघांनीही ठरविले. व नवीन उच्चायुक्तांची नेमणूक करण्यावर दोघांचीही सहमती झाली ही एक भारताच्या दृष्टिकोनातून बरी उपलब्ध म्हणावी लागेल.

परिषदेतील चर्चीत विषय

परिषदेने काढलेल्या निवेदनात इस्राइलला स्वसंरक्षणाचा हक्क असल्याचे मान्य करून त्याला पाठिंबा देण्यात आला. इराणला अण्वस्त्रधारी न होऊ देण्यावर भर् देण्यात आला. रशिया युक्रेन वादात सहाही राष्ट्रांनी युक्रेनला पाठिंबा दर्शविला आहे.तसेच युक्रेनला अधिक मदत करण्याचाही निर्णय घेण्यात आला. मिडल ईस्ट मध्ये शांतता ठेवणे, भारत व कॅनडा मधील परस्पर व्यापार संबंध सुरळीत करण्याच्या हेतुने वाटचाल, तसेच दोन्ही राष्ट्रातील उच्चायुक्तांच्या नेमणुकीवर भर देण्यात आला.हवामानातील बदल,जागतीक अर्थव्यवस्था, चीनच्या वाढत्या प्रभावा बाबत सावध चर्चा झाली.हरित ऊर्जा, तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणूक वाढविण्यावर भर देण्यात आला.

इजराइल इराण, युक्रेन रशिया, यांच्या मधील संघर्षावर चर्चा झाली. मात्र गाजा हमास यावर चर्चा झाली नाही. तसेच विकसनशील राष्ट्रासाठी ठोस आर्थिक मदत, हवामान बदला मधील स्पष्ट कृती योजना, जागतिक दारिद्र्य निर्मूलनासाठी उपाययोजना,आरोग्य, मानवाधिकार याबाबतही कोणतेही ठोस निर्णय झाले नाहीत. याशिवाय अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे मधूनच निघून जाणे आणि त्यांनी सुरू केलेले टेरीफ युद्धा चाही प्रभाव जी ७ वर पडल्याचे जाणवत होते.

त्यामुळे कॅनडात झालेल्या जी सेवन राष्ट्राच्या परिषदेला मर्यादित यश मिळाले असे म्हणावे लागेल.

जी ७ या परिषदे च्या यशस्वीते बाबत मत भिन्नता असली तरी भारताच्या दृष्टीने भारत व कॅनडाशी बिघडलेले संबंध सुरळीत होण्याच्या दृष्टीने बोलणी झाली आहे ही भारतासाठी एक उपलब्धी म्हणावी लागेल.

**भालचंद्र ठोंबरे**
**९८३४३५०८९५**

# सांख्यिकी: आधुनिक भारताची दिशा ठरवणारे विज्ञान

२९ जून आधुनिक भारतीय संख्याशास्त्राचे जनक, इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटचे संस्थापक प्रो. प्रशांतचंद्र महालनोबिस यांचा जन्मदिवस. हा दिवस राष्ट्रीय सांख्यिकी दिन म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या कार्याचा आणि आजच्या काळात आकडेवारीने व्यापलेल्या जगाचा आढावा घेणे आजच्या घडीला अत्यंत महत्त्वाचे आहे.



प्रो. महालानोबिस यांचे योगदान:

१९१२ मध्ये कोलकात्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमधून भौतिकशास्त्रात पदवी घेतल्यानंतर इंग्लंडमध्ये शिक्षण घेत असताना त्यांना संख्याशास्त्राची गोडी लागली. यानंतर त्यांनी आपले संपूर्ण जीवन संख्याशास्त्राच्या अध्ययन अध्यापनासाठी वाहून घेतलं. भारतात परतल्यावर त्यांनी भारतातील विद्यापीठामध्ये संख्याशास्त्र विषय सुरु केला. त्यांच्या प्रयत्नाने आणि पुढाकाराने आपल्या देशात अल्पावधीतच जागतिक दर्जाचे काम सुरु झाले आणि अन्य देशांच्या तुलनेत भारत हा संख्याशास्त्र विषयात प्रगत झाला. महालानोबिस यांनी केवळ शिक्षण आणि संशोधनात नव्हे, तर शासकीय धोरणनिर्मितीतही आकडेवारीचे स्थान प्रस्थापित केले. त्यांनी स्थापलेली इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट संस्था आजही संख्याशास्त्र क्षेत्रात जागतिक मान्यता प्राप्त आहे. 'महालानोबिस अंतर' या त्यांच्या संशोधनामुळे विविध क्षेत्रात गटांमधील अंतर मोजण्याची प्रभावी पद्धत मिळाली.हवामानशास्त्र, पर्जन्यमान, पूरनियंत्रण, धरण बांधणी यामध्ये आकडेवारीचा वापर त्यांनी करून दाखवला. 'राष्ट्रीय नमुना पाहणी संघटना' आणि 'केंद्रीय संख्याशास्त्रीय संघटना' यांच्या स्थापनेमागे त्यांचा मोलाचा वाटा होता.भारतातील पहिला संगणक १९५६ मध्ये इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट मध्ये बसवण्याचे श्रेयही त्यांच्याकडे जाते.

आजचा संदर्भ: कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा आणि संख्याशास्त्र

आज आपण कृत्रिम बुद्धिमत्ता, मशिन लर्निंग, बिग डेटा या शब्दांनी परिचित झालो आहोत. पण यामागील मुळ संकल्पना म्हणजे आकडेवारी आणि संख्याशास्त्रच !आरोग्यसेवा, औषधांची परिणामकारकता, अर्थव्यवस्था, हवामान अंदाज, कृषी, जलव्यवस्थापन, शिक्षण आणि अगदी इंटरनेटवरील वर्तन (युजर बिहेवियर) समजून घेणे हे सर्व आकडेवारीशिवाय अशक्य आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता व डेटा सायन्समध्ये संख्याशास्त्राच्या संकल्पना जसे की प्रायिकता, रिग्रेशन, सॅम्पलिंग, क्लस्टरिंग यांचा मोठा वापर होतो.धोरण आखताना सरकार किंवा कंपन्या 'डेटा ड्रिव्हन डिसिजन' घेतात त्यामागे आहे संख्याशास्त्र.

सांख्यिकीची वाढती गरज आणि भविष्य

केंद्रीय लोकसेवा आयोग अंतर्गत इंडियन स्टॅटिस्टिकल सर्विसेस ही परीक्षा घेतली जाते.उद्योग, बँकिंग, विमा, माहिती तंत्रज्ञान, उत्पादन, वाहतूक, पर्यावरण, जैवविज्ञान इत्यादी क्षेत्रात डेटा ॲनालिस्ट्स आणि स्टॅटिस्टिशियन (संख्याशास्त्रज्ञ )ची गरज झपाट्याने वाढते आहे.संख्याशास्त्र हे फक्त सूत्रांचे किंवा आकड्यांचे नव्हे, तर अचूक निर्णय घेण्याचे विज्ञान आहे.

तरुणांसाठी संदेश

हल्ली अनेक युवा आकडेवारीकडे कोरडा विषय म्हणून पाहतात. पण हेच शास्त्र जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राशी निगडीत आहे. संख्याशास्त्र स्वीकारा कारण भविष्य हे डेटा आणि बुद्धिमत्तेचे आहे.प्रो. महालानोबिस यांनी दाखवलेला मार्ग आज भारताला आत्मनिर्भर आणि वैज्ञानिक दृष्ट्या सक्षम बनवतो आहे. आजचा 'राष्ट्रीय सांख्यिकी दिन' हा केवळ गौरवाचा नाही, तर नव्या संधींचा विचार करण्याचा दिवस आहे. राष्ट्रीय सांख्यिकी दिनाच्या सर्वांना शुभेच्छा !

**प्रा. विजय कोष्टी,**
**कवठे महांकाळ (जि. सांगली).**

## राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने

# विधिमंडळाचे अधिवेशन फलदायी ठरो!

राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन आजपासून सुरु होत आहे. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर पार पडणाऱ्या या पावसाळी अधिवेशनात सरकारवर आरोपांचाच पाऊस पडण्याची अधिक शक्यता आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी, अवकाळी पावसामुळे वाया गेलेल्या शेतपिकांची नुकसानभरपाई, शक्तिपीठ महामार्गाला ठिकठिकाणी होत असलेला विरोध, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लांबल्यामुळे पावसाच्या आरंभी शहरांची झालेली दुर्दशा, रस्त्यांवरील खड्डे, पुण्यातील वैष्णवी हगवणे यांचा हुंडाबळी, राज्यातील स्त्री अत्याचाराचा वाढत आलेख, लाडक्या बहिणींना वाढीव पैसे केव्हा मिळणार ?, पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रासह देशातील २६ पर्यटकांची झालेली हत्या, पुण्यातील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळण्याची घटना आणि सध्या गाजत असलेला विषय म्हणजे शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती या सर्व प्रश्नांवर विद्यमान मंत्र्यांना घेरण्याची पुरती तयारी विरोधी पक्षांनी केली आहे. अर्थात हे सर्व अपेक्षितच असल्याने सरकारमधील संबंधित मंत्री आणि मुख्यमंत्री यांनीही या सर्व प्रश्नांना उत्तरे देण्याची तयारी केली असेलच.



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई**
**मो.क्र. ९६६४५५९७८०**

राज्यातील सामान्य जनतेच्या प्रश्नांवर आणि समस्यांवर सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यांनी एकत्रितपणे सारासार चर्चा करून त्यावर ठोस उपाययोजना काढण्याच्या दृष्टीने भरवण्यात येणाऱ्या अधिवेशनांच्या एकूण कालखंडात साधक-बाधक चर्चा नेमकी किती काळ होते ? अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासूनच विरोधी पक्षाची मंडळी अधिवेशन चालू न देण्याच्याच तयारीत असतात. जनतेचे कोणते प्रश्न सभागृहात मांडायचे यापेक्षा सरकारला कोंडीत कसे पकडायचे यामध्येच यांना अधिक स्वारस्य असते. सभागृहाच्या प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन करणे, अधूनमधून सभात्याग करणे, चर्चेच्या कालावधीत आरडाओरड आणि घोषणाबाजी करत गोंधळ घालणे यांसारख्या प्रकारांमुळे अधिवेशन काळात सभागृहाला रणांगणाचे स्वरूप आलेले असते. यामध्ये गैरवर्तणुकीमुळे अनेकदा काही आमदारांचे निलंबन करावे लागते. मग पुन्हा निलंबन कसे नियमबाह्य आहे, विरोधी आमदारांचे निलंबन करून सरकार कसा जनतेचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहे, यासाठी पुन्हा सरकारविरोधात निदर्शने, घोषणाबाजी केली जाते. जनतेचे प्रश्न राहिले बाजूला एकमेकांची उणीधुणी काढण्यातच अधिवेशनाचे सूप वाजते.

अधिवेशनाच्या काळात सभागृहाला आलेले आखाड्याचे स्वरूप पाहता असा गोंधळ घालण्यासाठी आमदारांना आपण निवडून देतो का हा प्रश्न कोणत्याही सामान्य मतदाराला पडल्यावाचून राहात नाही. वर्षातून तीन वेळा ही अधिवेशने भरवली जातात. प्रत्येक अधिवेशनासाठी सरकार कोट्यवधी रुपये खर्च करते. कष्टकरी सामान्य जनतेच्या घामाच्या मिळकतीतून कररूपाने सरकार दरबारी जमा होणारा हा पैसा असतो. त्याचा विनियोग व्हायला नको का ? सामान्य नागरिकांवर ओढवलेल्या नैसर्गिक आणि कृत्रिम संकटांवर सरकारने योग्य तो मार्ग काढावा, सामान्य जनतेच्या मूलभूत गरजा पुरवण्यात येणाऱ्या अडथळ्यांवर उपाययोजना काढाव्यात, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा मिळाव्यात, युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, राज्यात कायदा आणि सुव्यवस्था यांचे पालन व्हावे. स्त्रियांचे रक्षण व्हावे, सरकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचाव्यात, आरोग्य व्यवस्थेबाबत सुसूत्रता असावी , एखाद्या गंभीर मुद्याबाबत स्वतंत्र कायदा करण्याची आवश्यकता असल्यास त्याबाबत विचारविनिमय घडवून आणणे, प्रचलित कायद्यात काही सुधारणा करायची असल्यास त्यावर सविस्तर अभ्यास करणे आणि या सर्वांच्या सुयोग्य नियोजनासाठी एकमेकांची मते जाणून घेणे यासाठी अधिवेशन ही संधी असते; मात्र या संधीकडे सरकारला नामोहरम करण्याची पर्वणी म्हणून पहिले जात आहे. हे केवळ राज्यात घडते असे नव्हे. संसदेच्या प्रत्येक अधिवेशन काळातही हीच प्रथा राबवली जाते. गेल्या काही वर्षांतील या अधिवेशनांची फलश्रुती पाहता ती नगण्यच आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सभागृहातील गोंधळ थांबवताना आणि आमदारांना शिस्तीचे धडे देताना सभागृहाच्या अध्यक्षांचा कस लागतो, त्यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागतो, काहीवेळा तर गोंधळ थांबवण्यासाठी पोलिसांनाही पाचारण करावे लागते. यापुढेही अधिवेशन काळात हेच घडणार असेल तर ही खर्चिक अधिवेशने हवीत तरी कशाला ?

# राज्यकर्त्यांनी व पालकवर्गांनी आपली मानसिकता बदलली पाहिजे !

नुकत्याच शाळा सुरू झाल्या आहेत.मुलांचे प्रवेश सोशल मिडीयावर धुमाकूळ घालीत आहेत. मुलांचे प्रवेश उत्सव कसे आकर्षक, भारदस्त आणि नाविन्यपूर्ण होतील याकडे शाळा व्यवस्थापन लक्ष देते आहे.मराठी माध्यमांच्या शाळा यात मागे नाहीत.प्रवेश उत्सव हा खरा तर आनंदोत्सवच आहे.लहान मुलांना शाळेची ओढ असते.चारचौघे समवयस्क मिळतात याचा मुलांना आनंद होत असतो.यात पालकांची भुमिका ही महत्वाची असते.मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये ड्रेस,पुस्तके आणि दुपारचे भोजन हे मुफ्त असते. याचा संपुर्ण खर्च राज्य सरकार करते. या सर्व सुविधा वेळेवर मिळाल्या तरच मुलांचा व पालकांचा आनंद व्दिगुणीत होत असतो.परंतु असे होत नसल्याने ती एक औपचारीकता ठरत असते. याचा विचार सरकारने केला पाहिजे.

मराठी माध्यमांच्या शाळेचे महत्व राज्य सरकारने आणि पालकांनी समजून घेतले पाहिजे.महाराष्ट्राची राजभाषा ही मराठी असून तीचे महत्व कुठल्याही परिस्थितीत कमी लेखता कामा नये. आज मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे.मराठी भाषा ही महाराष्ट्राची मातृभाषा (बोलीभाषा)असल्याने तिचा वापर सर्वत्र व्हायला पाहिजे.तिचे महाराष्ट्रातील महत्व दुय्यम ठरता कामा नये.परंतु असे होत नसल्याने मराठी माध्यमांच्या शाळा आज ओस पडतांना दिसून येत आहेत.यात मुख्यत्वे चुक ही राज्य सरकारचीच आहे.कारण राज्य सरकारने मराठी भाषेला गांभिर्याने घेतलेले नाही.तीचे पालनं पोषणं योग्य पध्दतीने केले जात नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.याचे कारण इंग्रजी भाषेचा प्रभाव हा दिवसेंदिवस वाढतच चाललेला आहे.यांस खतपाणी पुरविण्याचे काम राज्य सरकार करते आहे.राजकारणी व ख्रिश्चन मिशनरीजच्या लोकांनी संगणमत करून इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे प्रस्थ वाढविण्याचे काम केलेले आहे.जे निषेधार्य ठरते आहे.याचा वाईट परिणाम मराठी भाषिक लोकांवर झालेला पहावयास मिळतो आहे.

इंग्रजी ही इतर देशांमध्ये प्रामुख्याने बोलली जाते.ती व्यवहारात आणली जाते.याचा अर्थ आपणं तिच्या आहारी जाता कामा नये. चीन, जपान, कोरीया इ. देशांकडून बरेचकाही शिकण्यासारखे आहे. त्यांनी आपली भाषा व संस्कृती ही सोडलेली नाही.त्यांनी आपल्या भाषेला कमी लेखून इंग्रजी भाषेचे महत्व वाढविलेले नाही किंवा तीचे उद्दात्तीकरण सुध्दा केलेले नाही. भारतातच हे कां व्हावे ? यासाठी आपले राज्यकर्ते सर्वस्वी जवाबदार ठरतात आहेत.त्यांनी आपली मुलें उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठवून भारतीय भाषेचे,ज्ञानाचे महत्व हे कमी केले आहे.स्वातंत्र्यपुर्व भारतातील शिक्षण हे उच्च दर्जाचे होते. नालंदा, तक्षशिला सारख्या शिक्षण संस्था नावरूपाला आल्या होत्या.याचे कारणं आपणं आपले अस्तित्व कुणाकडे गहाणं ठेवले नव्हते.ते स्वसामर्थ्यावर टिकवून ठेवले होते. आज राज्य सरकारे परकीय शिक्षण संस्थांसमोर पायघड्या घालीत आहेत. आपल्या संस्कृतीला, ज्ञानाला कमी लेखत आहेत. जे सर्वस्वी चुकीचे चालले आहे.पालक वर्गाला काय चांगले,काय वाईट हे कळेनासे झाले आहे.विद्यार्जन हे केवळ पैसे कमविण्याचे साधन आहे. असे मनावर बिंबवले जात आहे. यामुळे पालकांवर इंग्रजीचे भूत सवार झाले आहे. जो तो मम्मी-पप्पा शिवाय पुढे जायला तयार नाही. परदेशी लोकांवर आपली भाषा हावी झालेली नाही.तर आपणांवर ती हावी कां व्हावी ? यासाठी केंद्र व राज्य सरकारचे धोरणं कारणीभूत ठरते आहे.

भारत हा कृषीप्रधान देश आहे.असे पुस्तकातून सांगितले जाते. परंतु आजची वास्तविकता काय दर्शविते आहे ? कृषीप्रधान देशात पुस्तकी ज्ञानापेक्षा,प्रत्यक्ष प्रयोग,कृती करण्याला जास्त महत्व शिक्षणात दिले गेले पाहिजे.परंतु आज शिक्षणातून प्रत्यक्ष प्रयोगाला वगळले गेले आहे. शेतीत कुठल्याही प्रकारचे प्रयोग करून दाखविले जात नाहीत. शाळांमधून तर प्रयोगशाळा बादच झालेल्या आहेत. शारिरीक शिक्षणाला शिक्षणात कुठलेही स्थान राहिलेले नाही. बागकाम,व्यवसाय काम याला शिक्षणातून हद्दपार केले गेलेले आहे. निव्वळ पुस्तकी शिक्षण दिले जात असल्याने पुस्तकी गुणांना अवास्तव महत्व प्राप्त झाले आहे. यामुळे दुस-यांवरील परावलंबीत्व वाढत चालले आहे.कुठलेही साधे काम करण्यासाठी बाहेरची व्यक्ती शोधून आणावी लागते आहे.यामुळे वैयक्तीक खर्चात वाढ झालेली असून स्वतः काम करण्याची वृत्ती लोप पावत चालली आहे.कष्टाची कामें नकोशी झालेली आहेत.यामुळे शेतक-यांची मुलें शेती करण्यास धजावत नाही आहेत.ते शेतीमधील आधुनिक तंत्रज्ञान अवगत करण्यात मागे पडलेले आहेत. त्यांना मातीत काम करण्याची लाज वाटते आहे. निसर्गाशी जुळवून घेतांना त्यांची दमछाक होते आहे.कारणं आपल्या पोराला इंग्रजी बोलता आल म्हणजे सर्वकाही आल अशी त्यांची समज करून देण्यात आलेली आहे.येथेच त्यांची फसगत झालेली आहे.इंग्रजी भाषेचा आणि शेती तंत्रज्ञानाचा, व्यवसायाचा काय संबंध ? इंग्रजी भाषा येत नव्हती तेंव्हाही आपले पुर्वज उत्तम पध्दतीने शेती,व्यवसाय करीत होते.मग आजच इंग्रजी भाषेला एवढे महत्व कां दिले जात आहे ? कारणं स्थानिक भाषेचा विस्तार करण्यात राज्य सरकारे कमी पडलेली आहेत.सर्व प्रकारचे शिक्षण हे स्थानिक भाषेतून उपलब्ध करून देणे हे कुणाचे काम आहे ? केंद्र व राज्य सरकारे आपली जवाबदारी झटकून यातून मोकळे होऊ पहात आहेत.जे चुकीचे चालले आहे.आज महाराष्ट्रात मराठी भाषेतून सर्व प्रकारचे शिक्षण उपलब्ध नाही.यासाठी इंग्रजी भाषेचा सहारा घ्यावा लागतो आहे.यामुळे पालकांना इंग्रजी भाषेचे आकर्षण वाटते आहे.इंग्रजी भाषेशिवाय कुठलेही काम होवू शकत नाही असा गैरसमज करून देण्यात राज्य सरकारे यशस्वी झालेले आहेत.

आज गरज नसतांना महाराष्ट्रातील सर्व कार्यालयांमध्ये मराठी भाषे ऐवजी इंग्रजी भाषा वापरली जाते आहे.यामुळे जनतेला वीनाकारणचा त्रास सहन करावा लागतो आहे. आपल्या कार्यालयीन कामांसाठी दुस-यांची मदत घ्यावी लागते आहे. यामुळे पदोपदी दलालांचे प्रस्थ वाढलेले आहे.मग ते बँक असो, आरटीओ कार्यालय असो,कोर्ट असो वा इतर संस्था वा कार्यालये असोत इंग्रजी भाषेशिवाय कामें चालतच नाहीत. यात जोपर्यंत बदल होणार नाही.तोपर्यंत देशातील भ्रष्टाचार कमी होणार नाही. देशात आमुलाग्र परिवर्तन शक्य होणार नाही. चीनने, जपानने आपल्या भाषेच्या बळावर स्वत:ची प्रगती साधलेली आहे.मग भारतानेच यात मागे कां रहावे ?

यासाठी पालक वर्गांनी,जनतेनी आपली मानसिकता बदलली पाहिजे. केंद्र व राज्य सरकारला स्थानिक भाषेवर आधारीत अभ्यासक्रम सुरू करण्यास भाग पाडले पाहिजे.तरच संपुर्ण देशाची सर्वांगीण प्रगती ही वेगाने होवू शकते.यामुळे इंग्रजी भाषेच्या नावाखाली स्थानिक रोजगार कुणीही हिरावून घेऊ शकणार नाहीत.

याची जाण पालक वर्गानी ठेवली पाहिजे. यासाठी राज्य सरकारला बाध्य केले गेले पाहिजे.उगीचच आंतरराष्ट्रीय भाषा आहे म्हणून इंग्रजी भाषेचा बाऊ करून चालणार नाही. इंग्रजी भाषा यायला हवी परंतु ती आपल्या मानगुटीवर बसता कामा नये. याची काळजी राज्यकर्त्यांनी व भारतीय नागरिकांनी घेतली पाहिजे. यासाठी देशातील नागरिकांनी केंद्र व राज्य सरकारला आपले धोरणं बदलविण्यास भाग पाडले पाहिजे. तरच भारत देश तिसरी महाशक्ती म्हणून संपुर्ण जगासमोर आपले स्थान घट्ट करू शकणार आहे.

**मिलिंद गड्डमवार**
तह.राजुरा, जिल्हा चंद्रपूर(म.रा.)
(सामाजिक कार्यकर्ते व मुक्त पत्रकार)
मो.क्र.९५११२१५२००


## अशोकायन...

### हे वरुणराजा

उशीरा का बरस पण
मधात पाडू नको खंड
नाहीतर बळीराजाला
विकावा लागेल भूखंड ..!

मारावे की तारावे
आहे तुझ्या हाती
एवढी कृपा कर
दयाधना आमच्या वरती ..!

समतोल बरसून
येऊ दे पिके बहरून
बळीच्या मनोकामना
पूर्ण कर तुझ्या हातून .. !



**प्रा.अशोक सारडा मेहकर**
**(९४२२३९४३३९)**

# दहशतवादी कृत्यांत सहभागी असलेल्या साकीब नाचणचा उपचारादरम्यान मृत्यू

**भिवंडी, दि. २९ : प्रतिनिधी**



दहशतवादी कृत्यांत सहभागी असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा बोरिवली गावात रहाणाऱ्या साकीब नाचणचा दिल्लीच्या तिहार जेल मध्ये शिक्षा भोगत असतानाचं त्याला ब्रेन स्ट्रोक होऊन चार दिवसांच्या उपचारांनंतर त्याचा मृत्यू झाल्याची बातमी पडघा बोरिवली गावात येऊन धडकताच या ठिकाणी पोलिसांनी बंदोबस्त मोठ्या प्रमाणात तैनात करण्यात आल्याची माहिती पडघा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकूर यांनी दिली आहे.मृतक साकीब नाचण याला यापूर्वीच बंदी असलेल्या 'सिमी' संघटनेशी संबंधित असताना २७ जानेवारी २००३ सीएसटीहून कर्जतकडे जाणाऱ्या लोकल तसेच विलेपार्ले मार्केटमध्ये झालेले बॉम्बस्फोट आणि ६ डिसेंबर २००२ रोजी मुंबई सेंट्रल रेल्वेच्या इमारतीतील रेस्टॉरंटमध्ये एकूण तीन बॉम्बस्फोट केल्याच्या आरोपाखाली न्यायालयाने दोषी ठरवले होते. त्यावेळी साखळी बॉम्बस्फोटांत १२ जणांचा मृत्यू झाला होता. या साखळी बॉम्बस्फोटांत एकूण १३ आरोपींपैकी १० आरोपींना न्यायालयाने दोषी ठरवले होते. त्यामध्ये साकीबचा समावेश होता.साखळी बॉम्बस्फोटांची शिक्षा भोगून कारगृहात सुटका झाल्यानंतर ९ डिसेंबर २०२३ रोजी दिल्ली येथील एन एन आय पथकाने साकिब नाचण सह गावातील १५ संशयित दहशदवादीना ताब्यात घेऊन अटक केलं होती .तर आधी याच गावातून पुणे येथील दहशतवादी मॉड्यूलर मधील तिघाजनांसह साकिब नाचण याचा मुलगा आकिब यास ताब्यात घेत कारवाई केली होती. कारागृहात शिक्षा भोगल्यानंतर २०१७ मध्ये साबिकच्या सुटकेनंतर पडघा - बोरीवली गावात साकीबचे जंगी स्वागत झाले होते. विशेष म्हणजे साबिकच्या अटकेवेळी गावातील काही ग्रामस्थांनी पोलिसांसह एनआयएच्या पथकाला अडविण्याचा आणि हल्ल्याचा प्रकार झाला होता. त्यामुळे तेव्हापासून एनआयए पथक आणि पोलीस या गावात प्रवेश करताना अधिक सर्तक आणि सावध असल्यानेच पडघा बोरीवली गावातुन साबिकच्या सुटकेनंतर आतापर्यत अनेक वेळा या गावात छापेमारी होऊन देशविरोधात कट कारस्थान रचल्याचे पुरावे केंदीय सुरक्षा यंत्रणांच्या हाती लागले आहे.धक्कादायक बाब म्हणजे दोन वर्षांपूर्वीच सीरिया या दहशदवादी संघटनच्या साथीनं पडघा बोरिवली गावाचं नाव अलशान ठेवण्यात आलं होत.या गावाच्या जंगल भागात दहशतवादी तरुणांना ट्रेनींग देत असल्याचेही त्यावेळी एनआयएच्या पथकाने छापेमारी वेळी समोर आले होते. साकीब नाचन "स्टुडंट इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया" (SIMI) या भारतात बंदी असलेल्या संघटनेचा महाराष्ट्रातील प्रमुख सदस्य होता. SIMI वर बंदी आल्यावरही त्याच्या कट्टर विचारसरणीत बदल झाला नाही. उलट त्याच्यावर ISIS या जागतिक दहशतवादी संघटनेशी संबंध असल्याचे आरोप झाले. सुरक्षा यंत्रणांच्या अहवालानुसार, साकीब नाचनने युवकांना भरती करून त्यांना धर्माच्या नावावर ब्रेनवॉश करून कट्टरपंथी बनवण्याचे काम केले.साकीब नाचनने भिवंडी तालुक्यातील बोरीवली गावाला 'अल-शाम' या नावाने स्वतंत्र इस्लामिक क्षेत्र घोषित केल्याचा खळबळजनक आरोप आहे. त्याने या गावाला 'ISIS मुक्त क्षेत्र' म्हणत एक वेगळं इस्लामिक राज्य तयार करण्याचा प्रयत्न केला होता. पडघा गावात ८० –८५ % मुस्लिम लोकसंख्या असून, कोकणी मुसलमानांचा प्रभाव आहे. हा भाग आर्थिकदृष्ट्याही सक्षम असून लाकूड, गोडावून, ट्रकिंग यांसारख्या व्यवसायांत सक्रिय आहे.

# आश्रमशाळेत नववीच्या विद्यार्थिनीची आत्महत्या

## मुख्याध्यापक व शिक्षकांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह

**तलासरी, दि. २९ : प्रतिनिधी**




तलासरी तालुक्यातील गिरगाव येथील शासकीय आश्रमशाळेत एका नववी इयत्तेतील विद्यार्थिनीने वसतिगृहाच्या पहिल्या मजल्यावर लोखंडी अँगलला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. ही घटना शालेय प्रशासनाच्या गंभीर निष्काळजीपणाचे भयावह उदाहरण ठरत असून संपूर्ण तालुका हादरला आहे. पालक, विद्यार्थी व कर्मचारी वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे.

पल्लवी शरद खोटरे (रा. दाभाडी वांगणपाडा, ता. डहाणू) ही नववीत शिकणारी विद्यार्थिनी शुक्रवारी सकाळीच नातेवाईकांसोबत वसतिगृहात परतली होती. दुपारी तब्येत बरी नसल्याचे कारण देत तिने वर्गातून विश्रांतीसाठी परत वसतिगृहात जाण्याची विनंती केली. यावेळी वर्गातील दोन विद्यार्थिनींनी तिला वसतिगृहात नेले. मात्र, जेवणाची सुट्टी असलेल्या दुपारी १ ते २ या वेळेत तिने वसतिगृहाच्या पहिल्या मजल्यावर लोखंडी अँगलला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतला.

या घटनेच्या वेळी शाळेच्या अधीक्षिका निता चुरी ट्रेनिंगसाठी असल्याने शाळेत अनुपस्थित होत्या. इतकेच नव्हे तर संपूर्ण शाळेत एकही महिला शिक्षिका नेमलेली नसल्याचे उघड झाले आहे. पाच शिक्षकांपैकी केवळ तीन शिक्षक उपस्थित होते. नववीचा वर्ग शिक्षकाविना मोकळा होता आणि ही दुदैवी घटना घडली. तलासरी पोलीस ठाण्याच्या पथकाने घटनास्थळी दाखल होऊन आत्महत्येमागील नेमके कारण शोधण्याचा प्रयत्न केला. मात्र, पल्लवीने आत्महत्या का केली, हे अद्याप अस्पष्ट आहे. परंतु, विद्यार्थ्यांमधील वाढता मानसिक तणाव, शैक्षणिक दडपण, कौटुंबिक समस्या आणि सहनशक्तीचा अभाव या कारणांमुळे अशा घटना वाढत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. या प्रकारामुळे मुख्याध्यापक निमचंद राठोर यांच्यासह संपूर्ण शाळा प्रशासनाच्या कार्यशैलीवर पालकांनी रोष व्यक्त केला आहे. वसतिगृहातील निष्काळजी व्यवस्था, जेवण व विश्रांती व्यवस्थेतील गोंधळ, महिला कर्मचाऱ्यांचा अभाव आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष यामुळे पालक हतबल झाले आहेत. या घटनेने शासकीय आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. तातडीने महिला शिक्षिका व समुपदेशन सेवा उपलब्ध करण्याचे आदेश सरकारने द्यावेत, अन्यथा अशी दुर्घटना पुन्हा होण्याचा धोका कायम राहील, अशी भावना पालकांनी व्यक्त केली आहे.

> याघटनेने पालक वर्गात भीतीचे सावट पसरले आहे. आमच्या मुली सुरक्षित आहेत की नाही, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.
>
> **- एस. के. पाटकर, पालक**
>
> पोलिस तपास सुरू आहे. रिपोर्ट आल्यानंतरच नेमकं कारण स्पष्ट होईल. शासनाकडे महिला कर्मचारी संख्या वाढवण्याची मागणी करण्यात आली आहे.
>
> **- विशाल खत्री, प्रांत अधिकारी तथा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, डहाणू**

# राकेश पाटील हत्येतील आरोपी डी. मोहनला राष्ट्रवादीचे शहर अध्यक्षपद

**अंबरनाथ, दि. २९: प्रतिनिधी**

अंबरनाथ मधील मनसेचे उपशहराध्यक्ष राकेश पाटील यांच्या हत्येतील आरोपी आणि सध्या जामीनावर बाहेर असलेले डी. मोहन यांची अंबरनाथच्या राष्ट्रवादी शहराध्यक्ष पदी नियुक्ती आणि पुनर्वसन करण्यात आले आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्या हस्ते मोहन यांचा राष्ट्रवादी प्रवेश आणि नियुक्ती देण्यात आली आहे. मात्र नगरपालिका निवडणुकांच्या तोंडावर अशा वादग्रस्त नियुक्तीने कायदा सुव्यवस्था आणि राजकीय वातावरण तापण्याची शक्यता वर्तवन्यात येत आहे .

अंबरनाथ शहरातील मनसेचे उपाध्यक्ष असलेले राकेश पाटील यांची २८ ऑक्टोबर २०२० मध्ये व्यवसायिक वादातून पालेगाव भागात हत्या करण्यात आली होती. या हत्ये प्रकरणी डी मोहन, भारत पाटील, विनायक पिल्ले यांच्यासह इतर आरोपींना अटक करण्यात आली होती. मात्र या हत्ये प्रकरणी गेली तीन वर्षे तुरुंगात असलेले काही आरोपी जामिनावर बाहेर असतांना आता यातील काही आरोपींचे पुनर्वसन करण्यात येत आहे. त्यातच आता या हत्येतील आरोपी असलेले डी मोहन यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश केला आहे. पक्षात प्रवेश करताच त्यांनी थेट अंबरनाथ शहराध्यक्षपद मिळवले आहे. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि माजी खासदार आनंद परांजपे यांच्या उपस्थितीत त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यामुळे गुन्हेगारी पार्श्वभूमीवर आणि राजकीय हत्येतील आरोपीवर थेट अजित पवार गटाच्या शहराध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवत गुन्हेगारांचे राजकीय पुनर्वसन करण्यात नेतेच पुढाकार घेत असल्याचे पहायला मिळत आहे. त्यामुळे अशा वादग्रस्त राजकीय नियुक्त्यांचा आगामी पालिका निवडणुकांमध्ये राजकीय फायदा काय होते हे पहावे लागणार आहे. तर याबाबत राष्ट्रवादीचे प्रवक्ता आणि माजी खासदार आनंद परांजपे यांना या वादग्रस्त प्रवेशाबाबत विचारले असता डी मोहन यांचा प्रवेश आणि नियुक्तीला स्थगिती देण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

# इमारतीच्या 13 व्या मजल्यावरून मजूर कोसळला

**बदलापूर, दि.२९ : प्रतिनिधी**

बदलापुरमध्ये इमारतीच्या १३ व्या मजल्यावरून मजूर कोसळल्याची धक्कादायक घटना घडली आहे. बदलापूर पूर्व परिसरातील इमारतीचे काम करत असताना मजूर खाली कोसळला आहे.मजुराला केईएम रुग्णालयायत उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बदलापुरात निर्माणाधीन इमारतीच्या 13 व्या मजल्यावरून मजूर पडला आहे. तो मजूर गंभीर जखमी झाला असून बदलापुरातील सुरवळ चौकातील मोहन विलोज इमारतीत ही घटना घडली आहे. प्रमोद रामलाल खडीया वय - ३५ वर्ष असे मजुराचे नाव आहे. तो छत्तीसगड येथील रहिवासी असून मोहन विलोज या निर्माणाधीन इमारतीत तो पत्नीसह कामाला होता.

निर्माणाधीन मोहन विलोज इमारतीत ही घटना घडली. तो १३ व्या मजल्यावरून कोसळल्यानंतर प्रमोदला केईएम रुग्णालयायत दाखल करण्यात आले. यामुळे बदलापुरातील या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

# कार्ला येथील एकविरा आईच्या दर्शनासाठी अंग प्रदर्शन करणाऱ्या कपड्यांवर बंदी

## 7 जुलै पासून होणार ड्रेस कोडच्या नव्या नियमांची अंमलबजावणी-विश्वस्त खा. बाळ्या मामा

**भिवंडी, दि. २९ : प्रतिनिधी**

आगरी कोळी बांधवांसह लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असणाऱ्या कार्ला येथील एकविरा आईच्या दर्शनासाठी अंग प्रदर्शन करणाऱ्या कपड्यांवर बंदी घालण्यात आली आहे,एकविरा आईचे व मंदिराचे पावित्र्य राखण्यासाठी हि बंदी घालण्यात आली असून ड्रेस कोड संदर्भातील नव्या नियमांची अंमलबजावणी ७ जुलै पासून करण्यात येणार असल्याची माहिती कार्ला एकविरा आई ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळया मामा यांनी दिली आहे.शुक्रवारी कार्ला येथे आई एकविरा देवीच्या मंदिरात विश्वस्थ मंडळाच्या बैठकीत एकमताने ड्रेस कोड संदर्भात हा ठराव मंजूर करण्यात आला असल्याची माहिती खासदार बाळया मामा यांनी दिली आहे.कार्ला येथील एकविरा आई हि लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असून राज्यासह देशातील अनेक ठिकाणाहून भक्त देवीच्या दर्शनाला येत असतात.मात्र काही भक्त अंग प्रदर्शन



करणारे कपडे घालून देवीचे दर्शन घेण्यासाठी येतात,त्यामुळे देवीचे व मंदिराचे पावित्र्य धोक्यात येत असल्याच्या अनेक तक्रारी विश्वस्थ मंडळाकडे आल्या असून अनेक भक्तांनी सोशल मिडयाद्वारे ड्रेस कोड संदर्भात मागणी केली होती. भक्तांच्या मागणीनुसार विश्वस्थ मंडळाच्या शुक्रवारी झालेल्या बैठकीत याविषयी निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती खासदार बाळया मामा यांनी दिली आहे.

**कोणत्या कपड्यांना बंदी**

शॉर्ट,मिनी स्कर्ट, वेस्टर्न कपडे,मिनीस्कर्ट,फाटक्या जीन्स,हाफ पँट व अंग प्रदर्शन करणाऱ्या कपड्यांना बंदी घालण्यात आली आहे.

**कोणते कपडे घालावेत**

महिला व मुलींनी - साडी, सलवार कुर्ता,किंवा इतर भारतीय पारंपरिक कपडे घालावेत ज्याने पूर्ण अंग झाकलेले असावे.

**पुरुषांनी व मुलांनी**

धोतर,कुर्ता पायजमा,पँट शर्ट,टी शर्ट व इतर पारंपरिक कपडे ज्याने पूर्ण अंग झाकलेले असावे.

**भक्तांशी वाद घालणाऱ्या मंदिरातील कर्मचाऱ्यांना देखील दिल्या सूचना**

एकविरा देवीच्या मंदिरात दर्शन घेतांना येथील कर्मचारी भक्तांवर आरडा ओरड करत असून भक्तांशी वाद घालत असल्याच्या तक्रारी देखील विश्वस्थ मंडळाकडे आल्या असल्याने मंदिरातील कर्मचाऱ्यांनी देवी भक्तांशी वाद न घालण्याच्या सूचना कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या आल्याची माहिती खासदार बाळया मामा यांनी दिली असून एकविरा आईच्या भक्तांनी देखील देवीचे दर्शन घेतांना मंदिरातील सूचनांचे पालन करावे असे आवाहन देखील ट्रस्टचे प्रमुख विश्वस्थ खासदार बाळया मामा यांनी देवी भक्तांना केले आहे.

# उल्हासनगर महापालिका सफाई कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणार

**उल्हासनगर, दि. २९: प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष एस आर डिगोर यांनी महापालिकेचा दौरा केला असुन त्यांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्याचा आढावा घेत आयुक्त मनिषा आव्हाळे यांच्या सोबत चर्चा करुन विविध मागण्या सोडवन्यावर अधिक भर दिला . दरम्यान सफाई कर्मचाऱ्यांची रिक्त असलेली ५६ पदे लवकरच भरण्यात येतील असे आश्वासन आयुक्तानी डिगोर यांना दिले आहे.

राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष डिगोर यांनी महापालिकेत सफाई कर्मचाऱ्याच्या समस्याचे समाधान होते की नाही , हे पाहणी करण्यासाठी दौरा केला . त्यांनी युनियन नेते चरणसिंग टाक सह सफाई कर्मचारी यांच्या सोबत चर्चा करुन समस्या जाणुन घेतल्यात . तेव्हा महापालिका आयुक्त मनिषा आव्हाळे यांच्या सोबत चर्चा करुन गेल्या २५ वर्षापासुन सफाई सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्याना मोफत घरे देण्याबाबत आयुक्तानी सहमती दर्शावली आहे. दरम्यान सध्यस्थितीत राहत असलेले सफाई कर्मचारी यांना भाडे कमी करण्यात येणार आहे . तर लाड - पागे समितीच्या शिफारसी लागु करणे , आरोग्यासाठी १० लाख रुपयाचे कॅशलेश कार्ड देण्यात येणार आहे. तर सार्वजनिक सुट्टी व साप्ताहिक सुट्टी लागु करणे , अपंग सफाई कर्मचाऱ्याना त्यांच्या प्रमाणे काम देणे , सुशिक्षित कर्मचाऱ्याना पदोन्नती देणे या सर्व समस्यावर चर्चा करण्यात आली आहे. दरम्यान महापालिकेने सफाई करण्यासाठी ठेकेदार नेमले असुन त्या ठेके पध्दतीने कामे सुरु आहेत. हे चुकीचे असुन सफाई कर्मचारी उपलब्ध करुन देण्याचा ठेका अनुभवानुसार महापालिकेतील कर्मचाऱ्यालाच दिला पाहिजे . तर ५६ सफाई कर्मचाऱ्यांची रिक्त पदे येत्या तीन महिन्यात भरण्यात येणार असे आश्वासन आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी आयोगाला दिले आहे. यावेळी अतिरिक्त आयुक्त किशोर गवस , युनियन नेते चरणसिंग टांक , राजेंद्र आडांगळे हे उपस्थित होते.

# वी बिझनेसचे रेडी फॉर नेक्स्ट : भारतातील सर्वात मोठ्या डिजिटल अड्वायजरीने एमएसएमई दिनाच्या निमित्ताने वृद्धीचा सन्मान

**मुंबई, २९ जून :** आघाडीची टेलिकॉम कंपनी वी चा एंटरप्राइज विभाग, वी बिझनेसने जागतिक एमएसएमई (सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग) दिनानिमित्त, 'रेडी फॉर नेक्स्ट एमएसएमई ग्रोथ इन्साईट्स स्टडी २०२५' या आपल्या महत्त्वाच्या अहवालाची तिसरी आवृत्ती प्रकाशित केली आहे. डिजिटल इंडिया, भारत नेट आणि मोबाईल ब्रॉडबँडचा वापर यामुळे भारताची डिजिटल अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे, सूक्ष्म, लघु व मध्यम व्यवसाय आपली संचालन क्षमता आणि बाजारपेठेतील विस्तार वाढवण्यासाठी नवनवीन डिजिटल साधने वापरत आहेत.

'रेडी फॉर नेक्स्ट एमएसएमई ग्रोथ इन्साईट्स स्टडी २०२५' हे सकारात्मक परिवर्तन, देशाच्या डिजिटल मॅच्युरिटी इंडेक्समध्ये (डीएमआय) होत असलेली वाढ दर्शवत आहे. पण तरीही डिजिटल स्वीकार प्रत्येक क्षेत्रात वेगवेगळ्या प्रकारे होत आहे. भक्कम निर्धार, योग्य आर्थिक साहाय्य आणि योग्य सल्ला सेवांची उपलब्धता यांच्यासह भारतातील लघु व्यवसाय त्यांच्या डिजिटल प्रवासाला वेगवान बनवण्यासाठी सज्ज आहेत.

'रेडी फॉर नेक्स्ट एमएसएमई ग्रोथ इन्साईट्स स्टडी २०२५'च्या प्रकाशनाच्या निमित्ताने, वोडाफोन आयडिया लिमिटेडचे चीफ एंटरप्राइज बिझनेस ऑफिसर श्री अरविंद नेवतिया म्हणाले, भारतातील एमएसएमई डिजिटल जिज्ञासेपासून डिजिटल वचनबद्धतेकडे जात असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे आणि हे परिवर्तन खूप उत्साहवर्धक आहे. क्लाऊड, सायबर सुरक्षा आणि ऑटोमेशन इत्यादींमध्ये गुंतवणूक करण्याच्या प्रमाणात होत असलेली वाढ दर्शवते की, लघु व्यवसाय हे तंत्रज्ञानाकडे फक्त एक सुविधा म्हणून नाही तर वृद्धी सक्षम करणारा घटक म्हणून पाहत आहेत. रेडी फॉर नेक्स्ट प्रोग्राममार्फत आम्ही भारतातील एमएसएमईच्या अतुलनीय वृद्धी वाटचालीचा सन्मान करू इच्छितो – छोट्या नगरांपासून ते जागतिक बाजारपेठांपर्यंत, मानवी हातांनी करावयाच्या प्रक्रियांपासून ते डिजिटल–फर्स्ट एंटरप्राइजपर्यंत हा संपूर्ण प्रवास लक्षणीय आहे.

# राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस संमिश्र राहील. कामावर लक्ष केंद्रित करा. विद्यार्थ्यांचे मित्रांसोबत संबंध वाढू शकतात. नवीन जबाबदाजया यशस्वीपणे पार पाडाल. तुमच्याबद्दल लोक मत्सर करू शकतात.

**वृषभ :** आजचा दिवस खूप चांगला जाईल. पैशांसंबंधी चांगली बातमी मिळेल. सर्व कामे पूर्ण होतील. एखाद्या खास व्यक्तीची भेट होऊ शकते. सहकाजयांची मदत मिळेल. जीवनसाथीसोबत चांगला वेळ घालवाल.

**मिथुन :** आज तुमचे महत्त्वाचे काम वेळीच पूर्ण करण्याचा प्रयत्न करा, नाहीतर पश्चातापाची वेळ येईल. सभ्यपणे वागा आणि राग टाळा. उपजीविकेच्या क्षेत्रात, नोकरीसाठी लोकांचा संघर्ष वाढू शकतो.

**कर्क :** आजचा दिवस ठीक राहील, मनात उत्साह राहील. कामाच्या ठिकाणी दबाव वाढू शकतो. त्यामुळे संयम ठेवा. सहकाजयांची मदत मिळेल. विद्यार्थ्यांसाठी चांगला दिवस आहे.

**सिंह :** तुमच्या कुटुंबात काही शुभ कार्यक्रम घडतील. पण जीवनात अनावश्यक मतभेद निर्माण होऊ शकतात. काही महत्त्वाच्या कामात विलंब झाल्यास तुम्ही नाराज व्हाल. राजकीय महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील.

**कन्या :** आजचा दिवस पूर्वीपेक्षा चांगला राहील. कुटुंबासोबत फिरायला जाऊ शकता. नवीन लोकांसोबत भेटीगाठी होतील. दिवस फारच आनंदात जाईल. नशिबाची साथ मिळेल.

**तुळ :** कामाच्या ठिकाणी, तुमच्या कनिष्ठ आणि वरिष्ठांशी सहमती दर्शवत राहा. विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. तुमचे मन इकडे तिकडे भटकू देऊ नका. महत्त्वाच्या कामाची जबाबदारी मिळू शकते.

**वृश्चिक :** आज, काही महत्त्वाच्या कामात यश मिळाल्याने तुमचे मनोबल वाढेल. कोणतेही पाऊल उचलताना तुमच्या शहाणपणाने आणि विवेकबुद्धीने विचार करून निर्णय घ्या.


**धनु :** आज तुम्हाला नको असलेल्या प्रवासाला जावे लागू शकते. प्रिय व्यक्तीपासून दूर राहिल्यामुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल. व्यवसायात अनोळखी व्यक्तीवर जास्त विश्वास ठेवू नका.

**मकर :** आजचा दिवस फारच व्यस्त असणार असेल. आज आवश्यक कामे पूर्ण होतील, खर्चावर नियंत्रण ठेवा. व्यावसायिकांना लाभ होईल. विद्यार्थ्यांसाठी चांगला दिवस आहे. वैवाहिक जीवन सुखमय राहील.

**कुंभ :** नोकरीत बदलीची शक्यता आहे. संयमी वर्तन ठेवा. राजकारणाशी संबंधित लोकांना विशेष यश आणि आदर मिळेल. मित्रांसोबत तुमचे वर्तन संयमीत ठेवा आणि रागावर नियंत्रण ठेवा.

**मीन :** वृश्चिक राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस उत्तम राहील. काम वेळेत पूर्ण होईल. वैवाहिक जीवनात गोडवा राहील. विद्यार्थ्यांना यश मिळेल. आरोग्य चांगले राहील.

# शब्दकोडे क्रमांक २१५०



**आडवे शब्द :-**
१) पाच दिवे तबकात ठेऊन ओवाळणे
५) कारस्थानी, दुष्ट
७) मालाचे येणे व जाणे
११) कवने रचणारा
१३) वसन
१५) धपाटा, चापट
१६) लवण
१७) वलुकामय जमीन
१९) सामान्य
२१) पंख
२२) बळकट
२४) संगीतातील एक राग
२६) चांदणी
२९) वेदना, खटका
३०) संगीतातील लकेर
३१) नासलेला
३३) घर, वस्ती
३५) शोभणारा
३८) अंत:करण
३९) धर्मराजाने युद्धक्षेत्रावर उच्चारेलेले द्विअर्थी वचन
४१) फेफरे
४२) संताप
४३) निवडणुकीनंतरचा लोकमताचा घेतलेला अंदाज ओपिनियन पोल(म)
४५) सारखा
४७) चष्मा
४८) वितरण
४९) भुतांचा राजा
५०) अभिप्राय
५३) पूर्णपणे (खोटे) , स्पष्टपणे
५५) इच्छा पूर्ण होण्याकरता देवाशी केलेले नवसादि प्रकार
५८) श्वसनेंद्रिय
५९) उथळ, मोठी वाटी
६०) मान्यतेचा एक शब्द
६१) निवड न करता, एकंदरीने सर्व
६३) वक्र
६५) कीव, दया
६७) केस कापणे
७०) ललाट
७१) शुष्कता
७३) घरधनीण यजमानाची पत्नी
७६) खाटीक
७७) पोपट
७८) चिंतन
७९) एक बारीक धान्य

**उभे शब्द :-**
२) नोकर
३) आवाज
४) तीन आठवडे
५) काळी मैना- एक बोरफळ
६) प्रतिकूल मत, समीक्षा
७) विहीर
८) कप्तान
९) बिना मसाल्याची आमटी
१०) रिकामटेकड्यांची गप्पा मारण्याची जागा
१२) मृत्यू, वेळ
१४) धोबी
१६) धुणे
१७) वाळूची जमीन
१८) कडक
१९) वस्तू
२०) पाठविलेला
२१) टपाल
२३) मोठी कळशी
२५) घर
२७) राजयक्ष्मा–एक आजार
२८) ध्वनी
३०) तारका ३२) तल्लीनता, एकरुपता
३३) कमी व जास्त होणे
३४) कमळ
३६) जपजाप्य
३७) डोळ्यावरील त्वचा
३९) नीच, दुष्ट माणूस
४०) चणचण
४१) वस्तुसंग्रहालय
४४) जुगाराचा एक प्रकार
४६) मळलेला
४९) गावाची हद्द
५१) पुत्र, मुलगा
५२) प्रयत्न
५४) अर्धांगवायू
५६) सरदाराचा हुद्दा किंवा मान
५७) एकट्याने, एकत्र
५९) एकटा, फुलांचा खच
६०) पुण्यश्लोक अहिल्याबाईंचे आडनाव
६२) गाडीचे छत
६४) कुराणातील वचने
६५) बांबू
६६) उपवासाचे तांदूळ
६८) नेत्र
६९) करुणा
७२) चानी
७४) लोक
७५) झोप

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



## ➤ महत्त्वाचे

### कपिला नैसर्गिक शेती गटास भुईमूग बियाणे वाटप

**बेलगाव कुऱ्हे ।** भुईमूग अतिशय महत्वाचे पीक आहे. शेतकऱ्यांनी योग्य बियाणे निवडणे गरजेचे आहे. लागवडीची योग्य वेळ आणि पद्धत जाणून घेतली पाहिजे. खताची आणि पाण्याची योग्य व्यवस्था केल्यास यावर भुईमूग पिकाचे



चांगले उत्पादन अवलंबून असते. भुईमूग पिकाला नियमित सिंचनाची गरज भासत नाही. जमिनीतील ओलाव्याच्या अवशिष्ट स्थितीवर त्याची लागवड करता येते. भुईमूग बियाणे निवडताना काळजी घ्यावी असे आवाहन तालुका कृषिअधिकारी क्रांती जाधव यांनी केले. पिंपळगाव खांब येथील कपिला नैसर्गिक शेती गटास राष्ट्रीय खाद्यतेल अभियानाअंतर्गत भुईमूग बियाणे वाटप करण्यात आले. याप्रसंगी त्या कृषिअधिकारी क्रांती जाधव बोलत होत्या. यावेळी वालदेवी फार्मर्स प्रोड्युसर कंपनीचे अध्यक्ष तथा शासनाचा आदर्श शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकरी भाऊसाहेब गोविंद जाधव, कपिला नैसर्गिक शेती गटाचे अध्यक्ष विष्णू कचरू बोराडे, उपाध्यक्ष दत्तू अर्जुन जाधव, मंडळ कृषी अधिकारी दीपक भामरे, उपकृषी अधिकारी दीपक भांड, सहायक कृषि अधिकारी सविता अहिरे आदींनी नैसर्गिक शेती गटास मार्गदर्शन केले.

### खर्डे येथे बिबट्या च्या हल्ल्यात वासरू ठार

**देवळा |** खर्डे येथील वार्शी धरण परिसरात



रविवारी दि २९ रोजी रात्रीच्या सुमारास बिबट्याच्या हल्ल्यात वासरू ठार झाल्याच्या घटनेने पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. खर्डे शिवारातील वार्शी धरणालगत राहणारे शेतकरी भाऊराव गांगुर्डे यांच्या राहत्या घरालगत असलेल्या शेड मध्ये जनावरे बांधलेले असतात. रविवारी दि २९ रोजी रात्रीच्या सुमारास याठिकाणी बिबट्याने हल्ला चढवत एक वासरू गंभीर जखमी केलेल्या अवस्थेत गांगुर्डे यांच्या सकाळी उठल्यावर लक्षात आले . उपचारादरम्यान त्याचे निधन झाले. या घटनेने परिसरात रहाणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, वनविभागाने याची दखल घेऊन पिंजरा बसविण्याची मागणी केली आहे.

# बोगस पत्रकाराच्या काळ्या कृत्याने मविप्र संस्थेत संतापाची लाट

## संस्था चालकांनीच डोक्यावर बसविले अन् त्यांचीच केली भयानक बदनामी

**नाशिक ।** एकेकाळी मराठा विद्या प्रसारक शिक्षण संस्थेच्या मराठा समाजाच्या निवडणूकीत अत्यंत सक्रीय राहीलेला बनावट पत्रकार सुदर्शन दिलीप सारडा याने याच संस्थेतील एका महिलेची केलेली बदनामी पाहून सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे. शेवटी शिक्षण संस्थेनेच पुढाकार घेऊन संबंधित बोगस पत्रकारावर गुन्हा दाखल करण्यास पोलिसांना भाग पाडले.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, नाशिक जिल्ह्यातील मराठा विद्या प्रसारक शिक्षण संस्था ही अग्रगण्य शिक्षण संस्था आहे. याच शिक्षण संस्थेतील एका महिला कर्मचाऱ्याच्या नावे बोगस सोशल मीडिया अकाउंट बनवत संबंधित महिलेवर अश्लील कमेंट सुरू झाली होती. संस्थेतील एका पदाधिकाऱ्याशी संबंध असल्याची बदनामी करणारी पोस्ट व्हायरल झाली. या घटनेमुळे संपूर्ण संस्थेत खळबळ उडाली. वास्तविक अशा प्रकारची बदनामी करणे अत्यंत चुकीचे होते. परंतु यामागे ओझर येथील सुदर्शन सारडा हा एकेकाळी संस्थेचे सरचिटणीस ॲड नितीन ठाकरे यांचा उजवा हात समजला जाणारा बोगस पत्रकार असल्याचे लक्षात येताच, संस्था प्रमुखांनीच पुढाकार घेवून गुन्हा दाखल करण्यास भाग पाडले.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, मविप्र शिक्षण संस्थेत वरिष्ठ पदावर काम करणाऱ्या महिलेच्या नावे सोशल मीडियावर बोगस अकाउंट बनवत अश्लील आणि बदनामकाकर पोस्ट व्हायरल झाली होती. पिडीत महिलेने सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दिली असता पोलिसांनी गुन्हा दाखल करून संशयिताचा शोध सुरू केला. यामध्ये कथित बोगस पत्रकार असलेल्या सुदर्शन सारडा याचे नाव निष्पन्न झाले. पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन त्याचा मोबाईल व टॅब जप्त केला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष ढवळे, धीरज गवारे यांच्या पथकाने ही कारवाई केली. विशेष म्हणजे याच सारडाने संबंधित महिलेच्या वेतनाचे बोगस पत्रक देखील सोशल मीडियावर व्हायरल करून अधिक बदनामी केली. संस्था चालकांनी स्वतः पोलीस आयुक्तांची भेट घेऊन कारवाईची मागणी केली. त्यानंतर बदनामी झालेल्या महिलेने फीर्याद दिल्यावर पोलिसांनी वेगाने हालचाल करून सारडावर गुन्हा दाखल केला.

### सारडाला यापूर्वी चोप दिला होता



सुमारे दोन महिन्यापूर्वीच सुदर्शन सारडा या बोगस पत्रकाराने असेच काही घोळ घातल्यामुळे ओझर येथे जाऊन मविप्र संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या कुटुंबीयांनी चोप दिला होता. त्यामुळे सारडाने देखील मारणाऱ्यांच्या विरोधात ओझर पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. तरी देखील त्याच्यात काहीही सुधारणा न होता 'मविप्रचे रामराज्य' या नावाने त्याने संस्थेत असणारे पदाधिकारी व कर्मचाऱ्यांची बदनामी सुरूच ठेवली. वास्तविक पाहता या संस्थेशी सारडाचा कसलाही संबंध नसतानाही हा प्रकार सर्रास सुरू होता. परंतु त्याचा अलीकडच्या काळात प्रचंड अतिरेक झाला. दोन वर्षांपूर्वी मविप्रच्या निवडणुकीत नितीन ठाकरे यांचा उजवा हात म्हणून तो वावरत होता. संस्था मराठा समाजाची असूनही त्याची वर्तणूक व लूडबूड पाहून अनेकजण आश्चर्य व्यक्त करत असायचे. एवढेच नव्हे तर मविप्रमधील शाळा, महाविद्यालयात विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या प्रवेशामध्ये देखील त्याचा हस्तक्षेप असायचा. त्यामुळे शिक्षणाधिकारी देखील वैतागले होते. याबाबत सरचिटणीस नितीन ठाकरे यांना काही समाज बांधवांनी सावध राहण्याच्या सूचना दिल्या होत्या. परंतु सुमारे वर्षभर ठाकरे यांनी त्याबाबत दखल घेतलीच नाही. शेवटी बूमरँग होऊन सुदर्शन सारडा ठाकरे यांचीदेखील बदनामी करू लागला. परंतु त्यातही अतिरेक झाल्यामुळे शेवटी गुन्हा दाखल झाला. विशेष म्हणजे सर्व पुरावे सापडले असल्यामुळे या सुदर्शन सारडाला सात वर्षाची शिक्षा देखील होऊ शकते, असे पोलीस अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

## मनमाड कृउबाची १ जुलैला ऑनलाइन पद्धतीने सर्वसाधारण सभा

**मनमाड ।** गेल्या सहा ते सात महिन्यांपासून सत्ताधारी आणि विरोधकांमुळे या-ना-त्या कारणाने चर्चेत असलेल्या मनमाड कृउबाची सर्वसाधारण सभा प्रथमच मुख्यमंत्री ई-कॅबिनेटच्या धरतीवर झुम पद्धतीने येत्या दिनांक ९ जुलै रोजी होणार आहे. त्यामुळे बाजार समितीत अशी सभा घेणे म्हणजे इतिहासात असा पहिला प्रयोग असल्याने या सभेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मनमाड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विविध अडचणींवर तोडगा काढून कामकाज सुरळीत करण्यासाठी बाजार समितीची सर्वसाधारण सभा झूम मीटिंगद्वारे बोलवण्याचे आदेश प्रभारी सचिवांना देण्यात आल्याची माहिती बाजार समितीचे सभापती दीपक गोगड यांनी पत्रकाद्वारे दिली. त्यानुसार प्रभारी सचिव बी.डी. पवार यांनी सभेचा अजेंडा काढला आहे. बाजार समितीमधील सर्व प्रलंबित कामकाज मार्गी लागावी म्हणून ही सर्वसाधारण सभा बोलावण्यात आली आहे. या सभेची नोटीस सर्व संचालकांना देण्यात येणार आहे. मागील काही दिवसांपासून बाजार समितीमध्ये विरोधी गटाच्या संचालकांच्या तक्रारी व कर्मचाऱ्यांचे नियमबाह्य आंदोलने आणि बेकायदेशीर कामकाजामुळे बाजार समितीच्या विविध घटकांच्या अडीअडचणी व कर्मचारींचे प्रलंबित वेतन अशा सर्व कामांना मार्गी लावण्यासाठी तसेच सर्व प्रक्रिया मंजुरीनंतर शेतकरी बांधवांना सोयी-सुविधा मिळण्याच्या दृष्टीने बाजार समितीच्या विकास कामांना गती देण्यासाठी सर्वसाधारण सभा बोलविण्यात आली आहे. मनमाड बाजार समितीची सभा झूम मीटिंगद्वारे घेण्याचा निर्णय राज्यात प्रथमच मनमाड बाजार समितीने घेतला आहे. याआधी कर्मचाऱ्यांची नियमबाह्य व बेकायदेशीरपणे बोलविलेल्या सभा विरुद्ध उच्च न्यायालयात केलेल्या दाव्यातील आदेशामुळे सदर दोन्ही सभांविरुद्धची सुनावणी मंगळवार (दि.१ जुलै) रोजी पणन संचालक पुणे यांच्याकडे होणार असून त्यातील सत्य काय ते जनतेसमोर येणार आहे.

## शिवाजी मराठा इंग्लिश स्कूलमध्ये 'तंबाखू मुक्त शाळा अभियान'

**देवळा ।** येथील श्री शिवाजी मराठा इंग्लिश स्कूल मध्ये गुरुवारी दि २६ रोजी आमची शाळा तंबाखू मुक्त शाळा अभियान राबविण्यात आले. आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ विरोधी व अमली पदार्थ मुक्ती दिन साजरा करण्यात आला . संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पुढाकाराने "आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ गैरवापर व तस्करीविरोधी दिवस" साजरा केला जातो. या अनुषंगाने येथील श्री शिवाजी मराठा इंग्लिश स्कूल मध्ये आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ विरोधी दिवस तसेच अमृत पदार्थ मुक्ती दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी शहरात रॅली




काढत जनजागृती केली . याप्रसंगी मुख्याध्यापक संजय पगार ,श्रीमती आहेर आदींसह सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी रॅलीत सहभागी झाले होते. मुख्याध्यापक संजय पगार यांनी विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ विरोधी दिनाचे महत्त्व पटवून दिले.

## उमराणे येथे महसूल विभागातर्फे आयोजित शिबिरात लाभार्थ्यांना दाखले वाटप

**देवळा ।** उमराणे ता देवळा येथे महसूल विभागाच्या वतीने आयोजित शिबिरात विद्यार्थ्यांना तसेच ग्रामस्थांना शासनाच्या विविध योजनांसाठी लागणारे विविध दाखले, शिधापत्रिका आदी कागदपत्रांचे लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले. शासनाच्या वतीने राज्यभर धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान व छत्रपती शिवाजी महाराज समाधान



शिबिर आयोजित करण्यात आले असूनयात महसूल विभागाच्या वतीने मंडल निहाय शिबिर घेण्यात येत असून, उमराने येथे सदर शिबिरात शासनाच्या विविध योजना व दाखल्यांबाबत नायब तहसीलदार बबन अहिरराव यांनी विद्यार्थी व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले व मान्यवरांच्या हस्ते विविध दाखल्यांचे लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास सरपंच कमलबाई देवरे, ग्रामपंचायत सदस्य भरत देवरे, शेतकरी संघाचे माजी चेअरमन संदीप देवरे आदींसह पुरवठा निरीक्षक, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामस्थ, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बाबाज् थिएटर्सतर्फे मंगळवारी रंगणार संगीत मैफील

**नाशिक ।** बाबाज् थिएटर्सतर्फे आयोजित दर महिन्याच्या १ तारखेला ज्येष्ठ नागरिक व सुजाण संगीत प्रेमींसाठी संगीत मैफल व कृतज्ञता सन्मान पुरस्कार सोहळा या कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात येते. यावेळी मंगळवार दि. १ जुलै रोजी कुर्तकोटी सभागृह, शंकराचार्य न्यास, गंगापूर रोड येथे संध्याकाळी ६.१५ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. या मासिक उपक्रमाचे हे ५६ वे पुष्प गुंफणार आहोत.

प्रशांत जुन्नरे यांची संकल्पना असलेल्या या कार्यक्रमात अनघा धोडपकर, रसिकसूर प्रस्तूत ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांच्या कविता व सुमधुर गाण्यांचा आविष्कार मुंबई येथील सुप्रसिद्ध गायक अनिरुद्ध भिडे, सहगायक रत्नाकर नवघरे, स्वानंद पारखी हे अमोल पाळेकर यांच्या वाद्यवृंद संचालनातून सादर करणार आहेत. कविता वाचन व निवेदन अनघा धोडपकर आणि डॉ. स्वप्नील तोरणे हे त्यांच्या खास शैलीतून सादर करतील. तसेच याच कार्यक्रमा अंतर्गत सुरवातीला नाशिकच्या सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नाशिकच्या तीन मान्यवरांना 'कृतज्ञता सन्मान पुरस्कार' प्रदान करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी सामाजिक कार्यकर्ते सुहास शुक्ल आणि कलादिग्दर्शक, मूर्तिकार, चित्रकार शाम लोंढे हे उपस्थित राहणार असून त्यांच्या शुभ हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येतील. पुरस्कारार्थींमध्ये अतुल भालेराव (चित्रकार, कला शिक्षक), दीपा बक्षी ( सुप्रसिद्ध कथक नृत्यांगना), दुहिता आणि हर्षद गोळेसर (सुप्रसिद्ध पार्श्व गायक/गायिका) यांचा समावेश आहे.

या विनामूल्य कार्यक्रमाला रसिकांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन प्रशांत जुन्नरे, प्रीतम पावशे, कैलास पाटील, जे पी जाधव, शामराव केदार, डॉ. प्रीतीश कुलकर्णी, दिलीपसिंह पाटील, राजा पाटेकर, योगिता पाटील यांनी केले आहे.

## खेळाडूंना शासनाच्या योजनांचा लाभ मिळावा यासाठी प्रयत्नशील : ना. कोकाटे

### महाराष्ट्र राज्य सेपक टकरा स्पर्धा

**नाशिक ।** नाशिक जिल्हा सेपक टकरा असोसिएशनच्या वतीने आणि महाराष्ट्र सेपक टकरा असोसिएशनच्या मान्यतेने आणि त्यांच्या आधी पथ्याखाली नाशिकच्या पंचवटी येथील विभागीय क्रीडा संकुलाच्या हॉलमध्ये वरिष्ठ गटाच्या ३५ व्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



या स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते झाले. यावेळी मंचावर नाशिक विभागाच्या क्रीडा उपसंचालक स्नेहल साळुंखे, जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील, नाशिक जिल्हा सेपक टकरा असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत बनकर, सचिव दीपक निकम, स्पर्धा आयोजन समिती अध्यक्ष आनंद खरे, मराठा महासंघाचे युवा अध्यक्ष व्यंकटेश मोरे, ग्रामीण अध्यक्ष अशोक कदम, नरेंद्र बनकर, महाराष्ट्र



सेपक टकरा असोसिएशनचे सचिव योगेंद्र पांडे आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या २२ जिल्हाचे पुरुष आणि महिलांचे संघ सहभागी झाले आहेत. उदघाटन प्रसंगी सर्व खेळाडूंनी सूत्रबद्ध संचालन करून प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली. यावेळी खेळाडूंना मार्गदर्शन करतांना कोकाटे यांनी सांगितले की खेळाडूंच्या उत्तरोत्तर प्रगतीसाठी शासनाच्या अनेक योजना आहेत. त्या खेळाडूपर्यंत थेट पोहचवाव्या यासाठी शासनाच्यावतीने महत्वाचे पाऊले उचलले जातील, असे सांगितले. या स्पर्धेत पुरुषांचे आणि महिलांचे आठ गट करण्यात आले असून आज आणि उद्या दिवसभर गटवार साखळी सामने खेळविले जातील. तर दिनांक ३० जून रोजी सकाळी उपउपांत्य आणि उपांत्य सामने खेळविलें जाती लेटर सायंकाळी दोनही गटांच्या अंतिम सामने खेळविले जातील, अशी माहिती आयोजकांनी दिली.

## शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा : मडके

**इगतपुरी ।** तालुक्यातील शेतकऱ्यांनी बदलत्या हवामानाच्या परिस्थितीवर अवलंबून न राहता खरीप हंगामात आपल्या प्रमुख पिकांचा विमा काढून घ्यावा, असे आवाहन इगतपुरी तालुका कृषी अधिकारी रामदास मडके यांनी केले आहे.

शेतकऱ्यांना या योजनेत सहभागी होण्यासाठी 31 जुलै पर्यंत मुदत शासनाने दिली आहे. शेतकऱ्यांना महा ई सेवा केंद्र, सामुदायिक सुविधा केंद्र, ग्रामपंचायतींचे संग्राम केंद्र, राष्टीयकृत बँका,येथे पीकविमा काढता येईल. विमा योजनेत सहभागी होण्यासाठी सातबारा, खाते उतारा, आधार कार्ड बँक पासबुक, पीक पेरणी स्वयंघोषणापत्र आणि या वर्षी पासून शेतकऱ्यांचा फार्मर आयडी आवश्यक आहे असेही त्यांनी कळवले आहे. पेरणी न करता पिक विमा भरणे, विमा भरलेल्या पिकाची पेरणी न करणे, सातबारा नसताना विमा भरून शासनाची फसवणूक करण्याच्या प्रकारामुळे प्रामाणिक शेतकरी अडचणीत आला आहे. त्यामुळे शासनाने एक रुपयात पीक विमा योजना बंद केली आहे. शेतकऱ्यांना आता भात हेक्टरी 545 रुपये, नाचणी 37 रुपये 50 पैसे, भुईमूग 112 रुपये 50 पैसे, सोयाबीन 810 रुपये 50 पैसे याप्रमाणे विम्यासाठी शेतकऱ्यांना रक्कम भरावी लागणार आहे. यावर्षीपासून पिक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा बदल केला आहे यावर्षीपासूनही ई- पीक पाहणी अर्थात लागवड केलेल्या पिकाची नोंदणी बंधनकारक करण्यात आहे. नोंदणी केलेले क्षेत्र आणि प्रत्यक्ष पीकविमा काढलेल्या क्षेत्रात तफावत आढळल्यास संबंधित शेतकऱ्याचा विमा रद्द होणार आहे. संबंधित शेतकऱ्याला काळ्या यादीत टाकून पुढील पाच वर्षे कृषी विभागाच्या एकाही योजनेचा लाभ मिळणार नाही. डिजिटल क्रॉप सर्वे या ॲप वरील नोंदणी आवश्यक करण्यात आलेली आहे.

> “ पीक विमा योजनेअंतर्गत पीक पेरणी पासून कारणीपर्यंतच्या कालावधीत पिकांचे नुकसान झाल्यास शेतकरी बांधवांना ७२ तासांच्या आत पिक विमा ॲप कंपनी प्रतिनिधी किंवा टोल फ्री क्रमांकावर कळवावे लागणार आहे, याची शेतकऱ्यांनी नोंद घ्यावी.
> – **किशोर भरते, उप कृषी अधिकारी, इगतपुरी**

## ➤ महत्त्वाचे

### ...तेव्हा ती वारी होते

**मोहाडी ।** मविप्र समाज संचलित मोहाडी येथील कर्मवीर रावसाहेब थोरात (केआरटी) विद्यालयातील कृष्णा जाधव व धनंजय जाधव



या कलाशिक्षकांनी प्राचार्या शरयू भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर रंगीत खडूंच्या सहाय्याने शाळेतील फळ्यावर रेखाटलेले पायी वारीचे अप्रतिम दृश्य..! "आपण पायी चालतो तो प्रवास होतो, हृदयाने चालतो तेव्हा ती यात्रा होते, आणि भान हरपून चालतो तेव्हा ती वारी होते..!" फळ्यावरील या ओळीदेखील लक्ष वेधून घेत आहेत.

## मिनी फुटबॉल फाईव्ह राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राला विजेतेपद


**नाशिक ।** जागतिक ऑलिम्पिक दिन साजरा करण्याच्या हेतूने गेल्या १६ वर्षापासून नाशिक डिस्ट्रिक्ट ऑल गेम्स असोसिएशन, कालिका मंदिर, यशवंत व्यायाम शाळां आणि विविध क्रीडा असोसिएशन यांच्या वतीने अनेक क्रीडा उपक्रमांचे आयोजन केले जाते. या ऑलिम्पिक क्रीडा सप्ताह अंतर्गत दिनांक २३ ते ३० जून दरम्यान विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.




या उपक्रमाअंतर्गत नाशिकच्या विभागीय क्रीडा संकुल येथे मिनी फुटबॉल फाईव्ह या खेळाच्या राष्ट्रीय स्पर्धा संपन्न झाल्या.मिनी फुटबॉल फाईव्ह फेडरेशन आणि महाराष्ट्र मिनी फुटबॉल फाईव्ह असोसिएशन आणि नाशिक जिल्हा मिनी फुटबॉल फाईव्ह असोसिएशन यांच्या संयुक्तं विद्यमाने आयोजित या स्पर्धेत यजमान महाराष्ट्र संघाने सुंदर खेळाचे प्रदर्शन करून खुल्या गटाचे आणि ज्युनिअर गटचे विजेतेपद पटकावत दुहेरी मुकूट पटकावला. या स्पर्धेत विविध राज्यांचे १५ संघ सहभागी झाले होते. वरिष्ठ गटांच्या स्पर्धेत महाराष्ट्र संघाने राजस्थान संघावर ४-१ असा विजय मिळवून विजेतेपद आपल्या नावे केले. तर ज्युनियर गटात चुरशीच्या झालेल्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राने पहिल्या सत्रातील आपली १-२ अशी पिछाडी भरून काढत दुसऱ्या सत्रात २-२ अशी बरोबरी साधली. तर शेवटच्या सत्रात तीन मिनिटे बाकी असताना आणखी एक गोल करून हा सामना ३ विरुद्ध २ अश्या एक गोलच्या फरकाने जिंकून या गटाचे विजेतेपद आपल्या नावे करत दुहेरी मुकुट पटकावला.

या स्पर्धेत पाहिले तीन क्रमांक मिळवणाऱ्या संघांना प्रमुख पाहुणे नाशिक जिल्हा ऑल गेम्स असोसिएशनचे अध्यक्ष राहुल देशमुख, उपाध्यक्ष चंद्रशेखर सिंघ, क्रीडा संघटक चंद्रकांत बनकर, अशोक दुधारे, आनंद खरे, अशोक कदम, दीपक निकम यांच्या हस्ते आकर्षक मेडल्स आणि चषक प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेतील कामगिरी लक्षात घेऊन खेळाडूंच्या गुणवत्तेनुसार खेळाडूंची भारताच्या संघामध्ये प्राथमिक निवड करण्यात आली आहे. या निवड झालेल्या खेळाडूंचे आणखी दोन शिबीर होणार आहे. त्यानंतर भारताच्या संघाची अंतिम निवड केली जाणार आहे. हा संघ संघ १३ ते १७ ऑगस्ट २०२५ दरम्यान अंटलिया, तुर्की येथे आयोजित होणाऱ्या जागतिक स्पर्धेसाठी भारताचे प्रतिनिधित्व करेल अशी माहिती दीपक निकम यांनी दिली. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सतीश बोरा, शैलेश रकिबे, अविनाश वाघ, नीरज राजभर, महेंद्र साळवे, वैशाली उशिरे, कविता कटारे, आनंद चकोर, राजू वाकडे आदीनी अथक परिश्रम घेतले. अंतिम निकाल- खुला गट मुले १) महाराष्ट्र - प्रथम. २) दादरा - नगर हवेली - उपविजेता संघ ३) राजस्थान - तृताय क्रमांक. *ज्युनिअर गट मुले : १) महाराष्ट्र - प्रथम. २) राजस्थान - उपविजेता संघ. ३) विदर्भ - तृताय क्रमांक

# घड्याळासाठी २२३ कोटी रुपये!




एखाद्या घड्याळाची किंमत किती असेल? पाच हजार, दहा हजार, फार फार तर काही लाख रुपये. मात्र स्वीत्झर्लंडमधल्या लिलावात एका घड्याळाला २२३ कोटी रुपयांची किंमत मिळाली. मध्यंतरी स्वीत्झर्लंडमध्ये हा लिलाव पार पडला. त्यावेळी एका घड्याळाला ३१ दशलक्ष स्वीस फ्रँक म्हणजे जवळपास २२३ कोटी रुपये किंमत मिळाली. घड्याळ्याच्या किंमतीबद्दल कळल्यानंतर कोणाचेही डोळे पांढरे होतील. या घड्याळाच्या लिलावाची प्रकि'या अवघ्या पाच मिनिटात पार पडली. आता ही रक्कम दान करण्यात येणार आहे. याआधी २०१७ मध्ये डायटोना रोलेक्स घड्याळ १२७ कोटी रुपयांचा विकलं गेलं होतं. हे आजवरचे सर्वात महागडं घड्याळ होतं. हे घड्याळ पाटेक फिलिप कंपनीचं असून ओन्ली वॉच असं त्याचं नाव आहे. या घड्याळाला २.५ ते तीन दशलक्ष स्वीस फ्रँक मिळतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. पण त्यापेक्षाही खूप जास्त किंमत मिळाली. पाटेक फिलिप कंपनीचं हे घड्याळ इतर घड्याळांपेक्षा खूप वेगळं आहे. म्हणूनच या घड्याळाला एवढी किंमत मिळाली.

**एक धाव जनजागृतीसाठी**

इंग्लंडमधल्या ब्रिस्टल शहरात रहाणाऱ्या निक बटर नावाच्या व्यक्तीने नवा विक्रम केला आहे. निक जगातल्या १९६ देशांमधल्या मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी झाला आहे. अशी कामगिरी करणारा तो जगातला पहिलाच माणूस आहे. ३० वर्षांचा निक ग्रीसची राजधानी अथेन्समधल्या मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी झाला होता. निक बँकेत काम करायचा. मित्र केविन वेबरकडून निकला काही तरी जगावेगळं करण्याची प्रेरणा मिळाली. त्याच्या या मित्राला प्रोस्टेट ग्रंथींचा कॅन्सर होता. या जगात सगळंच अशाश्वत आहे, असं वाटल्यानंतर निकने आपल्या पद्धतीने आयुष्य जगायचं ठरवलं. तो समाजकार्यासाठी मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होतो. या धावेच्या माध्यमातून त्याने भारतीय चलनात जवळपास एक कोटी ७९ लाख रुपयांचा निधी जमा केला आहे. तो ही रक्कम कॅन्सरपीडितांना देणार आहे. यासोबतच तो प्रोस्टेट कॅन्सरबाबत जागरूकता निर्माण करतो आहे. हा विश्वविक्रम करताना त्याला बऱ्याच अडचणींना सामोरं जावं लागलं. त्याला कुत्रं चावलं. एकदा अपघातही झाला. मात्र या सर्व परिस्थितीला सामोरं जात त्याने मॅरेथॉनमध्ये धावण्याचा विक्रम पूर्ण केला.

**नाकातून काढला दात**

कोणाच्या नाकात दात वाढू शकतो का? या प्रश्नाचचं उत्तर 'नाही' असंच द्यावं लागेल. मात्र या जगात काहीही घडू शकतं. चीनमधल्या ३० वर्षांच्या झांग बिन्सेंगच्या नाकातून दात काढण्यात आला आहे. श्वास घ्यायला त्रास होऊ लागल्यानंतर झांग डॉक्टरांकडे गेला. यानंतर त्याची क्ष-किरण चाचणी करण्यात आली. या चाचणीतून धक्कादायक बाब समोर आली. त्याच्या नाकात दात असल्याचं स्पष्ट झालं. यामुळे डॉक्टरही चक्रावून गेले. या दाताची लांबी जवळपास एक सेंटीमीटर होती. गेल्या २० वर्षांपासून त्याच्या नाकात दात आहे. मात्र गेल्या तीन महिन्यांपासून त्याला श्वास घ्यायला त्रास होत होता. त्याची हुंगण्याची क्षमताही कमी झाली होती. याच कारणामुळे झांगने डॉक्टरांचा सल्ला घ्यायचं ठरवलं. दहा वर्षांचा असताना पडल्यामुळे झांगचा दात तुटला आणि नाकात जाऊन बसला. हा दात इथेच रूजला. आता २० वर्षांनी त्याला त्रास जाणवू लागला. डॉक्टरांनी अर्धा तास शस्त्रकि'या केल्यानंतर नाकातला हा दात काढला.

# कॅलिडोस्कोप

## पाण्यासाठी मधली सुट्टी

पाणी म्हणजे जीवन. निरोगी रहाण्यासाठी भरपूर पाणी प्यायला हवं. भरपूर पाणी प्यायल्यामुळे शरीरातले विषारी घटक मुत्रावाटे बाहेर पडतात. आपली त्वचा तजेलदार दिसू लागते. पण आपण पुरेसं पाणी पित नाही. पाणी पिण्याकडे आपलं दुर्लक्षच होतं. लहानपणापासूनच पाणी पिण्याची सवय लागली तर पुढे आरोग्य उत्तम राहू शकतं. म्हणूनच केरळ सरकारने अनोखा उपक'म सुरू केला



आहे. इथल्या शाळांमध्ये 'वॉटर बेल' वाजवली जाते. वॉटर बेल वाजली की मुलांना वॉटर ब्रेक मिळतो. ब'क मिळताच मुलांनी पाणी प्यायचं. राज्य सरकारने सरकारी शाळांमध्ये हा उपक'म सुरू केला आहे. शाळेच्या वेळेत तीन वेळा ही बेल वाजवली जाते. आता आपल्याला पाणी प्यायचं आहे, याची जाणीव मुलांना करून देण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सकाळी १०.३५, दुपारी १२ आणि दोन वाजता घंटा वाजवली जाते. मग १५ ते २० मिनिटांमध्ये मुलं पाणी पिऊ शकतात. केरळ सरकारच्या या उपक्रमातून प्रेरणा घेऊन कर्नाटक आणि तमिळनाडू सरकारनेही अशा प्रकारचा उपक्रम राबवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. केरळ सरकारचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे.

# मुलीनेच लावले आईचे लग्न!



उत्तर प्रदेशातील अलीगढमधील महिला जावयासोबत पळून गेल्याची घटना ताजी असताना अजून एक तशीच घटना घडली आहे. बस्ती जिल्ह्यातील बंडा क्षेत्रात राहणार्या एका महिलेच्या पतीचे तीन वर्षांपूर्वी निधन झाले. तिला तीन मुले आणि एक मुलगी आहे. लग्नाचे वय झाले म्हणून तिने नातेवाइकांना लेकीसाठी मुलगा शोधायला सांगितला. वीस वर्षाच्या लेकीसाठी २३ वर्षीय शेतकरी तरुण जोडीदार म्हणून निवडण्यात आला. लग्नाची तारीख ठरणे बाकी होते. दोन्ही घरात सनईचौघड्याची तयारी सुरू झाली. अशात लेकीच्या आईचे लग्नाच्या तयारीनिमित्त भावी जावयाशी फोनवर बोलणे सुरू झाले.

जावई लेकीपेक्षा आईशी तास न तास गप्पा मारत होता. लेकीच्याही काही गोष्टी लक्षात आल्या. मुलगी म्हणाली, माझे लग्न ठरल्यानंतर आईच्या स्वभावात बदल दिसत होता. आई अनेक वेळा लपून छपून फोनवर बोलताना दिसायची. होणारा जावई गावात अनेक वेळा ये-जा करायचा. पण तो कधीही त्या तरुणीला भेटला नाही. त्यामुळे तिला काही तरी गडबड असल्याची शंका आली. त्यानंतर तिने त्या तरुणावर पाळत ठेवली. तेव्हा आई जावयाशी तासन् तास बोलत असल्याचे समोर आले. मग तिने तरुणाला फोन करून विचारले. त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. पण नंतर आईनेच आपण जावयाच्या प्रेमात असल्याची कबुली दिली. शेवटी लेकीने मोठा निर्णय घेतला. समाजात बदनामी होऊ नये म्हणून तिने एका मंदिरात आपल्या होणार्यो नवर्या्चे लग्न स्वतःच्याच आईशी लावून दिले.

# ...म्हणून उंची मोजतात संध्याकाळी



वजन मोजायचे असेल तर ते सकाळी उठल्यावर लघवी झाल्यानंतर मोजायला हवे. तसेच उंची संध्याकाळी मोजायला हवी. तज्ज्ञांच्या मते प्रत्येक गोष्टीमागे काही कारणे असतात. एअर होस्टेस किंवा लष्करात भरती होताना त्यांची उंची मोजण्याची वेळ बहुतेक संध्याकाळी असते. हा योगायोग नाही, तर त्यामागे एक वैज्ञानिक कारण आहे.


दिवसाच्या वेगवेगळ्या वेळी आपली उंची थोडी बदलत राहते. खरेतर दिवसभराच्या कामामुळे आणि गुरुत्वाकर्षणाच्या प्रभावामुळे आपला पाठीचा कणा थोडा आकुंचन आणि प्रसरण पावत असतो. सकाळी उठताना शरीराला विश्रांती मिळालेली असते. त्यावेळी पाठीच्या कण्यामध्ये थोडी लवचिकता येते आणि उंची थोडी जास्त भरते. आपण सकाळी उठतो तेव्हा आपल्या इंटरव्हर्टेब्रल डिस्क्स म्हणजेच पाठीच्या मणक्यांमधली जागा थोडी वाढलेली असते. त्यामुळे शरीर थोडे उंच दिसते. दिवस जातो तसे गुरुत्वाकर्षण शरीरावर परिणाम करते आणि या डिस्क्स आकुंचन पावू लागतात, ज्यामुळे उंचीमध्ये एक ते दीड सेंटीमीटरचा फरक होऊ शकतो.

डॉक्टर आणि फिटनेस तज्ज्ञांच्या मते सकाळी आणि संध्याकाळी उंचीमध्ये थोडा फरक असणे सामान्य आहे. म्हणूनच उंची मोजण्यासाठी दुपार किंवा संध्याकाळ सर्वोत्तम वेळ मानली जाते.

विमान वाहतूक उद्योग आणि संरक्षण दलांमध्ये उंचीचे ठरावीक निकष आहेत. सकाळी उंची मोजली तर ती कृत्रिमरित्या जास्त असू शकते आणि उमेदवार पात्र ठरू शकतो. पण प्रत्यक्ष आणि कायमची उंची जाणून घेण्यासाठी ती संध्याकाळी मोजली जाते.

# रद्दीतून उघडले नशीब

घर साफ करताना एक व्यक्तीला वडिलांची ३५ वर्षे जुनी कागदपत्रे सापडली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या कागदपत्रांना तो रद्दी समजत होता. पण प्रत्यक्षात त्या कागदपत्रांची किंमत कोट्यवधींची होती.



त्या व्यक्तीच्या म्हणण्यानुसार, त्याच्या वडिलांनी ९० च्या दशकात जेएसडब्ल्यू स्टीलचे काही शेअर्स खरेदी केले होते. त्या शेअर्सची किंमत आज कोट्यवधी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. त्या शेअर्सचीच ही सर्टिफिकेट्स आहेत. आजकाल ही पोस्ट इंटरनेटवर बरीच व्हायरल झाली आहे. त्यावर युजर्सच्या प्रतिक्रिया रंजक आहेत.

या व्यक्तीच्या वडिलांनी १९९० मध्ये जेएसडब्ल्यू स्टीलचे शेअर्स सुमारे १ लाख रुपयांना खरेदी केले होते. ३० वर्षे सुरक्षित ठेवल्यानंतर, आज त्यांची एकूण किंमत सुमारे ८० कोटी रुपये झाली आहे. ही बातमी प्रथम गुंतवणूकदार सौरव दत्ता यांनी एक्स (पूर्वी ट्विटर) वर शेअर केली. ही पोस्ट पाहून लोकांनी 'सोशल मीडिया'वर कमेंट्सचा पाऊस पाडला. काहींनी याला 'जनरेशनल वेल्थ' म्हटले, तर काहींनी याला 'लीगसी क्रिएशन' म्हटले. अनेक यूजर्सनी, 'कोणी ९० च्या दशकात १ लाख रुपये गुंतवू शकले असतील तर ते कुटुंब आधीच श्रीमंत होते,असेही लिहिले आहे . एक यूजर लिहितो, आता ती व्यक्ती आरामात निवृत्त होऊ शकते आणि जीवनाचा आनंद घेऊ शकते.

त्याची इच्छा असेल तर तो व्यवसाय देखील सुरू करू शकतो. दुसर्या यूजरने म्हटले, स्टॉक स्प्लिट्स, बोनस आणि डिव्हिडंडची ही खरी जादू आहे. ती कालांतराने अब्जावधींमध्ये बदलते. एकाने, कंपनीची मूलभूत तत्त्वे मजबूत असतील तर विक्रीची घाई करू नका, असा सल्लाही दिला आहे.

# सर्वात छोटा इंजिनिअर



इंजिनिअरींगची पदवी मिळवणं हे सोपं काम नाही. बरीच मेहनत करून प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर इंजिनिअरींगला प्रवेश मिळतो. ती जाडजूड पुस्तकं वाचता वाचता, कठीण प्रोजेक्ट्स पूर्ण करता करता नाकी नऊ येतात. बारावीनंतर इंजिनिअरींगला प्रवेश घेता येतो. पण बेल्जियमच्या अवघ्या नऊ वर्षांच्या लॉरेन्स सिमन्सने इंजिनिअरींगला प्रवेश घेतला आहे. तो जगातला इंजिनिअरींचा सर्वात लहान वयाचा विद्यार्थी असल्याचं बोललं जात आहे. त्याला डिसेंबरमध्ये इंजिनिअरींगची पदवी मिळेल. तो लॉरेन्स इंडोवन युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजीमधून शिक्षण घेत आहे. लॉरेन्सचा आयक्यू १४५ आहे. त्यामुळे शिक्षकांनी शिकवलेलं त्याच्या डोक्यात अगदी सहज शिरतं. लॉरेन्सच्या हुशारीबद्दल आपल्याला सासू-सासर्यां कडून कळल्याचं त्याची आई लेडिया सांगते. वयाची दहा वर्षं पूर्ण होण्याआधीच इंजिनिअरींगची पदवी मिळवणार्यात लॉरेन्सचं कौतुक करावं तेवढं कमीच आहे. लॉरेन्सची बुद्धिमत्ता हा निसर्गाचा एक चमत्कारच म्हटला पाहिजे.

# दगड नव्हे मासा...

या पृथ्वीतलावर विषारी सजीवांची सं'या बरीच जास्त आहे. साप, विंचू असे सजीव खूप धोकादायक असतात. त्यांचं विष शरीरात भिनत जातं. या प्राण्यांच्या विषावर उतारा आहे. पण जगातला अत्यंत विषारी मासा माणसाचा जीव घेऊ शकतो. हा मासा 'स्टोन फिश' या नावाने ओळखला जातो. हा मासा दगडासारखा दिसत असल्यामुळे पटकन कोणाच्याही लक्षात येत नाही. या माशावर कोणाचा पाय पडला तर शरीरातून मोठ्या प्रमाणावर विष बाहेर पडतं. या विषावर पाय पडल्यास पाय कापण्यावाचून दुसरा पर्याय उरत नाही. थोड्याशा दुर्लक्षामुळे माणसाचा जीवही जाऊ शकतो. स्टोन फिशवर पाय पडल्यावर अवघ्या ०.५ सेकंदांमध्ये त्याच्या शरीरातून विष बाहेर पडतं. म्हणजे डोळ्यांची उघडझाप व्हायच्या आतच हा मासा विष बाहेर टाकतो. सर्वसाधारणपणे माशाची ठराविक रचना असते. त्याला कल्ले असतात. पण हा मासा दगडासारखा दिसतो. हा मासा आहे यावर कोणाचाही पटकन विश्वा्स बसणार नाही. हा मासा खूपच भयानक दिसतो. या स्टोन फिशपासून सांभाळून रहायला हवं.



# राजीनाम्याचं अनोखं कारण!



आजकाल 'सोशल मीडिया'वर एक अनोखे राजीनामा पत्र वेगाने व्हायरल होत आहे. सहसा लोक नोकरी सोडण्यासाठी वेगवेगळी कारणे सांगतात. काहींना आरोग्य समस्या असतात. काहींना कौटुंबिक कारणे असतात, तर काही करिअर बदलण्याचे कारण देतात. पण एका व्यक्तीने दिलेल्या कारणामुळे संपूर्ण इंटरनेटवर हास्याचे वादळ उठले आहे. ऑफिसमध्ये न येण्याचे कारण इतके अनोखे आहे की असे कारण 'एचआर'च्या स्वप्नातही येणार नाही!

एका व्यक्तीने त्याच्या बॉसला राजीनामा पत्र लिहिले आहे. पण हे पत्र सामान्य नाही. या व्यक्तीने राजीनामा पत्रात लिहिले आहे, 'साहेब, मी उद्यापासून ऑफिसला येणार नाही. कारण माझ्या शेतजमिनीतून हायवे बांधला गेला आहे'. या 'ईमेल'ने सोशल मीडियावर खूप हास्य निर्माण केले. त्यावर अनेक मजेदार कॉमेंट्सही आल्या आहेत. एका युजरने लिहीले, भावाने आयुष्यात एक मोठा निर्णय घेतला आहे, नोकरी सोडून व्यापारी होण्याची वेळ आली आहे. दुसरा युजर म्हणतो, हायवे बांधला गेला नाही, तर नशिबाचा एक्सप्रेसवे उघडला आहे. आणखी एक युजर लिहीतो, भावाचे नशिब उघडले आहे.




लोक या पत्राला 'रेजिग्नेशन ऑफ इयर' म्हणत आहेत. खरे तर या बातमीत दुःख आणि आनंद दोन्ही लपलेले आहेत. कारण हायवे म्हणजे सरकारने त्यांची जमीन घेतली आहे. पण त्यांना आता भरपाई म्हणून भरपूर पैसे मिळतील. याशिवाय उर्वरित जमीन हायवेच्या कडेला येणार आहे. त्यामुळे जमिनीचे भाव चांगलेच वाढतील. म्हणजेच आता ऑफिसला जाण्याची गरज नाही. ही पोस्ट व्हायरल झाल्यापासून, ती एक कोटींहून अधिक लोकांनी पाहिली आहे, तर अनेकांनी ती पोस्ट लाईक केली आहे.

# बँकिंग व्यवहाराबाबत विश्वासार्हता निर्माण करण्यात नागरी सहकारी बँकांची भूमिका महत्वाची - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर दि.२९ प्रतिनिधी

नागरी सहकारी बँकांचे सर्वाधिक प्रमाण महाराष्ट्र व गुजरात राज्यात असून या बँकांनी राज्याच्या विकासात मोठे योगदान दिले आहे. यासोबतच सर्वसामान्य नागरिकांमध्ये बँकिंग व्यवहाराबाबत विश्वासार्हता निर्माण करण्यातही नागरी सहकारी बँकांनी महत्वाची भूमिका बजावली असल्याचे गौरवोद्गार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे काढले. येथील वर्धमान अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, माजी खासदार अजय संचेती, माजी आमदार सागर मेघे, पगारिया ग्रुपचे अध्यक्ष उज्वल पगारिया, वर्धमान



अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष अनिल पारख, उपाध्यक्ष अश्विन शहा व्यासपीठावर उपस्थित होते.

बहुतांशी व्यावसायिक बँका गुंतवणुकीसह इतर बाबींमध्ये अग्रेसर असतात परंतु देशाच्या आर्थिक विकासासाठी विविध प्राधान्यशील क्षेत्रात (प्रायॉरिटी सेक्टर) करण्यात येणाऱ्या कर्जपुरवठ्यात त्या मागे असतात, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, वर्धमान बँक स्थापनेपासूनच विविध निर्देशांक आणि मानकांच्या कसोटीवर उत्कृष्ट कार्य पार पाडत आहे. विशेषतः प्राधान्यशील क्षेत्रात प्रमाणावर कर्ज वाटप करूनही शून्य टक्के एनपीए असणाऱ्या व सातत्याने 15 टक्के लाभांश देणाऱ्या या बँकेने उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

वित्तीय संस्थांचे देशाच्या विकासात मोठे योगदान असल्याचे सांगून श्री.फडणवीस म्हणाले, जास्तीत जास्त वित्तीय संस्था स्थापित झालेल्या प्रदेशाची आर्थिक आणि भौतिक प्रगती जोमाने होते. या संस्था प्रगतीच्या मानक आणि विकासाच्या भागीदार ठरतात. या दृष्टीने वर्धमान बँकेने व्यावसायिकता जोपासतानाच कौशल्यपूर्ण कामकाजातून व्यावहारिकता सांभाळत चांगली वित्तीय व्यवस्था उभी केली. कर्जपुरवठ्याला प्राधान्य दिल्यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळाली असून बँकेचीही प्रगती झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

बँकिंग क्षेत्रात यापूर्वी मोठे बदल झाले तसेच काही नवी धोरणेही लागू झाली. मात्र अशा परिस्थितीतही आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा करून सहकारी बँकांनी व्यावसायिकतेचा अवलंब करत नवीन परिस्थितीत स्वतःला स्थापित केले. व्यावसायिक व राष्ट्रीय बँकांनादेखील ग्राहकांना उत्कृष्ट सेवा देण्यासाठी निर्माण झालेले तंत्रज्ञान स्वीकारण्यास अवधी लागला. मात्र त्या सर्व बाबी अर्बन बँकांनी गतीने स्वीकारून ग्राहककेंद्रित सेवा देण्यासाठी सर्व सुविधांची निर्मिती करण्याचा प्रयत्न वेळोवेळी केला आहे. वर्धमान बँक केवळ बँकिंग क्षेत्रापुरती मर्यादित न राहता सामाजिक क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी पार पाडत असल्याचे ते म्हणाले.

# दोन दिवसांच्या अर्भकाच्या जन्मदात्यांना शोधण्यात पनवेल पोलिसांना यश

पनवेल, दि. २९ प्रतिनिधी

नवी मुंबईतील पनवेल परिसरात एक हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली होती. यात पनवेल येथील तक्का भागात असलेल्या स्वप्नालय आश्रमाच्या बाहेर दोन दिवसांचे अर्भक आढळल्याने सर्वत्र एकच खळबळ उडाली होती. हे अर्भक एका बास्केटमध्ये ठेवले गेले असून त्याचबरोबर त्याच्या जवळ दूध पावडर, दुधाची बाटली आणि एक चिठ्ठीही ठेवण्यात आली होती. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तपासाचे चक्र फिरवत तपास केला असता या अर्भकाच्या आई वडीलांचा शोधण्यात पनवेल पोलिसांना यश आले आहे.



पुढे आलेल्या माहितीनुसार, प्रेम प्रकरणातून हे बाळ झाल्याचे आता उघड झाले आहे. सोबतच बाळाच्या आई-वडिलांनी लग्नही केल्याची माहिती पुढे आली आहे. मात्र वडीलांच्या घरच्यांना मुलगी पसंत नसल्याने मुलगी स्वत:च्या आई वडिलांकडे भिवंडी येथे राहत होती. दरम्यानच्या काळात ती गर्भवती असल्याचे तिच्या घरच्यांना कळाले होते. अशातच तीला आठव्या महिन्यात बाळ झाले. सध्या पोलीसांनी आई वडीलांना ताब्यात घेतलं आहे. चौकशीत आई वडील बाळाला सांभाळण्यासाठी तयार असल्याचीही माहिती पुढे आली आहे. सध्या बाळ वात्सल्य ट्रस्टमध्ये असून सरकारी नियमानुसार आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून बाळ परत आई वडिलांना देण्यात येणार आहे.

# ड्रामा करू नका; शेफालीच्या मृत्यूनंतर पती पराग त्यागीने हात जोडले

मुंबई, दि. २९ प्रतिनिधी

'कांटा लगा गर्ल' म्हणून प्रसिद्ध झालेल्या शेफाली जरीवालाचं हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं. शनिवारी, 28 जून रोजी ओशिवरामधल्या स्मशानभूमीत शेफालीवर अंत्यसंस्कार करण्यात आले. शेफालीनं अचानक या जगाचा निरोप घेतला आणि अख्खी सिनेसृष्टी हळहळली. आपल्या लाडक्या बायकोला गमावल्यानंतर तिचा पती पराग त्यागी मात्र, पुरता कोसळल्याचं पाहायला मिळालं. शेफालीच्या निधनानंतर पराग त्यागीचा एक व्हिडीओ समोर आला होता, व्हिडीओमध्ये तो त्याच्या कुत्र्यासोबत दिसतोय.



त्यावेळी बायको गेलीय आणि इथे हा कुत्रा फिरवतोय, असं म्हणत नेटकऱ्यांनी निशाणा साधला होता. अशातच आता शेफालीच्या पतीचा आणखी एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये पराग त्यागी सुजलेल्या डोळ्यांनी माध्यमांना आवाहन करत असल्याचं पाहायला मिळत आहे.

व्हायरल होणाऱ्या व्हिडीओमध्ये पराग त्यागी पुरता खचल्याचं पाहायला मिळतंय. यामध्ये त्यानं रडत रडतच, अगदी सुजलेल्या डोळ्यांनी माझ्यमांना एक भावनिक आवाहन केलंय. शेफालीचा पती पराग त्यागीनं माझ्यमांना हात जोडून विनंती केलीय आणि म्हटलंय की, माझी तुम्हाला विनंती आहे. याची खिल्ली उडवू नका, अजिबात ड्रामा करू नका, प्लीज माझ्या परीसाठी (शेफालीसाठी) प्रार्थना करा. शांतपणे... आता कृपया हे सर्व थांबवा..."

# तालिबानने वझिरीस्तानमधील आत्मघातकी हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली

इस्लामाबाद, दि. २९ वृत्तसंस्था

पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतात शनिवारी पाकिस्तानी लष्कराच्या ताफ्यावर झालेल्या आत्मघातकी बॉम्ब हल्ल्यात किमान १६ सुरक्षा अधिकारी ठार झाले होते. यानंतर पाकिस्तानने या हल्ल्यासाठी भारताला जबाबदार धरले होते. पण भारताने पाकिस्तानचे हे आरोप फेटाळून लावले होते. अशात, आता पाकिस्तान तालिबानच्या हाफिज गुल बहादूर शाखेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे.

दरम्यान, पाकिस्तानने या हल्ल्यामागे भारताचा हात असल्याचा आरोप केला होता. त्याला भारताने प्रत्युत्तर दिले आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या सचिवांनी



एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटेल आहे की, "२८ जून रोजी वझिरीस्तान आत्मघातकी हल्ल्यासाठी भारताला जबाबदार धरणारे पाकिस्तानी लष्कराचे अधिकृत निवेदन आम्ही पाहिले. आम्ही हा आरोप स्पष्टपणे नाकारतो."

पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतातील उत्तर वझिरीस्तान जिल्ह्यात शनिवारी झालेल्या आत्मघातकी हल्ल्यात किमान १६ सुरक्षा कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याची माहिती लष्कराच्या मीडिया शाखेने दिली होती.

इंटर-सर्व्हिसेस पब्लिक रिलेशन्सने म्हटले होते की, "दहशतवाद्यांनी नियोजित आणि नियोजनबद्ध केलेल्या भ्याड हल्ल्यात उत्तर वझिरीस्तान जिल्ह्यातील मीर अली येथील सुरक्षा दलांच्या ताफ्याला लक्ष्य करण्यात आले." खैबर पख्तूनख्वाचे मुख्यमंत्री अली अमीन गंडापूर यांनी या आत्मघातकी हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे. ही घटना अलिकडच्या काही महिन्यांतील उत्तर वझिरीस्तानमधील सर्वात प्राणघातक घटनांपैकी एक असल्याचे सांगितले जात आहे. या हल्ल्यामुळे या प्रदेशातील सुरक्षेबाबत गंभीर चिंता निर्माण झाली आहे.

# लाखो नोकऱ्या जातील

## ट्रम्प यांच्या 'बिग ब्युटीफुल बिल'वर मस्क यांची पुन्हा टीका



वॉशिंग्टन, दि. २९ वृत्तसंस्था

अमेरिकन उद्योगपती आणि टेस्लाचे मुख्य कार्यकारी अधिकारी एलॉन मस्क यांनी पुन्हा एकदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'बिग ब्युटीफुल बिल'वर टीका केली आहे. मस्क म्हणाले की, या विधेयकामुळे अमेरिकेतील लाखो नोकऱ्या जातील आणि देशाचे मोठे धोरणात्मक नुकसान होईल. इतकेच नाही, तर मस्क यांनी हे विधेयक पूर्णपणे वेडेपणाचे आणि विध्वंसक असल्याचे म्हटले आहे.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर केलेल्या एका पोस्टमध्ये एलॉन मस्क यांनी म्हटले की, "सिनेटच्या नवीन विधेयकामुळे लाखो नोकऱ्या जातील आणि यामुळे आपल्या देशाचे धोरणात्मकदृष्ट्या नुकसान होईल. या कायद्यामुळे जुन्या उद्योगांना सवलती मिळतील, परंतु यामुळे भविष्यातील उद्योग नष्ट होतील." ते पुढे म्हणाले, "हे विधेयक पूर्णपणे वेडेपणा आणि विध्वंसक आहे."

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि टेस्लाचे मुख्य कार्यकारी अधिकारी एलॉन मस्क यांच्यात वादग्रस्त 'बिग ब्युटीफुल बिल'वरून मतभेद आहेत. ट्रम्प त्याचे जोरदार समर्थन करतात, तर मस्क या विधेयकाच्या विरोधात आघाडीवर आहेत. २२ मे रोजी हे विधेयक प्रतिनिधी सभागृहात मंजूर झाले होते. विधेयकाच्या बाजून २१५ तर विरोधात २१४ मते पडली होती. आता ते सिनेटमध्ये ५१-४९ अशा फरकाने मंजूर झाले आहे

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि एलॉन मस्क 'बिग ब्युटीफुल बिल'वरून आमनेसामने आले आहेत. ट्रम्प यांनी वारंवार या विधेयकाचे समर्थन केले आहे, तर एलॉन मस्क यांनी या विधेयकाला विरोध केला आहे. ट्रम्प यांनी या विधेयकाचे वर्णन 'देशभक्ती' म्हणून केले होते, तर मस्क यांनी हे विधेयक म्हणजे वायफळ खर्च असल्याचे म्हटले होते.

# नीतू योशीचा आयपीओ विक्रीसाठी खुला




नीतू योशी लिमिटेड हि कंपनी रेल्वे क्षेत्रासाठी अत्यावश्यक सुरक्षा सुटे भाग तयार करणारी मेटलर्जिकल अभियांत्रिकी कंपनी आहे. कंपनीने आपला प्राथमिक सार्वजनिक ऑफर [आयपीओ ] विक्रीसाठी खुला केला असून या आयपीओ द्वारे कंपनीचा ७७. ०४ कोटी भांडवल उभारण्याचा उद्देश आहे. [उच्च किंमत पट्ट्यानुसार ] आणि हे शेअर्स बीएसई एसएमइ प्लॅटफॉर्मवर सूचिबद्ध होणार आहेत. या इशूमध्ये एकूण १,०२,७२,००० इक्विटी शेअर्स असणार असून याचा फेस व्हॅल्यू रुपये ५ आहे. शेअर्ससाठी किंमत पट्टा ७१ ते ७५ रुपये प्रतिशेअर निश्चित करण्यात आलेला आहे. या आयपीओमधून उभारण्यात येणाऱ्या निधीचा उपयोग नवीन उत्पादन युनिटच्या उभारणीसाठी तसेच सामान्य कॉर्पोरेट गरजांसाठी केला जाणार आहे. हा इशू मंगळवार १ जुले रोजी बंद होणार आहे. होरायझन मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड हे या इशूचे बुक रनींग लीड मॅनेजर आहेत. तर स्कायलाईन फायनांशियल सर्व्हिसेस लिमिटेड हे या आशुचे रजिस्ट्रार आहेत.

लोकार्थ

# सिडार टेक्सटाईल लिमिटेडचा आयपीओ आज उघडणार




सिडार टेक्सटाइल लिमिटेड (कंपनी, सेडार), जी विविध प्रकारचे सूत आणि कापड उत्पादने तयार करते, कंपनी आपला प्रारंभिक सार्वजनिक समावेश (आयपीओ) सोमवार, 30 जून 2025 रोजी उघडणार आहे. कंपनीचे उद्दिष्ट 60.90 कोटी उभारण्याचे आहे (वरच्या प्राइस बँडवर), आणि शेअर्स NSE Emerge प्लॅटफॉर्मवर लिस्ट केले जाणार आहेत.

या इश्यूअंतर्गत 43,50,000 इक्विटी शेअर्सचा समावेश आहे, ज्याचा फेस व्हॅल्यू 10 असून प्राइस बँड 130 ते 140 प्रति शेअर आहे.इक्विटी शेअर वाटप QIB अँकर पोर्शन – 7,82,000 इक्विटी शेअर्सपर्यंत,क्वालिफाईड इन्स्टिट्यूशनल बायर्स– 5,22,000 इक्विटी शेअर्सपर्यंत,बिगर-संस्थात्मक गुंतवणूकदार – किमान 13,28,000 इक्विटी शेअर्स,किरकोळ वैयक्तिक गुंतवणूकदार किमान 15,00,000 इक्विटी शेअर्स आणि मार्केट मेकर 2,18,000 इक्विटी शेअर्स असे असेल. या आयपीओ मधून मिळणारी रक्कम ग्रिड-टाईड सोलर पीव्ही रूफटॉप सिस्टमची स्थापना, मशीनरीचे आधुनिकीकरण, कार्यशील भांडवलाची आवश्यकता, आणि सामान्य कॉर्पोरेट हेतूंसाठी वापरली जाईल. अँकर बिडिंग 27 जून 2025 रोजी सुरू होईल आणि इश्यू 02 जुलै 2025 रोजी बंद होईल.या इश्यूचा बुक रनिंग लीड मॅनेजर आहे

# पुष्पा ज्वेलर्सची प्रारंभिक सार्वजनिक ऑफर खुली

पुष्पा ज्वेलर्स लिमिटेड (पुष्पा, कंपनी), ही एक घाऊक बिटूबी ज्वेलरी निर्माता कंपनी असून ती सोमवार, 30 जून 2025 रोजी आपला प्रारंभिक सार्वजनिक समावेश आयपिओ उघडणार आहे. हा आयपिओ 98.65 कोटी रुपये (उच्च किंमत बँडवर) उभारण्याचा उद्देश आहे. कंपनीचे शेअर्स NSE Emerge प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध केले जाणार आहेत. या इश्यूचा एकूण साईज 67,11,000 इक्विटी शेअर्स




असून प्रत्येकाचा दर्शनी मूल्य 10 आहे. किंमत श्रेणी 143 ते 147 प्रति शेअर दरम्यान आहे.आयपिओ मधून मिळणाऱ्या निधीचा वापर नवीन शो रूम उभारण्यासाठी, त्यात होणाऱ्या भांडवली खर्चासाठी, इन्व्हेंटरी खरेदीसाठी, कार्यकारी भांडवली गरजांसाठी आणि सामान्य कॉर्पोरेट हेतूंसाठी केला जाईल. अँकर भाग 27 जून 2025 रोजी उघडेल आणि हा इश्यू 2 जुलै 2025 रोजी बंद होईल.या इश्यूसाठी बुक रनिंग लीड मॅनेजर आहे एफिनिटी ग्लोबल कॅपिटल मार्केट प्रायव्हेट लिमिटेड, आणि रजिस्ट्रार आहे. पुष्पा ज्वेलर्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. अनुपम टिबरेवाल म्हणाले: "आमच्या प्रवासाची सुरुवात एका स्पष्ट दृष्टीकोनासह झाली होती असा दागिना तयार करणे जो परंपरा आणि सुसंस्कृती यांचा संगम दर्शवतो. या वर्षांमध्ये आम्ही केवळ भारतातच मजबूत उपस्थिती निर्माण केली नाही, तर आमचे डिझाईन आंतरराष्ट्रीय बाजारात, विशेषतः दुबई, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया येथे देखील पोहोचवले आहेत.

# क्रिझॅकच्या आयपीओचा किंमतपट्टा रु.२३३/- ते रु.२४५/- प्रति इक्विटी शेअर निश्चित

क्रिझॅक लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरसाठी प्रत्येकी रु. २ दर्शनी मूल्याच्या इक्विटी शेअरसाठी रु. २३३/- ते रु. २४५/- असा किंमतपट्टा निश्चित केला आहे.कंपनीची प्रारंभिक सार्वजनिक ऑफर (आयपीओ किंवा ऑफर) बुधवार, २ जुलै २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि शुक्रवार, ४ जुलै २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान ६१ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ६१ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात. हा आयपीओ पूर्णपणे पिंकी अग्रवाल आणि मनीष अग्रवाल यांनी अनुक्रमे ७२३ कोटी आणि १३७ कोटी रुपयांपर्यंतच्या इक्विटी शेअर्सपर्यंत विक्रीसाठी ऑफर आहे.क्रिझॅक लिमिटेड हे एजंट्स आणि जागतिक उच्च शिक्षण संस्थांसाठी एक 'बी टू बी' शिक्षण व्यासपीठ आहे जे युनायटेड किंग्डम, कॅनडा, रिपब्लिक ऑफ आयर्लंड, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड (ANZ) मधील जागतिक उच्च शिक्षण संस्थांना आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांची उपलब्धता मिळवून देते. गेल्या तीन आर्थिक वर्षात, त्यांनी युनायटेड किंग्डम, रिपब्लिक ऑफ आयर्लंड, कॅनडा आणि यूएसए मधील १७३ हून अधिक जागतिक उच्च शिक्षण संस्थांसोबत काम करताना ७.११ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांच्या अर्जांवर प्रक्रिया केली आहे. त्यांचे भारतात २,२३७ सक्रिय एजंट आहेत आणि युनायटेड किंग्डम, नायजेरिया, पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, श्रीलंका, कॅमेरून, घाना, केनिया, व्हिएतनाम, कॅनडा आणि इजिप्तसह ३९ हून अधिक देशांमध्ये सुमारे १,७११ सक्रिय एजंट आहेत.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# दुसऱ्या पत्नीबरोबरचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर भाजपाच्या आमदारांवर पक्षाची कारवाई



डेहराडून, दि. २९ वृत्तसंस्था

उत्तराखंडमधील भाजपाचे माजी आमदार सुरेश राठोड यांचा दुसऱ्या पत्नीबरोबरचा एक व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर पक्षाने याची दखल घेतली आहे. राठोड यांनी पहिल्या पत्नीला घटस्फोट दिल्याशिवाय दुसऱ्या महिलेबरोबर लग्नगाठ बांधल्याचा आरोप करण्यात येत होता. यानंतर राज्य भाजपाने याची दखल घेतली असून अशोभनीय वर्तन केल्याबद्दल सुरेश राठोड यांना पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित केले आहे. उत्तराखंडमध्ये समान नागरी संहिता लागू झाली आहे. त्यामुळे काँग्रेसने या प्रकरणावर जोरदार टीका केली होती.

व्हायरल होणाऱ्या व्हिडीओमध्ये माजी आमदार सुरेश राठोड अभिनेत्री उर्मिला सनावर बरोबर दिसून आले आहेत. ही त्यांची दुसरी पत्नी असल्याचा आरोप करण्यात आला. कालांतराने सुरेश राठोड आणि उर्मिला यांनी एकत्र पत्रकार परिषद घेत लग्न झाल्याचे कबूल केले.

उत्तराखंड भाजपाचे माध्यम प्रभारी मनवीर सिंह चौहान यांनी याप्रकरणावर बोलताना सांगितले की, आम्ही सुरेश राठोड यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. मात्र त्यांनी दिलेल्या उत्तराने पक्षाचे समाधान झाले नाही. माजी आमदार राठोड यांना पक्षाची आचार संहिता आणि सामाजिक मर्यादांचे वारंवार उल्लंघन केल्याबद्दल दोषी मानले गेले आहे. या आधारावर प्रदेशाध्यक्ष महेंद्र भट्ट यांच्या निर्देशानुसार राठोड यांना सहा वर्षांसाठी पक्षातून काढून टाकण्यात आले आहे.

# लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील अधिकारीच निघाला लाचखोर

जयपूर, दि. २९ वृत्तसंस्था

कुंपणच शेत खातं किंवा रक्षकच भक्षक झाला, अशा अर्थाच्या म्हणी आपण ऐकतो. या म्हणींचा अर्थ उमगणाऱ्या घटना आपल्या आजूबाजूला घडत असतात. शासनाच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे काम असते, भ्रष्ट सरकारी नोकरांवर चाप लावणे. नागरिकांना सरकारी सुविधा विनासायस मिळाव्यात, यासाठी प्रयत्न करणे. पण याच विभागातील अधिकारी भ्रष्ट झाले तर काय? राजस्थानच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागात असा एक प्रकार घडला आहे. जेव्हा याच विभागातील अधिकाऱ्याकडे बेहिशेबी रोकड आढळून आले. त्यानंतर उघड झाले भ्रष्टाचाराचे धक्कादायक प्रकरण. राजस्थानच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागात नोकरी करणारे आणि झालावाड येथे अतिरिक्त पोलीस अधीक्षक म्हणून तैनात असलेले जगराम मीणा यांना त्यांच्याच विभागाने बेहिशेबी रोख रकमेसह पकडले. शिवदासपुरा टोल प्लाझा येथे अचानक तपासणीदरम्यान मीणा यांच्या वाहनाची तपासणी करण्यात आली, तेव्हा मोठ्या प्रमाणात रोकड आढळून आली.

# उत्तराखंडमध्ये पावसाचा कहर! चारधाम यात्रा स्थगित

डेहराडून, दि. २९ वृत्तसंस्था

उत्तराखंडमध्ये सतत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आणि भूस्खलनाच्या भीतीमुळे चार धाम यात्रा एका दिवसासाठी स्थगित करण्यात आली आहे. हवामान खात्याने उत्तराखंडमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देत रेड अलर्ट दिला आहे. हरिद्वार, ऋषिकेश, श्रीनगर, रुद्रप्रयाग, सोनप्रयाग आणि विकासनगर येथे यात्रेकरूंना थांबविण्याचे निर्देश पोलिस आणि प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. गढवालचे आयुक्त विनय शंकर पांडे यांनी ही माहिती दिली. प्रतिकूल हवामान परिस्थिती लक्षात घेता, यात्रेकरूंच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे विनय पांडे यांनी म्हटलं.

हवामान परिस्थिती आणि रस्त्यांच्या सुरक्षिततेचा आढावा घेतल्यानंतर चारधाम यात्रा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला जाईल. यासाठी प्रशासन उद्या पुन्हा परिस्थितीचा आढावा घेईल, असं विनय पांडे म्हणाले.



भाविकांनी संयम बाळगावा आणि स्थानिक प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले. दुसरीकडे, हवामान विभागाने रविवार आणि सोमवार या दोन्ही दिवसांसाठी या पर्वतीय राज्यात रेड अलर्ट जारी केला आहे. अनेक ठिकाणी वादळ आणि विजांसह मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

उत्तराखंडमध्ये सतत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आणि नैसर्गिक आपत्तींमुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. उत्तरकाशी जिल्ह्यातील बारकोट तहसीलमधील सिलाई बंद भागात भूस्खलनाच्या दुर्दैवी घटनेत अनेक कामगार बेपत्ता झाले आहेत. दुसरीकडे, हवामान खात्याने मुसळधार पावसासाठी रेड अलर्ट जारी केल्यानंतर चारधाम यात्रा पुढील २४ तासांसाठी पुढे ढकलण्यात आली आहे. बागेश्वर जिल्ह्यातही मुसळधार पावसामुळे भूस्खलन झाल्यानंतर अनेक रस्ते बंद करण्यात आले आहेत.

उत्तरकाशीतील बारकोट येथील सिलाई बंद परिसरात ढगफुटी आणि भूस्खलनामुळे संपूर्ण परिसरात हाहाकार माजला आहे. बांधकाम सुरू असलेल्या हॉटेलच्या ठिकाणी काम करणारे अनेक कामगार बेपत्ता झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच राज्य आपत्ती प्रतिसाद दल , एनडीआरएफ, पोलीस आणि महसूल विभागाच्या पथकांनी घटनास्थळी पोहोचून मदत आणि बचाव कार्य सुरू करण्यात आले.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
**Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**